19-07-2005 (असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही) A

SKK/ 14:00

19-07-2005 (असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही) A-1

SKK/ KGS/ MAP/ 14:00

(सभापतीस्थानी मा.सभापती)

पृ.शी. व मु.शी. : तोंडी उत्तरे.

स□ 2000-2001 व 2001-2002 या शैजजिज सत्रात अ□ुदा□ास □िज ष पात्र ठरजाऱ्या आदिवासी जेत्रातील माध्यमिज शाळां□ा अ□ुदा□ मंजूर ज रजेबाबतची सद्य:क्स्थती

(1) * 5625 श्री. क्व्ह. यू. डायजव्हाजे , प्रा. बी. टी. देशमुज , श्री. वसंतराव जोटरे , श्री. □ा□ासाहेब बोरस्ते , श्री. जी. एल. अै□ापूरे : तारांज्रीत प्रश□ ज्र मांज 1755 ला दि□ांज 24 मार्च, 2005 रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात : स-मा-ा-ीय शालेय शिजज, ज्रिडा व युवज ज ल्याज मंत्री पुढील जोष्टींचा जुलासा ज रतील ज ाय :-

(1) स-ा 2000-2001 व 2001-2002 या शैजजिज सत्रात आदिवासी जेत्रातील अ-ुदा-ाास -िज षपात्र ठरजाऱ्या ज्या माध्यमिज शाळांचे मुल्यांज-ा मे, 2004 अजेरपर्यंत झाले अशा 105 शाळांच्या अ-ुदा-ााची तरतूद मंजूर ज रु-ा घेज्याच्या ज ार्यवाहीची सद्य:क्स्थती ज ाय आहे,

(2) बिज र आदिवासी जेत्रातील शाळां-ाा जुलै, 2004 पासू-ा -ियमित अ-ुदा-ा देऊ-ा आदिवासी जेत्रातील शाळांच्या अ-ुदा-ााबाबत भेदभाव ज ेला आहे ज ाय,

(3) अ-ुदा-ा मंजूर ज ेले असल्यास ज ेव्हा व जिती अ-ुदा-ा वितरीत ज रज्यात आले,

(4) अद्यापही अ-ुदा-ा वितरीत ज ेलेले -ासल्यास होजाऱ्या विलंबाची ज ारजे ज ाय आहेत ?

श्री.हसन मुश्रीफ प्रा. वसंत पुरजे यांचेकरिता : (1), (2), (3) व (4) मे, 2004 मध्ये ज रज्यात आलेल्या मूल्यांज-ाा-ुसार अ-ुदा-ाासाठी पात्र ठरलेल्या बिज र आदिवासी जेत्रातील शाळां-ाा जुलै, 2004 पासू-ा टप्पा-िहाय अ-ुदा-ा सुरु ज रज्यात आले. -िधीच्या ज मतरतेमुळे आदिवासी उपयोज-ाा जेत्र व आदिवासी उपयोज-ााबाह्य जेत्रातील (टी.एस.पी. ॲड ओ.टी.एस.पी.) -िज षपात्र माध्यमिज शाळां-ाा फेब्रुवारी, 2004 या एज ा महि-याच्या अ-ुदा-ाासाठी रुपये 74.38 लज इतज ी तरतूद आज क्स्मज ता -िधीतू-ा ज रज्यात आली. पुढील अ-ुदा-ाासाठी विहित मार्जा-े -िधी उपलब्ध ज रु-ा घेज्यात येत आहे.

श्री.व्ही.यू. डायगव्हाणे : आदिवासी क्षेत्रातील प्राथमिक शाळा आणि तुकडयांच्या संदर्भात 5 ऑगस्ट 2004 रोजी परिपत्रक काढले. त्या अनुषंगाने 645 शाळांना अनुदान देण्याचे मान्य केले. त्यापैकी आदिवासी विभागातील 105 शाळा आणि 74 तुकडयांना अनुदान देण्याच्या संदर्भातील प्रश्न

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

23 आणि 24 मार्च रोजी उपस्थित करण्यात आलेला होता. त्यावेळेस एका महिन्याचे म्हणजे फेब्रुवारी महिन्याचे शाळांना वेतन दिले आणि मार्चपासून आजपर्यन्त त्याबाबतचा निधी दिलेला

ता.प्र.क्र.5625 (पुढे सुरु...

श्री.व्ही.यू.डायगव्हाणे (पुढे सुरु....

नाही. जानेवारी आणि जुलै 2004 पर्यन्तचे थकित वेतन आणि मार्चपासून आजपर्यन्तच्या वेतनाचा प्रश्न आहे. शासनाने काढलेल्या परिपत्रकाप्रमाणे आदिवासी शाळांची यादी जाहीर झालेली आहे. 23 मार्चला या संबंधाने उत्तर दिले की, यासाठी केवळ 12 कोटी रुपये खर्च येणार आहे, ही रक्कम 1 महिन्याच्या आत दिली जाईल. या संदर्भाने आदिवासी विभाग आणि शालेय शिक्षण विभाग या दोघांमध्ये तडजोड होऊन शालेय शिक्षण विभागाकडून ही रक्कम दिली जाईल असे सांगण्यात आले. आता या संदर्भात उत्तर दिलेले आहे की, पुढील अनुदानासाठी विहित मार्गाने निधी उपलब्ध करुन घेण्यात येत आहे. आदिवासी विभागातील 105 शाळांना मार्चपासून वेतन देण्याबाबत वेळेचे बंधन घालून आश्वासन दिले. आता हे अधिवेशन संपण्यापूर्वी यासंदर्भातील अनुदान वितरित करु अशाप्रकारचे ठोस आश्वासन मंत्रीमहोदय देणार आहेत काय ?.

श्री.हसन मुश्रीफ : सभापती महोदय, हे खरे आहे की, 5 ऑगस्ट 2004 रोजी अनुदानप्राप्त शाळांची यादी जाहीर झाली. त्यामध्ये आदिवासी विभागातील 105 शाळा होत्या त्यापैकी 11 शाळा बिगर आदिवासी म्हणून वर्ग झालेल्या आहेत. म्हणजे आदिवासी विभागातील 94 शाळांचे पगार अडलेले होते. आकस्मिकता निधीमधून या 94 शाळा आणि 82 तुकडयांचे 74 लाख 38 हजार इतकी तरतूद केलेली आहे. यापैकी 10 लाख 25 हजार इतका निधी फेब्रुवारी महिन्यात दिला. 9 कोटी 84 लाख रुपये 82 तुकडयांसाठी दिलेले आहेत. 94 शाळांचे फेब्रुवारी 2005 ते फेब्रुवारी 2006 पर्यन्तचे वेतन देण्यासाठी 9 कोटी 24 लाख रुपयाची पूरक मागणी केलेली आहे. पूरक मागणी मान्य झाल्यानंतर महिन्याभरामध्ये या शाळांचे वेतन दिले जाईल. राहिलेला पगार आणि 7 महिन्याच्या फरकाची रक्कम ही 60 कोटी रुपये होते. याबाबत वित्त विभागाने फरकाची रक्कम देण्याचे नाकारले. याबाबत शिक्षण विभागाने वित्त विभागाकडे पाठपुरावा करत आहे. पूरक मागणी मान्य झाल्यानंतर लवकरात लवकर रक्कम वितरित केली जाईल.

श्री.व्ही.यू. डायगव्हाणे : दोन दिवसांनी पूरक मागणी मंजूर होईल. 105 शाळांचे 9 कोटी आणि काही लाख रुपये एक महिन्याच्या आत वितरित करणार आहात काय ?

श्री.हसन मुश्रीफ : 94 शाळां आणि 82 तुकडयांच्या अनुदानाची 24 कोटी रुपयाची पूरक मागणी आहे. ती मान्य झाल्यानंतर निधी उपलब्ध करुन दिला जाईल.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ KGS/ MAP/

ता.प्र.क्र.5625 (पुढे सुरु....

प्रा.बी.टी.देशमुख : 105 शाळा असतांना मंत्री महोदयांनी 94 शाळांचा उल्लेख केला. त्या वादामध्ये जायचे नाही. मंत्रीमहोदयांनी स्पष्ट केलेले आहे की, पूरक मागणी मंजूर झाल्यानंतर निधी दिला जाईल. तो निधी एक महिन्यात प्रत्यक्षात त्यांना निधी दिला जाईल काय ?

यानंतर कु.थोरात....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SMT/ KGS/ MAP/ प्रथम श्री. किल्लेदारे... 14:05

ता.प्र.क्र.5625. . . .

श्री. हसन मुश्रीफ : सभापती महोदय, पुरवणी मागण्या मंजूर झाल्यानंतर त्या माननीय राज्यपालांच्या सहीसाठी जातात. त्यामुळे एका महिन्याच्या आत नाही, पण दोन महिन्यात अवश्य देऊ.

श्री.नानासाहेब बोरस्ते : सभापती महोदय, 105 शांळामध्ये नंदूरबार जिल्हयातील पाचवी, सहावी आणि सातवी हे तीन वर्गच गाळून टाकलेले आहेत. 13 माध्यमिक शाळांमधील पाचवी ते सातवीच्या 39 वर्गांचे 51 शिक्षक या अनुदानापासून वंचित झालेले आहेत. शासन इयत्ता पाचवी ते दहावी पर्यंतच्या 105 विनाअनुदानीत शाळांमधील तुकडयांचा विचार करते. परंतु नंदूरबार जिल्हयामध्ये या शाळांवर जास्त अन्याय झालेला आहे. पाचवी ते सातवीच्या वर्गांना अनुदानच मिळालेले नाही. तेव्हा या शाळांना अनुदान देण्यात यावे आणि हे उर्वरित अनुदान शासन तातडीने देणार आहे काय?

श्री. हसन मुश्रीफ : सभापती महोदय, तेही करण्यात येईल.

श्री. व्ही. यू. डायगव्हाणे :सभापती महोदय, सन्माननीय मंत्रिमहोदयांनी "दोन महिन्यात देऊ" असे म्हटलेले आहे. आदिवासी विभागातील हा प्रश्न आहे. दोन महिन्यात प्रत्यक्षात त्यांना ते अनुदान मिळेल याची खबरदारी शासन घेईल काय?

श्री. हसन मुश्रीफ : सभापती महोदय, मी मघाशीच सांगितले की,...

श्री. व्ही. यू. डायगव्हाणे : तुम्ही म्हटल्याने होत नाही....

श्री. हसन मुश्रीफ : शेवटी शासनाच्या भावना समजून घेण्याची गरज आहे. आम्ही अवश्य पाठपुरावा करु. अवश्य कारवाई करु.

श्री. व्ही. यू. डायगव्हाणे :पुरवणी मागण्या मंजूर झाल्या नंतर ते पैसे प्रत्यक्ष मिळण्याचा प्रश्न आहे. आदिवासी विभागाला पैसे देतांना इतका विलंब करु नका. प्रत्यक्ष त्या शिक्षकाच्या हातामध्ये दोन महिन्यात पैसे दिले जातील काय?

श्री. हसन मुश्रीफ : सभापती महोदय, दोन महिन्यात देण्यात येतील.

श्री. रामनाथ मोते :सभापती महोदय या शाळा जून, 2005 पासून शंभरटक्के अनुदानावर आणलेल्या आहेत. त्यानंतर त्यांना फक्त फेब्रुवारी महिन्याचे वेतन मिळालेले आहे.या आदिवासी

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.5625. . . .

श्री. रामनाथ मोते.....

भागातील शाळा आहेत. या शिक्षकांना गेली वर्षानुवर्षे वेतन मिळालेले नाही.जरी कागदोपत्री वेतन दिलेले आहे असे दाखविलेले असले तरी प्रत्यक्षात त्यांना वेतन मिळालेले नाही. विनावेतन या शिक्षकांनी काम केलेले आहे. त्यांना फक्त एक महिन्याचा पगार मिळालेला आहे. मंत्री महोदयांनी उल्लेख केल्याप्रमाणे 9 कोटी रुपये देण्याचे मान्य केलेले आहे. पण मधला जो फरक आहे, जून पासून जानेवारी पर्यंतचे वेतन किती दिवसात या शिक्षकांपर्यंत प्रत्यक्ष पोहंचण्याची व्यवस्था करण्यात येईल?

श्री. हसन मुश्रीफ : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री, रामनाथ मोते यांनी तोच प्रश्न वेगळया पध्दतीने विचारलेला आहे.दोन महिन्यात देऊ.

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

भिवंडी (जि.ठाणे) येथील भंडारी कंपाऊंड येथे ५६० लिटर रॉकेल जप्त केल्याबाबतची चौकशी

(२) * ६१०३ श्री. अनंत तरे , डॉ. दिपक सावंत : सन्माननीय अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री पुढील जोष्टींचा जुलासा ज़रतील ज़ाय :-

(1) भिवंडी (जि.ठाजे) येथील भंडारी ज़ंपाऊंड येथे पाळत ठेवू-ा एज़ा टेम्पोतू-ा -ेले जाजारे 560 लिटर -िळ्या रंजाचे रॉज़ेल ज़ृति दलाच्या पोलिसा-ी दि-ांज़ 31 मे, 2005 रोजी वा त्यासुमारास जप्त ज़ेले असू-ा उक्त प्रज़रजी श्री. विरेंद्र जयस्वाल व -ारायज वर्मा यां-ा अटज़ ज़ेली हे जरे आहे ज़ाय,

(2) उक्त प्रज़रजी शास-ा-ो चौज़शी ज़ेली आहे ज़ाय,

(3) असल्यास, चौज़शीत ज़ाय आढळू-ा आले व तद्-ुसार दोषीवर ज़ोजती ज़ारवाई ज़ेली वा ज़रज्यात येत आहे,

(4) अद्याप ज़ोजतीच ज़ारवाई ज़ेली -ासल्यास, विलंबाची ज़ारजे ज़ाय आहेत ?

श्री. बाबा सध्दिीकी, श्री. सुनिल तटज़रे यांच्याकरिता (1) सदर प्रज़रजी दि. 28 मे, 2005 रोजी श्री. बिर्जेदर जयस्वाल व श्री. -ारायज वर्मा यां-ा अटज़ ज़ेली हे जरे आहे.

(2) होय.

(3) या प्रज़रजी घट-ास्थळी श्री क्व्हलर मि-ीडोर टेम्पो ज़्र.एम.एच.-04 एफ-7657 मध्ये अ-ाधिज़ृतरित्या 560 लिटर -िळ्या रंजाचे रॉज़ेल-ो भरलेले ज़ॅ-ा आढळू-ा आल्या-ो श्री. बिर्जेदर जयस्वाल, टेम्पो ड्रायव्हर व श्री. -ारायज मजिराम वर्मा, हमाल यांच्याविरुध्द जीव-ावश्यज़ वस्तू ज़ायदा 1955 अंतर्जत दि. 28.5.2005 रोजी जु-हा -ोंदविज्यात येवू-ा टेम्पोसह रु.1,14,000/- ज़िमंतीचा मुद्येमाल जप्त ज़रज्यात आला. उपरोक्त, जप्त ज़ेलेले ज़ेरोसी-ा हे शिधावाटप दुज़ा-ा ज़्र.37 फ-33 या दुज़ा-ातील असल्याचे पोलिस तपासात -िष्पन झाल्यामुळे दुज़ा-ादार श्री. महेश ध-ाजी पाटील यां-ा अटज़ ज़रज्यात आली. उपरोक्त, ति-ही आरोपींविरुध्द प्रथम वर्ज -यायालय, भिवंडी येथे दोषारोप पत्र दाजल ज़रज्यात आले असू-ा सद्य:स्थितीत प्रज़रज -यायप्रविष्ट आहे. शिधावाटप दुज़ा-ाचे प्राधिज़ारपत्र -िलंबित ज़रज्यात आले आहे.

(4) प्रश्-ा उद्भवत -ाही.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. बाबा सिद्दीकी : सभापती महोदय, प्रश्न क्रमांक 3 च्या उत्तरात दुरुस्ती आहे. "दुकानदार श्री. महेश धनुजी पाटील यांना अटक करण्यात आली" असे म्हटले आहे.त्याऐवजी "दुकानातील विक्रेते श्री. महेश धनुजी पाटील यांना अटक करण्यात आली" असे वाचावे.

श्री. अनंत तरे :सभापती महोदय, अर्थसंकल्पीय अधिवेशनात दिनांक 22 मार्च व 29 मार्च रोजी अशा स्वरुपाचे प्रश्न या ठिकाणी उपस्थित झाले होते. त्या प्रश्नाच्या अनुषंगाने मंत्रिमहोदय श्री. सुनील तटकरेसाहेबांनी स्वतंत्रपणे प्रयोगशाळा लवकर सुरु करण्यात येतील, दक्षता समित्या एका महिन्याच्या आत गठित केल्या जातील, दक्षता पथकाच्या माध्यमातून राज्यभर घाऊक परवानेधारकांची तपासणी करुन दोषी आढळलेल्यावर कठोर कारवाई करण्यात येईल, लॅबची संख्या वाढविण्यात येईल अशी सगळी आश्वासने, दोन महिन्यापूर्वी या सदनात दिली होती. गरीब जनतेला अन्नधान्य मिळत नाही. परंतु रेशन दुकानात आलेले धान्य बाहेर विकले जाते. भिवंडीमध्ये 507 लिटर्स बेकायदा रॉकेल जप्त केले आहे. हे रॉकेल दक्षता पथकाने घाड टाकून जप्त केलेले नाही तर धडक पोलीस कृती दलाने जप्त केलेले आहे. मागच्या अधिवेशनात सन्माननीय मंत्रिमहोदयांनी उत्तर दिले होते की, दक्षता समित्या स्थापन केल्या जातील, लॅबची संख्या वाढविली जाईल. तेव्हा दक्षता समित्या स्थापन केल्या आहेत काय? लॅबची संख्या वाढविली आहे काय? दक्षता पथकाच्या माध्यमातून काय काय कारवाई केली? शिधावाटप दुकान क्र.37 फ-33 या दुकानावर कारवाई करण्यात आली आहे.माझा प्रश्न असा आहे की, या दुकानाच्या संदर्भात गृहभेटी घेतल्या आहेत काय? आणि त्याचा अहवाल काय आहे?

यानंतर श्री. बरवड ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता. प्र. क्र. 6103 ....

श्री. सुनील तटकरे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. अनंत तरे यांनी या प्रश्नाच्या व्यप्तीच्या पलीकडेचे दोन प्रश्न या ठिकाणी विचारलेले आहेत. तरी सुध्दा प्रत्येक जिल्हयामध्ये आणि विशेषत: मुंबई शहरात प्रत्येक प्रभागनिहाय दक्षता समित्या स्थापन करण्याच्या संदर्भात सन्माननीय पालकमंत्र्यांना मी स्वत: पत्र लिहिलेले आहे. काही जिल्हयात अशा दक्षता समित्या स्थापन झालेल्या आहेत. काही ठिकाणी राहिल्या असतील तर त्या निश्चितपणे स्थापन करण्यात येतील. सन्माननीय सदस्यांनी दुसरा जो प्रश्न विचारला त्याप्रमाणे गृह भेटीचा प्रश्न येत नाही. याचे कारण असे की, हा साठा अनधिकृत आहे, बेकायदेशीर आहे आणि त्याबाबतीत पोलीस चौकशी झाली. त्यांचे दुकान निलंबित झालेले आहे. यामध्ये गृहभेटी देण्याचा मुद्दा उपस्थित होत नाही.

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. अनंत तरे यांनी जो प्रश्न विचारला त्याबाबत माननीय मंत्रिमहोदयांची संदिग्ध उत्तर दिलेले आहे. आपण किती ठिकाणी दक्षता समित्या स्थापन केल्या आणि किती ठिकाणी दक्षता समित्या स्थापन करण्याचे बाकी आहे ? त्याची माहिती माननीय मंत्रिमहोदयांकडे नसेल तर त्यांनी ती माहिती पटलावर ठेवावी. मागच्या वेळी माझ्या प्रश्नाच्या अनुषंगाने प्रयोगशाळा सुरु प्रयोगशाळा सुरु करणार आहोत असे उत्तर दिले होते.. प्रयोगशाळा सुरु करण्याबाबत आपण काय तयारी केली आहे ?

श्री. सुनील तटकरे : सभापती महोदय, राज्यातील दक्षता समित्यांबाबतची माहिती आता माझ्याकडे नाही. ती माहिती पटलावर ठेवण्यात येईल. सन्माननीय सदस्यांनी दुसरा प्रश्न हा लॅब स्थापन करण्यासंबंधी विचारलेला आहे. त्याची कार्यवाही आमच्या स्तरावर चालू आहे.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. हे सगळे रॉकेल डिझेलमध्ये चालले आहे आणि एकावरही कारवाई होत नाही. एकाचेही लायसन्स रद्द होत नाही. दक्षता समित्यांच्या समन्वयाने भेसळ सुरु आहे. यामध्ये खालपासून वर पर्यन्त अंडरस्टँडींग आहे. दक्षता समित्या स्थापन झाल्या नाहीत. आपण दक्षता समित्या स्थापन करीत नाही. तुम्ही कोणती लॅब स्थापन केली ? सहा महिन्यात एक तरी भेसळवाल्याला पकडले काय ? कोणाचे लायसन्स रद्द केले काय ? आपण किती लॅब स्थापन केल्या आणि किती लोकांवर कारवाई केली ?

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

..2..

RDB/ KGS/ MAP/

ता. प्र. क्र. 6103 .....

श्री. सुनील तटकरे : गेल्या सहा महिन्यामध्ये आम्ही किती ठिकाणी भेसळ पकडली आणि काय कारवाई केली याची माहिती सुध्दा पटलावर ठेवण्यात येईल. लॅब स्थापन करण्यासंबंधी जी तरतूद करावयाची आहे त्यासंबंधी विभागाने प्रस्ताव तयार केला आहे. संबंधित पेट्रोलियम कंपन्यांशी चर्चा केली आहे. मोबाईल लॅब उपलब्ध करुन देण्यासाठी सुध्दा त्यांच्याबरोबर स्वत: तीन बैठका घेतलेल्या आहेत. त्याबाबतीत पेट्रोलियम मंत्रालयाकडे प्रस्ताव दिलेला आहे. आमच्या विभागात याबाबतीत काय करु शकतो याबाबत प्रयत्न केलेला आहे. गेल्या सहा महिन्यामध्ये जी कारवाई केलेली आहे ती माहिती पटलावर ठेवू.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, माननीय श्री. लक्ष्मणराव ढोबळे तसेच माननीय श्री. सुरेशदादा जैन अन्न व नागरी पुरवठा मंत्री असताना हेच उत्तर देण्यात आले आणि माननीय श्री. सुनील तटकरे अन्न व नागरी पुरवठा मंत्री असताना हेच उत्तर देण्यात येत आहे. सगळे रॉकेल डिझेलमध्ये चालले आहे. सर्व जिल्हयांमध्ये हे सुरु आहे. दक्षता समित्या स्थापन झाल्या नाहीत. दक्षता समित्या स्थापन झाल्या की, लिफाफे येतील. सर्व अधिकारी यामध्ये सामील आहेत. आपण हा विषय इतका लाईटली घेता काय ? माझा माननीय मंत्रिमहोदयांना असा प्रश्न आहे की, जीवनावश्यक वस्तू कायद्याच्या अंतर्गत, रॉकेलची डिझेलमध्ये जी मोठया प्रमाणावर भेसळ होत आहे ती रोखण्यासाठी कालबध्द कार्यक्रम करुन, ताबडतोब लॅब स्थापन करुन, त्यांची तपासणी करुन भेसळ करीत असतील तर त्याबाबतीत कारवाई करणे, लायसन्स रद्द करणे याबाबतीत कठोर कारवाई करण्याबाबत शासन विचार करणार काय ?

श्री. सुनील तटकरे : सभापती महोदय, मी मघाशी सांगितले की, सहा महिन्यामध्ये आम्ही किती ठिकाणी भेसळीच्या संदर्भात काय कारवाई केली याची माहिती निश्चितपणे अधिवेशन संपण्यापूर्वी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात येईल.

श्री. संजय दत्त : गेल्या सहा महिन्यामध्ये दक्षता पथकाने भिवंडीमध्ये अशा प्रकारच्या किती घटना उघडकीस आणल्या ? मिती परवाना धारकांवर कारवाई करण्यात आली ?

श्री. बाबा सिद्दीकी : सभापती महोदय, भिवंडीला 423 इन्स्पेक्शन्स झाले. त्यामध्ये 12 केससमध्ये इरेग्युलरीटीज होत्या. 1 परवाना रद्द झाला. 2 लायसन्स सस्पेंड झाले.

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.6103.....

श्री.मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, सन्माननीय श्री.सुनील तटकरे यांच्याकडे हे खाते आल्यानंतर मला असे वाटले की, या खात्यावर जास्त कार्यक्षमतेने त्यांची पकड येईल. शेवटी जीवनावश्यक वस्तूंचे हे खाते आहे पण या खात्याला गरीबांचे जीवनच असहाय्य करुन ठेवावयाचे असेल तर मग काही मार्ग निघणार नाही, त्याबद्दल तेच उत्तर देतील. परंतु सर्व रेशनिंग कार्यालये, काळया बाजाराने जीवनावश्यक वस्तूंच्या विक्रीवर या खात्याचे कोणतेही बंधन राहिलेले नाही हे निर्विवाद सत्य आहे. हा विषय मी नागपूर अधिवेशनापासून मांडत आहे. त्यावेळी त्यांना सांगितले होते की, दक्षता समित्या नेमून आमच्या आमदारांना जागे करावे. त्याची व्यवस्था झालेली नाही. बोगस रेशन कार्डस् विकली जात आहेत त्याबाबत मी दोन दिवसांपूर्वी राज्यमंत्र्यांशी बोललो होतो की, माझ्याबरोबर चला मी तुम्हाला कोण दलाल आहेत ते दाखवितो. परंतु कोणत्याही परिस्थितीत दलालांना संरक्षण आणि सर्वसाधारण गरीब माणसांना संरक्षण नाही असे हया खात्यामध्ये चालले आहे. वास्तविक गरीबांसाठी हया खात्याची निर्मिती झालेली आहे आणि गरीबांचीच उपेक्षा चालू आहे, काळा बाजारवाल्यांना संरक्षण दिले जात आहे. माझा प्रश्न असा आहे की, किती दिवसामध्ये बोगस रेशनिंग कार्ड देणे थांबविणार आहात ? एक महिन्यामध्ये दक्षता समित्या स्थापन झाल्या नाही तर मी स्वत: पुढाकार घेईन असे आपण उत्तर दिले होते त्या समित्यांचा पत्ता नाही. हया दक्षता समित्या कधी स्थापन होणार ? रॉकेलचा काळा बाजार चालला आहे, झोपडपट्टयांमध्ये राहणा-या माणसांच्या घरी गॅस नाही, त्यांना कोणतेही सरपण मिळत नाही, त्यांच्या घरचा स्टोव्ह पेटावयाचा असेल तर या लोकांना योग्य मार्गाने कधी रॉकेल उपलब्ध होईल या गोष्टींचा खुलासा करावा.

श्री.सुनील तटकरे : सभापती महोदय, मा.सदस्यांनी विचारलेल्या प्रश्नाचे मी मघाशी उत्तर दिले आहे. दक्षता समित्या स्थापन करण्याचे अधिकार पालकमंत्र्यांना आहेत. मागील अधिवेशनाच्या वेळी.....

(विरोधी बाजुचे काही मा.सदस्य एकाचवेळी बोलत असतात.)

श्री.सुनील तटकरे : मला माझे उत्तर पूर्ण करु द्याल की नाही, माझे उत्तर पूर्ण करु द्यावे.

सभापती : मा.मंत्रिमहोदयांना त्यांचे उत्तर पूर्ण करु द्यावे.

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, मला दक्षता समित्यांबद्दल बोलावयाचे आहे.

सभापती : मा.मंत्रिमहोदय आपण आपले उत्तर पूर्ण करावे.

श्री.सुनील तटकरे : सभापती महोदय, दक्षता समित्यांचा प्रश्न उपस्थित केला त्यावेळी विशिष्ट कालावधीमध्ये दक्षता समित्या स्थापन केल्या जातील असे उत्तर दिले होते. (अडथळा) वास्तविक क्रमांक 2 वरील प्रश्नाशी दक्षता समित्यांचा प्रश्न निगडित नाही, तरीही मी उत्तर देत आहे.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, हे आपण ठरविणार की, मंत्रिमहोदय ठरविणार ?

श्री.सुनील तटकरे : ठीक आहे, दक्षता समित्यांची माहिती मी पटलावर ठेवीन.

(विरोधी बाजुचे काही मा.सदस्य एकाचवेळी बोलत असतात.)

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, मा.मंत्रिमहोदयांनी उत्तर देताना मागील उत्तराची उजळणी केलेली नाही. दक्षता समित्या स्थापन करण्याचे पूर्ण अधिकार पालकमंत्र्यांना दिलेले आहेत त्या त्यांनी स्थापन करावयाच्या आहेत असे आपण म्हटले.

श्री.सुनील तटकरे : मी मघाशी उत्तर देत होतो परंतु मघाशी मला माझे उत्तर पूर्ण करु दिले नाही.

श्री.दिवाकर रावते : मंत्रिमहोदय, आपण खाली बसल्यानंतर मी बोलण्यासाठी उभा राहिलो, आपल्याला मा.सभापतींनी उत्तर देण्यासाठी संधी दिली होती, परंतु आपण उत्तर दिले नाही.

श्री.सुनील तटकरे : सभापती महोदय, दक्षता समित्या नेमण्यासंबंधी मी उत्तर दिले होते. या समित्या स्थापन करण्यासाठी मी सर्व पालकमंत्र्यांना पत्र दिले आहे. त्याप्रमाणे अनेक जिल्हयांमध्ये त्या गठित झालेल्या आहेत काही ठिकाणी गठित झालेल्या नाहीत, मुंबईमध्ये सुध्दा गठित झालेल्या नाहीत, यासंबंधीची संपूर्ण माहिती आता माझ्याजवळ उपलब्ध नाही. दक्षता समित्यांचा प्रश्न वेगळा आहे. मी मघाशी यासंबंधी सांगितले की,......

(विरोधी बाजुचे काही मा.सदस्य एकाचवेळी बोलत असतात.)

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, मा.मंत्रिमहोदयांच्या बोलण्यावर माझा हरकतीचा मुद्दा आहे.

3....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.6103....

सभापती : जीवनावश्यक वस्तूंच्या अनुषंगाने रॉकेल असेल, धान्य असेल याचा गरीबांशी संबंध आहे. याबाबतीमध्ये शासनाची भूमिका ही कठोर असावयास पाहिजे अशी सदनाच्या दोन्ही बाजूच्या मा.सदस्यांची भावना आहे. यासंबंधी अनेकवेळा या सदनामध्ये चर्चा झालेली आहे. यावेळी हा विषय रॉकेलचे नियतन जप्त केल्यासंबंधीचा असेल किंवा रॉकेल पकडण्यात आले हा विषय असेल.....

नंतर श्री.शिगम

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ KGS/ MAP/ पूर्वी श्री. खंदारे 14:20

(ता.प्र.क्र. 6103..... **(मा.सभापती......)**

एकूण सर्व जीवनावश्यक वस्तूंच्याबाबतीत मा.मंत्री महोदय कठोर राहिले तर असे प्रकार होणार नाहीत अशी सदनाची भावना आहे. या विषयाच्या अनुषंगाने मंत्री महोदयांनी या अगोदरही उत्तर दिलेले आहे. तेव्हा एक किंवा दीड महिन्याच्या कालबध्द मुदतीमध्ये महाराष्ट्रामध्ये सर्व ठिकाणी ह्या दक्षता समित्या गठित कराव्यात आणि जे विविध प्रकारचे प्रतिबंधात्मक उपाय करणे जरुरीचे आहेत ते उपाय मंत्री महोदयांनी करावेत अशी माझी त्यांना सूचना आहे.

श्री. सुनील तटकरे : काही ठिकाणी दक्षता समित्या नेमल्या गेलेल्या आहेत त्याबाबतची माहिती मी पटलावर ठेवतो. तसेच ज्या जिल्ह्यामध्ये त्या नेमावयाच्या राहिलेल्या आहेत त्याबाबतीत पालकमंत्र्यांची भेट घेऊन त्या नेमण्याबाबत कारवाई करण्यात येईल...

श्री. दिवाकर रावते : माझा हरकतीचा मुद्दा आहे. मा.पालकमंत्र्यांशी बोलून दक्षता समित्या नेमल्या जातील असे आता मा. मंत्री महोदयांनी सांगितले. अशाच एका प्रश्नाच्या संदर्भात माननीय मंत्री महोदयांनी 22 मार्चला दिलेल्या उत्तराकडे मी मा. सभापती महोदयांचे लक्ष वेधू इच्छितो. उत्तरामध्ये असे म्हटलेले आहे की, दक्षता समित्या येत्या महिनाभरात गठित करण्याबाबत पालकमंत्र्यांना विनंती करण्यात येईल. तसेच विशिष्ट कालावधीमध्ये सदर समित्या गठित केल्या गेल्या नाहीत तर विभागाकडे प्रस्ताव मागवून विभागामार्फत त्या समित्या गठित केल्या जातील. या उत्तराप्रमाणे मंत्री महोदयांनी विभागामार्फत समित्या का गठित केल्या नाहीत? आता पुन्हा पालकमंत्र्यांशी चर्चा करण्यात येईल असे मंत्री महोदयांनी उत्तर दिलेले आहे. दक्षता समित्या गठित करण्यासाठी पालकमंत्र्यांना वेळ नसेल तर विभागाकडे प्रस्ताव मागवून दक्षता समित्या गठित कराव्यात.

श्री. सुनील तटकरे : याबाबतीत मी स्वत: पत्रव्यवहार केला. काही जिल्ह्यामध्ये दक्षता समित्या गठित झाल्या आणि काही जिल्ह्यामध्ये पालकमंत्री त्या गठित करणार आहेत.

सभापती : पालकमंत्र्यांचा सल्ला घेऊन अन्न व नागरी पुरवठा विभागाने एक महिन्यामध्ये समित्या गठित करण्यासंबंधातील कार्यवाही पूर्ण करावी.

श्री. सुनील तटकरे : येत्या एक महिन्यामध्ये कार्यवाही पूर्ण होईल.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(ता.प्र.क्र. 6103....

श्री. विनोद तावडे : मा.सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी याठिकाणी हरकतीचा मुद्दा उपस्थित करुन मा.मंत्री महोदयांनी या सभागृहामध्ये 22 मार्चला दिलेल्या उत्तराकडे सभागृहाचे लक्ष वेधले. सदर दक्षता समित्या पालक मंत्र्यांनी गठित केल्या नाहीत तर विभागाकडे प्रस्ताव मागवून त्या गठित करण्यात येतील असे मंत्री महोदयांनी उत्तर दिलेले आहे. आपण सभागृहामध्ये पारावरच्या गप्पा मारण्यासाठी येतो काय ? समित्या गठित करण्यामध्ये काय अडचण आहे ? सभागृहामध्ये दिलेल्या उत्तराप्रमाणे विभागाकडे प्रस्ताव मागवून समित्या का गठित करण्यात आल्या नाहीत ?

सभापती : आतापर्यन्त अन्न व नागरी पुरवठा विभागाने कोणत्या पध्दतीने प्रतिबंधात्मक उपाययोजना करावयास पाहिजे याबाबत चर्चा करण्यात आली. त्यामध्ये दक्षता समित्या स्थापन करणे हा एक उपाय आहे. मी मा. मंत्री महोदयांना अशी सूचना केलेली आहे की, त्यांनी यामध्ये स्वत: लक्ष घालून एका महिन्यामध्ये दक्षता समित्या गठित कराव्यात. मा.सदस्यांनी प्रश्नाच्या व्याप्तीमध्ये बसणारे पूरक प्रश्न विचारावयास पाहिजेत. मा.सदस्य श्री. विनोद तावडे यांनी विचारलेला प्रश्न हा मूळ प्रश्नाच्या मर्यादेत नव्हता. अत: सदर प्रश्नास मा. मंत्री महोदयांनी उत्तर देण्याची आवश्यकता नाही.

श्री. पांडुरंग फुंडकर : दक्षता समित्या नेमण्यासंबंधी मा. मंत्री महोदयांनी दिनांक 22 मार्चला जे उत्तर दिलेले होते ते मा.सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी मा. सभापती महोदयांच्या निदर्शनास आणून दिलेले आहे. काही जिल्ह्यामध्ये दक्षता समित्या स्थापन झाल्या. या समित्यांवर अर्धी राष्ट्रवादी काँग्रेसची आणि अर्धी काँग्रेसची माणसे घेण्यात आली. ....

...नंतर श्री. गिते...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ABG/ MAP/ KGS/ प्रथम श्री. शिगम 14:25

ता.प्र.क्र.6103... श्री. पांडुरंग फुंडकर.....

सभापती महोदय, ज्या समित्या गठीत केल्या त्यावर इतर समाजातील कोणत्याही लोकांच्या नेमणूका केल्या गेल्या नाहीत. या समितीवर नेमणूका करण्यासंदर्भात स्थानिक आमदारांकडून नावे मागितली गेली होती. या समितींवर फक्त कॉंग्रेस आणि राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाच्या कार्यकर्त्यांना घेतल्या गेल्या आहेत. या दक्षता समित्यांनी पुरवठाधारकाशी साटेलोटे करुन सर्रास काळयाबाजाराचा धंदा सुरु केलेला आहे. ज्या दक्षता समित्या नेमल्या गेल्या त्या समितींवर विधान परिषदेच्या एकाही सदस्याची नेमणूक केली गेलेली नाही. विधान परिषदेच्या सदस्यांचा देखील दक्षता समिती समावेश करण्यात येईल अशा प्रकारचे माननीय मंत्र्यांनी सभागृहात आश्वासन दिलेले आहे. परंतु सदर आश्वासनाचे मात्र माननीय मंत्र्यांकडून पालन केले गेले नाही. सभापती महोदय, या सभागृहात माननीय मंत्री महोदयांकडून जे आश्वासन दिले जाते ते पाळले गेले पाहिजे अशा प्रकारचे संकेत आहेत. सन्माननीय मंत्री महोदयांनी आश्वासन देऊन ते पाळले गेलेले नाही. सदर आश्वासन पाळण्यासंबंधी माननीय मंत्र्यांना आपल्या माध्यमातून निदेश देण्यात यावेत अशी माझी आपणास विनंती आहे.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. दिनांक 22 मार्च रोजी सभागृहात मंत्री महोदयांनी एक निवेदन केलेले आहे. या दक्षता समित्यांची स्थापना पालक मंत्र्यांनी केली नाही तर आमच्या विभागामार्फत एका महिन्यात राज्यातील सर्व जिल्हयातील दक्षता समित्या गठित करण्यात येतील अशा प्रकारे आश्वासन या सभागृहामध्ये माननीय मंत्र्यांनी दिलेले आहे.सभापती महोदय,या सभागृहात दिले गेलेले आश्वासन पाळले जात नसतील, त्या आश्वासनांची अंमलबजावणी होत नसेल तर आम्ही याबाबतची दाद फक्त आपणाकडेच मागू शकतो. त्याच प्रमाणे या समितीमध्ये विधान परिषदेच्या सदस्यांचा देखील समावेश करण्यात येईल अशा प्रकारचे दुसरे आश्वासन माननीय मंत्र्यांनी या सभागृहात दिले आहे. सभापती महोदय, आम्हाला आपले संरक्षण हवे आहे. या सभागृहात माननीय मंत्री महोदयांनी आपल्या उपस्थित आश्वासन दिल्यानंतर ते आश्वासन हे विधिमंडळाच्या आश्वासन समितीकडे जाते. त्या आश्वासनाची पूर्तता झाली आहे किंवा नाही याची सखोल चौकशी केली जाते. या सभागृहात माननीय मंत्र्यांनी दोन आश्वासने दिली आहेत ती पाळलेली नाहीत. सभापती महोदय, या सभागृहास काही प्रतिष्ठा आहे त्यामुळे या दक्षता समित्या एका महिन्यात गठित कराव्यात व त्या समितीमध्ये आश्वासनइ

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

19-07-2005 (असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही) F-2

श्री.नितीन गडकरी..

दिल्याप्रमाणे विधान परिषद सदस्यांचा देखील समावेश करण्यात यावा अशा प्रकारचे स्पष्ट निर्देश आपण माननीय मंत्री महोदयांना द्यावेत अशी माझी आपणास विनंती आहे. सभापती महोदय, आपण स्पष्टपणे निर्देश दिले नाहीत तर काही अर्थ रहाणार नाही. म्हणून आपण माननीय मंत्र्यांना या अनुषंगाने स्पष्टपणाने निर्देश द्यावेत असा माझा हरकतीचा मुद्दा आहे.

श्री.सुनील तटकरे : सभापती महोदय,नवीन दक्षता समित्या गठित करताना विधान परिषदेच्या सदस्यांना घेण्यात यावे अशा प्रकारच्या स्पष्टपणाने सूचना राज्य सरकारने काढलेल्या आहेत.सभापती महोदय, आपण मघाशी निर्देश दिल्याप्रमाणे एका महिन्यात याबाबतची कार्यवाही पूर्ण करण्यात येईल.

सभापती : नवीन समित्या ज्यावेळी होतील त्यावेळेला विधान परिषदेच्या सदस्यांचा समावेश करण्यात यावा अशा प्रकारच्या सूचना माननीय मंत्र्यांनी दिलेल्या आहेत...

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, 22 मार्च रोजी माननीय मंत्री महोदयांनी या सभागृहात निवेदन केले. मधल्या काळात काही ठिकाणी दक्षता समित्या गठित झाल्या त्या समित्यांवर विधान परिषदेच्या सदस्यांना घेतले गेले नाही. माननीय मंत्र्यांनी या सभागृहात आश्वासन दिले आहे. ते आश्वासन माननीय मंत्री महोदयांकडून पाळले गेले पाहिजे. जर आश्वासन पाळले जात नसेल तर सदस्यांच्याच नव्हे तर सभागृहाचा देखील एक प्रकारचा तो अवमान आहे. सभापती महोदय, कॉग्रेस पक्ष आणि राष्ट्रवादी कॉग्रेस पक्ष यांच्यामध्ये समन्वय नसल्यामुळे दक्षता समित्या गठित होण्यासाठी अडचणी आलेल्या असतील याची आम्हाला कल्पना आहे. परंतु या ठिकाणी मंत्री महोदयांनी स्पष्टपणाने आश्वासने दिलेली आहेत ती दोन्ही आश्वासने पाळण्यासंदर्भात आपण निदेश द्यावेत अशी माझी आपणास विनंती आहे.

सभापती : या ठिकाणी 22 मार्च रोजी माननीय मंत्र्यांनी जे निवेदन केले होते त्या संदर्भात जो प्रश्न उपस्थित केला गेला. त्या प्रश्नाच्या अनुषंगाने मी अगोदरच निदेश दिलेले आहेत. परंतु या ठिकाणी या प्रश्नास अनुसरुन दुसरा प्रश्न उपस्थित केला गेला की, दक्षता समित्यांवर विधान परिषदेच्या सदस्यांना घेतले गेलेले नाही. या संदर्भात नवीन दक्षता समित्या गठित करताना विधान परिषदेच्या सदस्यांचा समावेश करण्यात यावा अशा प्रकारच्या सूचना विभागाने दिलेल्या आहेत अशी माहिती माननीय मंत्र्यांनी या ठिकाणी दिलेली आहे...

3..

श्री. नितीन गडकरी : या सभागृहात माननीय मंत्र्यांनी 22 मार्च रोजी आश्वासन दिलेले आहे. नंतरच्या काळात काही ठिकाणी दक्षता समित्या गठित झाल्या. परंतु त्या समित्यांवर विधान परिषदेच्या सदस्यांच्या नेमणूका केल्या गेल्या नाहीत. म्हणून दिनांक 22 मार्च रोजी दिलेल्या आश्वासनाची पूर्तता पूर्वलक्षीप्रभावाने शासनाकडून केली जाईल काय ?

सभापती : 22 मार्च रोजीच्या अनुषंगाने जो प्रश्न उपस्थित झाला त्या अनुषंगाने मी शासनास निदेश दिलेले आहेत. दुस-या प्रश्नाच्या बाबतीत सांगावयाचे झाले तर...

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, या सभागृहाचा सन्मान रहावा म्हणून आपणाकडून जे काही आदेश दिले जातात ते नेहमी पाळले जात असतात. 22 मार्च रोजी माननीय मंत्र्यांनी घोषणा केली होती की, या दक्षता समित्यांवर विधान परिषदेच्या सदस्यांना घेण्यात येईल. या समितीमध्ये विधान परिषद सदस्यांचा अंतर्भाव करण्यात येईल...

यानंतर श्री. कानडे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 6103 पुढे सुरु....

श्री. नितीन गडकरी...

सभापती महोदय, सभागृहामध्ये केलेली घोषणा ही सभागृहाची प्रॉपर्टी होते. त्या घोषणेची अंमलबजावणी करण्याची जबाबदारी मंत्रीमहोदयांची आहे. अंमलबजावणी होत नसेल तर आम्ही आपल्याकडे दाद मागणार. 22 मार्च रोजी मंत्रीमहोदयांनी घोषणा केल्यानंतर ज्या समित्या तयार झाल्या त्या समित्यांमध्ये कोणत्याही विधानपरिषद सदस्याला सामावून घेण्यात आलेले नाही असे आमच्या निदर्शनास आले आहे. सभागृहात केलेल्या घोषणेची अंमलबजावणी होणार नसेल तर आम्ही कोणाकडे दाद मागायची ? सभागृहामध्ये घोषणा करण्यासाठी आम्ही शासनावर जबरदस्ती केली नव्हती. मंत्रीमहोदयांनी स्वतःहून घोषणा केली आहे. त्यामुळे या घोषणेची अंमलबजावणी करण्याची जबाबदारी त्यांच्यावर आहे. सभागृहात घोषणा केली असल्यामुळे आपण निर्देश दिले पाहिजेत. 22 मार्च रोजी सभागृहात घोषणा केल्यानंतर समित्यांमध्ये विधानपरिषद सदस्यांचा अंतर्भाव करण्याची नैतिक,वैधानिक आणि कायदेशीर जबाबदारी सरकारची आहे आणि त्या जबाबदारीपासून हे सरकार दूर जात आहे. म्हणून आपण घोषणेची अंमलबजावणी करण्यासाठी सरकारला निर्देश द्यावेत. माझा स्पेसिफिक प्रश्न असा आहे की, 22 मार्च नंतर ज्या समित्या स्थापन झालेल्या आहेत त्यामध्ये विधानपरिषद सदस्यांचा अंतर्भाव होईल काय ? तसेच एक महिन्याच्या आत सर्व दक्षता समित्या स्थापन होतील काय याचा खुलासा मंत्रीमहोदयांनी करावा.

श्री. सुनील तटकरे : सभापती महोदय, 22 मार्च नंतर ज्या जिल्हयांमध्ये किंवा शहरांमध्ये दक्षता समित्या गठीत झाल्या असतील त्याची माहिती मी प्राप्त करुन घेतो. ज्या ठिकाणी समित्या गठीत झाल्या असतील त्या समित्यांमध्ये विधानपरिषद सदस्यांचा समावेश असेलच. ज्या ठिकाणी अशा समित्यांमध्ये विधान परिषद सदस्यांचा समावेश नसेल तेथे त्या त्या विभागातील विधानपरिषद सदस्यांचा समितीमध्ये समावेश करण्याबाबत आदेश देऊन त्याबाबतची माहिती मी सभागृहाच्या पटलावर ठेवीन.

....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्राथमिक शिक्षकांना सुधारित वेतनश्रेणी लागू होणेबाबत

(३) * ५६३७ श्री. वसंतराव खोटरे , श्री. व्हि. यू. डायगव्हाणे , प्रा. बी. टी. देशमुख , श्री. नानासाहेब बोरस्ते , श्री. जी. एल. अैनापूरे , श्री. राजेंद्र जैन , श्री. जितेंद्र आव्हाड , श्री. सदाशिवराव पोळ , प्रा. फौजीया खान , प्रा. जोगेंद्र कवाडे : तारांकित प्रश्न क्रमांक १७६४ ला दिनांक ७ एप्रिल, २००५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात : सन्माननीय शालेय शिक्षण, क्रिडा व युवक कल्याण मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्र शासनाने त्यांचे कडील प्राथमिक शिक्षकांसाठी मंजूर केलेली रु.४५००-७०००, ५५००-९०००, व ६५००-१०,५०० ही सुधारित वेतनश्रेणी राज्यातील प्राथमिक शिक्षकांना देण्याबाबतचा प्रस्ताव शास-ाा-ने वेतन असमानता समितीकडे पाठविला आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रस्तावावर समितीने घेतलेल्या निर्णयाबाबत शासनाचे अभिप्राय व शासनाने केलेल्या कार्यवाहीचे स्वरुप काय आहे,

(३) अद्याप उक्त शिफारशींवर शासनाने कार्यवाही केलेली नसल्यास, याबाबत होणाऱ्या विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. हसन मुश्रीफ,प्रा. वसंत पुरके यांच्याकरिता : (१) होय.

(२) प्रस्ताव विचाराधीन आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री. वसंतराव खोटरे : सभापती महोदय, प्रा.शिक्षकांना सुधारित वेतनश्रेणी लागू करण्याबाबतचा प्रश्न सभागृहामध्ये आतापर्यंत पाच वेळा विचारण्यात आला आहे. त्याच्या तारखा सुध्दा माझ्याकडे आहेत. तसेच दोन वेळा यासंदर्भात लक्षवेधी सूचनाही चर्चेला आली होती. त्यावेळी मंत्रीमहोदयांनी आश्वासन दिले होते की दोन महिन्याच्या आत याबाबत निर्णय घेऊन सुधारित वेतनश्रेणी लागू करणार आहोत. आज प्रश्न विचारण्यात आला आहे त्याला उत्तर देताना ही बाब विचाराधीन आहे असे उत्तर दिलेले आहे. अधिका-यांनी मागील उत्तर पाहून सुधारित उत्तर द्यावयाला पाहिजे होते. महाराष्ट्रामध्ये 1 लाख 36 हजार प्रा.शिक्षकांना केंद्र शासनाप्रमाणे सुधारित वेतनश्रेणी लागू करण्यात येईल काय ?

श्री. हसन मुश्रीफ : सभापती महोदय, केंद्र शासनाप्रमाणे राज्य शासनाच्या प्रा.शिक्षकांना सुधारित वेतनश्रेणी द्यावी अशी मा.सदस्यांची मागणी आहे. 3/4 वेळा हा प्रश्न सभागृहात उपस्थित झ ाला होता आणि त्यावेळी शासन यावर विचार करील असे उत्तर दिले होते. सभापती महोदय, राज्यात 1 लाख 36 हजार प्रा.शिक्षक आणि 5 वी ते 7 वी च्या विद्यार्थ्यांना शिकविणारे 48573 माध्यमिक शिक्षक असे एकूण 1 लाख 84 हजार 533 प्रा.शिक्षक हे ज्ञानदानाचे काम करीत आहेत.

....3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 5637 पुढे सुरु...

श्री. हसन मुश्रीफ ....

पाचवा वेतन आयोग या शिक्षकांना देण्याचे मान्य केलेले आहे. यासाठी 30 कोटी रुपयांचा बोजा पडणार आहे. वित्त विभागाने अशी भूमिका घेतली होती की, अशाच प्रकारची मागणी सगळयाच गटातील लोक करतील म्हणून वेतन असमानता समितीकडे हा विषय सोपविला आहे. त्या समितीची बैठक होऊन त्यामध्ये याबाबत चर्चा होईल आणि निश्चितपणाने निर्णय घेतला जाईल.

श्री. रामनाथ मोते : सभापती महोदय,केंद्र शासनाच्या निर्णयानुसार प्रा.शिक्षकांना 4500,5500 आणि 6500 अशा प्रकारची वेतनश्रेणी देण्यात आलेली आहे. पाचव्या वेतन आयोगामध्ये केंद्र शासनाने जी वेतनश्रेणी स्वीकारली तीच आपण स्वीकारलेली आहे. त्यानुसार 4500,5500 आणि 6500 अशी वेतनश्रेणी या शिक्षकांना मिळणे आवश्यक आहे. या अनुषंगाने अनेक वेळेला चर्चा झ ालेली आहे. जी.आर.निघालेला आहे. हा निर्णय अद्यापि राज्य शासनाने प्रा.शिक्षकांना लागू केलेला नाही. यासंदर्भात माझे तीन प्रश्न आहेत. केंद्र शासनाने यासंदर्भातील निर्णय केव्हा घेतला आणि राज्य शासनाकडे तो केव्हा प्राप्त झाला ? सुधारित वेतनश्रेणी देण्याबाबतची मागणी वेतन असमानता समितीकडे केव्हा पाठविली ? सदरहू मागणी मंजूर करण्यासाठी या समितीकडे कोणत्या प्रकारचा पाठपुरावा करण्यात आला ?

यानंतर श्री. गायकवाड

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 5637...

श्री.हसन मुश्रीफ :दिनांक 4.4.2002 ला केन्द्र सरकारच्या प्राथमिक शिक्षकांना वेतनश्रेणी लागू केलेली आहे ही वेतनश्रेणी आपल्याकडील प्राथमिक शिक्षकांना लागू करण्यासाठी वेतन असमानता समितीसमोर प्रस्ताव पाठविला असून शासन म्हणून निर्णय घेत असतांना शासनाला सर्व संबंधित खात्याशी चर्चा करावी लागते व त्याप्रमाणे वित्त विभागाला लवकरात लवकर कळविले जाईल तसेच त्यांना लवकरात लवकर निर्णय घेण्यास सांगण्यात येईल.

श्री.व्ही.यु.डायगव्हाणे :या प्रश्नाच्या संदर्भात माननीय राज्य मंत्रिमहोदयांनी पोरकटपणा चालविलेला आहे. या पूर्वी हा प्रश्न पाच वेळा उपस्थित करण्यात आला होता असे सन्माननीय सदस्य श्री. वसंतराव खोटरे यांनी सांगितले होते. आता सुध्दा या प्रश्नाला असे उत्तर देण्यात आले आहे की," हा प्रस्ताव विचाराधीन आहे ." या प्रश्नाच्या बाबतीत शासनाने यापूर्वी जी उत्तरे दिली होती ती शासनाने तपासून पाहिली आहेत काय ? सभापती महोदय,दिनांक 2.6.2004 रोजी आपणसुध्दा या बाबतीत निर्देश दिले होते. तेव्हा माननीय मंत्रिमहोदयांना आम्ही असे सांगितले होते की, आपण निगेटीव्ह उत्तर देत आहात .एकूण 21 लाख शिक्षक असून त्यापैकी 4 लाख प्राथमिक डी.एड.शिक्षकांच्या संदर्भात हा प्रश्न निर्माण झाला आहे. म्हणजे एकूण 20 टक्के शिक्षकाचा प्रश्न शिल्लक राहिलेला आहे. दिनांक 4 एप्रिल 2002 ला केन्द्र सरकारने त्यांच्या प्राथमिक शिक्षकांना जी वेतनश्रेणी लागू केली होती ती वेतनश्रेणी जशीच्या तशी आपल्या राज्यातील शिक्षकांना लागू करणे एवढाच फक्त प्रश्न आहे. या संदर्भात आता पर्यन्त चार पाच वेळा प्रश्न विचारण्यात आला होता .दिनांक 2.6.2004 ला हा प्रश्न विचारण्यात आला होता. त्यावेळी आम्ही असे म्हटले होते की, शासनाचा निषेध करुन आम्ही बाहेर जातो. तेव्हा सभापती महोदय, आपण असे म्हटले होते की," या बाबतीत निषेघ करण्याचा काही प्रश्न नाही. सल्ला देण्याच्या बाबतीत वित्त विभागाने एवढे दिवस का लावले ?" या प्रश्नाच्या बाबतीत निश्चित उत्तर सरकारने द्यावे यासाठी आपण हा प्रश्न राखून ठेवला होता. त्यानंतर शासनाने वित्त विभागाबरोबर चर्चा केली होती आणि हा प्रश्न पुन्हा सभागृहात उपस्थित करण्यात आला होता. दिनांक 2.6.2004 ला हा प्रश्न पुन्हा सभागृहासमोर आला होता.त्यावेळी माननीय राज्यमंत्र्यांनी स्पष्टपणे आश्वासन दिले होते. त्यांनी असे आश्वासन दिले होते की, " या बाबतीत जास्तीत जास्त दोन महिन्यात निर्णय घेतो. "आज या प्रश्नाला उत्तर देतांना असे सांगण्यात आले आहे की," हा प्रस्ताव विचाराधीन

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

आहे." या अगोदर 7 एप्रिल 2004 ला असे उत्तर देण्यात आले होते की," हा प्रस्ताव असमानता समितीकडे पाठवितो." तेव्हा ही समिती कशासाठी नेमण्यात आली होती ? या शिक्षकाकडून अधिक कामाची अपेक्षा केली जाते त्याबाबतीत मी आपल्याला सांगू इच्छितो की, ते शिक्षक निश्चित जास्त काम करतील. परंतु 20 टक्के शिक्षकांवर आपण अन्याय करु नका. दिनांक 2 जून 2004 ला माननीय राज्यमंत्र्यांनी जे आश्वासन दिले होते त्या आश्वासनाप्रमाणे जास्तीत जास्त दोन महिन्यात निर्णय घ्यावयास पाहिजे परंतु अजूनही निर्णय घेण्यात आला नाही. तेव्हा येत्या दोन तीन महिन्यात हा प्रश्न निकाली काढला गेला पाहिजे. माननीय मंत्रिमहोदय दोन तीन महिन्यात हा प्रश्न निकाली काढणार आहेत काय ? असा प्रश्न मला त्यांना विचारावयाचा आहे.आश्वासनाची पूर्तता जर होत नसेल तर माननीय मंत्रीमहोदय आश्वासन का देतात ? तसेच अधिक कामाची भाषा का करतात.? यापूर्वी जे आश्वासन दिले होते त्या आश्वासनाची पूर्तता केली पाहिजे किंवा पुन्हा आश्वासन देऊन त्याची पूर्तता निश्चितपणे येत्या दोन महिन्यात केली पाहिजे. तेव्हा त्याप्रमाणे पुन्हा आश्वासन देऊन त्याची पूर्तता केली जाईल काय ?

श्री.हसन मुश्रीफ : सभापती महोदय, मी मघाशी उत्तर दिले आहे की या प्राथमिक शिक्षकांना सुधारित वेतनश्रेणी देण्याबाबतचा प्रस्ताव असमानता समितीकडे पाठविण्यात आला आहे आणि त्यांना लवकरात लवकर निर्णय घेण्यास सांगण्यात येईल व त्यानंतर त्यांनी घेतलेल्या निर्णयाची अंमलबजावणी लवकरात लवकर करण्यात येईल.

श्री.दिवाकर रावते :सभापती महोदय, प्राथमिक शिक्षकांना सुधारित वेतनश्रेणी देण्याच्या बाबतीत सन्माननीय सदस्य श्री.व्ही.यु.डायगव्हाणे यांनी जे सांगितले आहे त्याबद्दल माझे दुमत नाही.या प्राथमिक शिक्षकांना सुधारित वेतनश्रेणी मिळण्याबाबत या सभागृहात प्रत्येक वेळी प्रश्न मांडण्यात येतो . परंतु या राज्यातील 8 लाख 30 हजार विद्यार्थ्यांना लिहिता वाचता येत नाही तेव्हा यास जबाबदार असणा-या प्राथमिक शिक्षकांवर कोणती कारवाई करण्यात येणार आहे याचेसुध्दा माननीय मंत्रिमहोदयांनी उत्तर दिले पाहिजे.

श्री.हसन मुश्रीफ : सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी जे सांगितले आहे ते खरे आहे. राज्यातील दुसरी ते सातवी पर्यन्तच्या 8 लाख 31 हजार 74 मुलांना लिहिता वाचता येत नाही ही गोष्ट आपल्यासारख्या प्रगत राज्यास भूषणावह नाही .....

(एकाच वेळी अनेक सन्माननीय सदस्य बोलतात) 3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती : सन्माननीय सदस्यांना मी सांगू इच्छितो की, माननीय मंत्रिमहोदयांचे उत्तर पूर्ण झ ााल्यानंतर मी त्यांना पुन्हा प्रश्न विचारण्याची परवानगी देईन.

श्री.हसन मुश्रीफ :सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी उपस्थित केलेला प्रश्न वेगळा आहे. शिक्षकांच्या पगाराच्या संदर्भात आपण नेहमी चर्चा करतो. परंतु शैक्षणिक दर्जेच्या संदर्भातसुध्दा चर्चा करणे गरजेचे आहे. सन्माननीय सदस्य श्री. रावते यांच्या सूचनेशी मी सहमत आहे.शैक्षणिक दर्जेच्या संदर्भात लक्षवेधी सूचनेच्या रुपाने किंवा वेगळया प्रश्नाच्या माध्यमातून चर्चा होणे आवश्यक आहे.

नंतर श्री.सुंबरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.5637 ...

प्रा. बी.टी.देशमुख : सभापती महोदय, मूळ प्रश्नाला डायव्हर्ट करणाऱ्या प्रश्नाला 'स्वतंत्र चर्चा करावी' असे उत्तर राज्यमंत्र्यांनी दिले त्याचे मी स्वागत करतो. या ठिकाणी असमानता समितीचा प्रश्नच उद्‌भवत नाही. कारण केंद्र सरकारच्या कर्मचाऱ्यांना ज्या वेतनश्रेण्या दिल्या जातील त्या वेतनश्रेणी महाराष्ट्रातील समकक्ष पदांना लागू करण्यात येतील असा धोरणात्मक निर्णय आपल्या राज्य सरकारने यापूर्वीच घेतलेला आहे आणि त्यामध्ये या क्षणापर्यंत तरी बदल केलेला नाही. मध्यंतरी 4.4.2002 ला केंद्र सरकारने प्राथमिक शिक्षकांच्या बाबतीत चूक झाली म्हणून एक छोटीशी दुरूस्ती केलेली आहे. त्याबाबतीत येथे सांगण्याचा प्रयत्न केला जातो की हे केलेलेच नाही म्हणून ते करावे लागले. पण मग 4.4.2002 चे ते परिपत्रक विदर्भ प्राथमिक शिक्षक संघाने आपल्याला त्याची झेरॉक्स प्रत पाठवून लक्षात आणून दिले त्यावर सभागृहामध्ये चर्चा झाली असता त्यांनी झेरॉक्स प्रत पाठविली आहे, मूळ प्रत पाठविलेली नाही म्हणून शासनाकडून सांगण्यात आले. तेव्हा आपल्याला आम्ही झेरॉक्स प्रत दिली असताही त्याची मूळ प्रत केंद्र सरकारकडून मागवून घेण्यास वेळ लागत होता. तर मग दुसऱ्या कोणाच्या बाबतीत अशा प्रकारच्या करेक्शन्स आलेल्या आहेत काय ते तरी आपण सांगावे. ..

श्री. हसन मुश्रीफ : ते तपासून पाहण्यात येईल.

श्री. दिवाकर रावते : त्यावेळेस या बाबतीत येथे अर्धा तास चर्चा झालेली होती आणि मूळ प्रत मागवून घेण्या विषय सभापती महोदय, आपण मंत्र्यांना निर्देश दिले होते.

प्रा. बी.टी.देशमुख : सभापती महोदय, समानीकरण समितीकडे आपण एखादी बाब केव्हा पाठवितो ? तर त्याबद्दल काही भ्रम निर्माण झाला असेल तर पाठवितो. परंतु या ठिकाणी तीन विभागामध्ये लहानशी चूक झालेली होती म्हणून केंद्र सरकारने त्याला एक छोटीशी करेक्शन सुचविली. विदर्भ माध्यमिक शिक्षक संघाच्या उपाध्यक्षांनी आपल्याला नोटीस देऊन ही गोष्ट आपल्या निदर्शनास आणून दिली आहे. पण त्यांनी झेरॉक्स प्रत दिली म्हणून आपण सांगितल्यावर सभापती महोदय आपण सरकारला सांगितले की, झेरॉक्स प्रत त्यांनी तुम्हाला दिलेली आहे तेव्हा त्याची मूळ प्रत आता तुम्ही मिळविली पाहिजे आणि ते राज्यमंत्र्यांनी तेव्हा मान्यही केले आणि त्याप्रमाणे मूळ प्रत त्यांनी मागविली. तेव्हा अशा प्रकारच्या करेक्शन्स अन्य दुसऱ्या कोणाच्याही बाबतीत आलेल्या नाहीत. तेव्हा सभापती महोदय, गेल्या वेळेस जेव्हा हा प्रश्न सभागृहामध्ये आला होता

..... आय 2 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. बी.टी.देशमुख (पुढे चालू...) ता.प्र.क्र.5637 ...

तेव्हा माननीय राज्यमंत्र्यांनी उत्तर दिले होते की, या बाबतीत दोन महिन्यात निर्णय घेण्यात येईल. आणि आता येथे उत्तर देत आहेत की, हे पहावे लागेल. तर मग हा प्रश्न राखून ठेवावा अशी सभापती महोदय, आम्हाला आपल्याकडे मागणी करावी लागेल. खरे म्हणजे या बाबतीत मंत्रिमंडळा समोर यांनी बरोबर मांडायला नको का ?

सभापती : याबाबतीत माननीय राज्यमंत्र्यांना सांगितले पाहिजे की, यापूर्वी आपण उत्तर दिले आहे तर त्याबाबतीत जे उत्तर दिलेले आहे त्या अनुषंगानेच आपल्याला पुढे जायला पाहिजे.

श्री. हसन मुश्रीफ : सभापती महोदय, मी मघाशी सांगितले आहे की, लौकरात लौकर ही बाब असमानता समितीकडे जाईल यासाठी आम्ही पाठपुरावा करू.

प्रा. बी.टी.देशमुख : पण सभापती महोदय, यामध्ये असमानता समितीचा काही संबंधच येत नाही. .. असमानता समितीचा हा विषयच नाही ना. ..

श्री. हसन मुश्रीफ : सन्माननीय सदस्य पोटतिडकीने जे सांगत आहेत त्याबद्दल मी आपल्या मार्फत त्यांना सांगू इच्छितो की, शेवटी कोठल्याही निधीची तरतूद करावयाची झाल्यास आपल्याला त्यासाठी वित्त विभागाकडे ती बाब पाठवावी लागते आणि वित्त विभाग जे सांगेन त्यानुसार करावे लागते. आता वित्त विभागाकडे ही बाब आपण पाठविली असता वेतन असमानता समितीपुढे ही बाब ठेवली पाहिजे असे वित्त विभागाने आपल्याला सांगितले आहे. त्याप्रमाणे असमानता समितीपुढे ही बाब लौकरात लौकर आणण्याच्या दृष्टीने आपण निश्चितपणे पाठपुरावा करू.

प्रा. बी.टी.देशमुख : जसा आपण यावर जास्त उजेड पाडू तसेच होईल की नाही ? यामध्ये समानता ठरविण्याचा हा प्रश्नच नाही. कालही येथे असेच झाले. हा धोरणात्मक निर्णय आहे तर मग त्या संदर्भात मंत्रिमंडळासमोर जाताना ज्यांच्याबद्दल हायकोर्टाचा निर्णय झालेला आहे त्यांच्या बाबतीत हे लागू केलेले आहे हे शासनाने मंत्रिमंडळाला सांगावयास पाहिजे होते. म्हणजेच त्यांचेपुढे प्रेझेंटेशन कसे करावयाचे याची जबाबदारी तुमची आहे. आता याही बाबतीत मंत्रिमंडळाला आपण सांगितले पाहिजे की, याबाबत धोरणात्मक निर्णय असा असा आहे आणि आता यातील एका बाबीसंबंधात केंद्राने करेक्शन केलेली आहे त्यानुसार आपल्यालाही करावी लागेल. हा वेतन असमानता समितीकडे पाठविण्याचा विषयच नाही. हा प्राथमिक शिक्षकांच्या बाबतीतील प्रश्न

...... आय 3 ...

KBS/KGS/MAPण श्री.गायकवाड नंतर --- 14:40

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

आहे त्याबद्दल आपल्याला झोपेमध्ये स्वप्न पडले होते का ? केंद्र सरकारने आपल्याला कळविले आहे असे आपण वित्त विभागाला सांगितले का ? सभापती महोदय, या संदर्भात 2 जून 2004 ला याच सभागृहामध्ये माननीय राज्यमंत्र्यांनी सरळ सरळ उत्तर दिलेले आहे की, ...

(यानंतर श्री.जागडे ..... जे 1 ...

अस्ुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

.....5637......

श्री. बी. टी. देशमुख.....

" या संबंधी जास्तीत जास्त दोन महिन्यात निर्णय घेण्यात येईल. " असे उत्तर माननीय मंत्रिमहोदय देणार असतील आणि कार्यवाही काहीच होणार नसेल तर सभागृहात चर्चा कशासाठी करावयाची ?

श्री. हसन मुश्रीफ : सभापती महोदय, यासाठी 30 कोटी रुपये लागणार आहेत. माननीय सदस्य श्री. बी. टी. देशमुख यांनी सांगितल्याप्रमाणे आम्ही या बाबत कॅबिनेटला चांगले फिडींग करु. सभापती महोदय, राज्य शासनाने 4500-7000, 5000-8000 आणि 5500-9000 अशा प्रकारची वेतनश्रेणी दिलेली आहे. केंद्र सरकारने आपली चूक सुधारुन 4500-7000, 5500-9000 आणि 6500-10500 अशी वेतनश्रेणी दिलेली आहे. सभापती महोदय, कॅबिनेटसमोर ज्यावेळी चर्चा होत असते, तेव्हा संपूर्ण राज्याचा विचार करुन चर्चा करण्यात येते व निर्णय घेण्यात येतो. कॅबिनेटला असे वाटले असेल की, हा निर्णय शासनाने लागू केला तर इतरही शिक्षकांना अशा प्रकारची वेतनश्रेणी द्यावी लागेल. आता या विषयाबाबत आम्ही कॅबिनेटला पटवून या बाबतचा निर्णय लवकरात लवकर करु.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, या प्रश्नावर यापूर्वीही चर्चा झाली आहे. या ठिकाणी केंद्र सरकारने आपली चूक दुरुस्ती आहे. त्याप्रमाणे राज्य सरकारला ही चूक दुरुस्त करुन त्या बाबतचा जी. आर. काढावयाचा आहे. त्यामुळे कॅबिनेटसमोर जाण्याचा हा प्रश्न आहे. केंद्र शासनाने ज्या प्रमाणे ही चूक दुरुस्त केली आहे, त्या प्रमाणे राज्य सरकारने ही चूक दुरुस्त करावयाची आहे. माननीय मंत्रिमहोदयांनी या ठिकाणी असमानता समितीचा उल्लेख केला आहे. तो बरोबर नाही. सभापती महोदय, या विषयाबाबत यापूर्वी चर्चा झाली आहे. तेव्हा माननीय सभापती महोदयानी आपल्या दालनात शिक्षक आमदार तसेच माननीय मंत्रिमहोदयांना बोलावून या प्रश्नावर चर्चा करावी. त्यानंतर माननीय सभापती महोदयांनी शासनाला आदेश द्यावेत.

सभापती : माननीय सदस्य श्री. नितीन गडकरी यांनी सूचना केल्याप्रमाणे या प्रश्नाबाबत मी माझ्या दालनात एक बैठक आयोजित करतो. त्या बैठकीला माननीय मंत्रिमहोदय तसेच शिक्षक आमदारांना बोलावितो.

श्री. हसन मुश्रीफ : हे मला मान्य आहे.

..2..

19-07-2005 (असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही) J 2

ASJ/ KGS/ MAP/ 14:45

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

.....5637......

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, हा प्रश्न सोडविण्यासाठी आपण आपल्या दालनात एक बैठक आयोजित केली आहे. हा आपला निर्णय योग्य आहे. यापूर्वी हा प्रश्न या सभागृहात चर्चेला आला होता, त्यावेळी सभागृहाचा अर्धा तास फुकट गेला आहे. आताही जवळपास अर्धा तास या प्रश्नावर चर्चा सुरु आहे. सभापती महोदय, दुसरी बाब अशी आहे की, अजूनही राज्यातील सातवीच्या मुलांना लिहिता वाचता येत नाही. मी सदनाचे लक्ष प्रश्न क्र. 5802 कडे वेधीत आहे. या प्रश्नाच्या उत्तरामध्ये असे म्हटले आहे की, " इयत्ता सातवी पर्यन्तच्या 2236 विद्यार्थ्यांना लेख, वाचन व गणिताच्या क्रिया येत नसल्याचे आढळले आहे." आता या बाबतचेही नियोजन होण्याची आवश्यकता आहे.

(गोंधळ)

सभापती : माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांची तळमळ मी समजू शकतो. त्यांचे म्हणणे बरोबर आहे. माननीय सदस्य श्री. नितीन गडकरी यांनी एक सूचना केली आहे. त्या प्रमाणे या प्रश्नासंबंधी एक बैठक मी माझ्या दालनात आयोजित करतो. त्या बैठकीला शिक्षक आमदार आणि मंत्रिमहोदयांना बोलावितो. मी आता पुढील प्रश्नावर जात आहे.

--

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

औरंगाबाद शहराला पुरवठा करणाऱ्या निळ्या रॉकेलमध्ये भेसळ करण्यासाठी

नेण्यात येणारे ६ टँकर कसाब खेड्यातील केंद्रावर पकडल्याबाबत

(४) * ६६०४ श्री. श्रीकांत जोशी : सन्माननीय अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद शहराला पुरवठा होणाऱ्या निळ्या रॉकेलच्या १२ टँकर पैकी ६ टँकर कसाब खेड्यातील केंद्रावर नेऊन निळ्या रॉकेलचे पांढरे रॉकेल करुन मोंढ्यात नेऊन विकणार असल्याचे दिनांक २० एप्रिल, २००५ रोजी वा त्यासुमारास आढळून आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार संबंधितांवर कोणती कारवाई करण्यात आली वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप कारवाई केली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. बाबा सिध्दीकी, **श्री. सुनिल तटकरे यांच्याकरिता** : (१) खुल्ताबाद (जि.औरंगाबाद) तालुक्यातील कसाबखेडा फाट्याजवळ अवैधरित्या विक्रीसाठी जाणारे रॉकेलचे ३ व नाफ्त्याचा १ टँकर दिनांक १८.०५.२००५ रोजी नागरिकांनी पकडले आहेत हे खरे आहे.

(२) होय.

(३) व (४) याप्रकरणी पोलीस स्टेशन खुल्ताबाद येथे जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ अंतर्गत गुन्हा क्र. ६४/२००५ दाखल करण्यात आला असून पुढील पोलीस तपास चालू आहे.

श्री. श्रीकांत जोशी : सभापती महोदय, यापूर्वी निळ्या कलरचे 560 लीटर रॉकेल सापडले होते. आता नागरिकांनी 48 हजार लीटर रॉकेल पकडले आहे. यावरुन या राज्यात या बाबतचा कारभार कसा चालला आहे, हे दिसून येईल. दि. 19 आणि 20 एप्रिलच्या लोकमतच्या अंकात या बाबतचे दोन लेख छापून आले आहेत. सभापती महोदय, खुल्ताबाद तालुक्यातील कसाबखेडा फाट्याजवळ असमतभाई नावाचा माणूस निळ्याचे पांढरे आणि पांढ-याचे निळे रॉकेल करण्यामध्ये एक्सपर्ट आहे. लोकमत या दैनिकाच्या 20 एप्रिलच्या लेखात म्हटल्याप्रमाणे संभाजीनगर म्हणजेच औरंगाबाद शहरात जाणा-या 12 टँकरपैकी 6 टँकरमधील रॉकेल काळ्याबाजारात जात असते.

(यानंतर श्री.सरफरे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 6604...

श्री. श्रीकांत जोशी....

सभापती महोदय, त्यानंतर सातत्याने त्याठिकाणी टँकर जात होता. शहरामध्ये आलेला टँकर काळया बाजारामध्ये भेसळ करण्यासाठी जात होता. तरीही शासनाच्या पुरवठा विभागाने 18 मे पर्यंत त्या टँकरबाबत कोणतीही कारवाई केली नाही म्हणून कसाबखेडयातील नागरिकांनी जाऊन तो टँकर पकडला. त्यावेळी काळा बाजार करणाऱ्याने सांगितले की, दर महिन्याला 2 कोटी रुपयांची उलाढाल या व्यवहारामध्ये होते. त्यातील विशिष्ट रक्कम शासनाच्या पोलीस आणि पुरवठा विभागाला वेळोवेळी दिली जाते.तेव्हा याबाबतीत माझा नेमका प्रश्न असा आहे की, या व्यवहारामध्ये पुरवठा विभागाचा नेमका हप्ता किती आहे? या प्रश्नाचे आपण "नाही" असे उत्तर दिले तर मग मला पुढील प्रश्न विचारावे लागतील. ते म्हणजे या टँकरमधून आणला जाणारा नाफ्था कुणी पुरविला? आणि तो कसा आणला गेला? या टँकरचा मालक कोण आहे? या टँकरमध्ये असलेला माल हा कसाबखेडयाच्या केंद्रावर उतरविला अशाप्रकारची बातमी 20 एप्रिलच्या लोकमतमध्ये छापून आलेली असतांना 18 मे पर्यंत आपण हे केंद्र बंद करण्याची कारवाई कां केली नाही? त्याचप्रमाणे मोंढयामध्ये एक किरकोळ विक्रीचे केंद्र आहे. त्यामध्ये सुध्दा एक पोलीस अधिकारी सामील आहे काय?

श्री. बाबा सिद्दीकी : सभापति महोदय, टँकर नं. जीजे-12डब्ल्यू7909 शुभालक्ष्मी रेमेडीज, कांडला से शुरु हुआ था और खरगोन, मध्य प्रदेश के लिए जा रहा था. दूसरे टँकर का नं. एमएच.-04पी5259 है और यह वेंकटेश पेट्रोकेमीकल्स, वापी से बंगलौर जा रहा था. तीसरे टँकर का नं. एमएच-26बी4459 है और यह वामोटीवाला केमीकल्स, मोहोड से नागपुर के लिए जा रहा था. चौथे टँकर का नं. एमएच-04एएल3433 है और यह वामोटीवाला केमीकल्स, मोहोड से नागपुर के लिए जा रहा था. इन टँकर्स के पास जो पेपर्स मिले हैं, उनसे इस प्रकार की मालूमात शासन को मिली है. इस बारे में चौकशी चालू है कि हकीकत में ये टँकर्स कहां से शुरु हुए थे और कहां पर जा रहे थे. पहले टँकर के ड्राइवर का नाम रेवतराम पवार है, दूसरे टँकर के ड्राइवर का नाम राजेश यादव है, तीसरे टँकर के ड्राइवर का नाम जवाहर लाल यादव है और चौथे टँकर के ड्राइवर का नाम मनोज कुमार यादव है. टँकर्स के मालिकों के नाम इस प्रकार से

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 6604...

श्री. बाबा सिद्दीकी...

है : (1)भगवानभाई भोजवानी, नवी मुंबई (2) विनोद कुमार यादव, नवी मुंबई (3) लालजी तिवारी, भिवंडी (4) रामनरायण शुभेदारसिन्हा, नवी मुंबई.

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.6604 . . . .

श्री.गुरुमुख जागवानी : सभापति महोदय, मैं मा. मंत्री महोदय से यह पूछना चाहता हूँ कि जब कोई डीलर केरोसिन की कालाबाजारी करते हुए पकड़ा जाता है और जिलाधिकारी उसका लाइसेंस सस्पेंड कर देते हैं तो फिर डीलर के पास ऐसा कौन सा जादू है, जिसकी वजह से मंत्री महोदय उसको स्टे दे देते हैं और यह स्टे 2-3 साल तक रहता है. जलगांव शहर में ऐसा एक प्रकरण हुआ, जिसमें 15 दिन के अन्दर मंत्री महोदय ने स्टे दे दिया. मेरा प्रश्न यह है कि ऐसे कितने मामले हैं जिनमें जिलाधिकारी ने लाइसेंस सस्पेंड कर दिया है और उसके बाद मंत्री महोदय से स्टे मिला है ? जब टँकर पकड़ा जाता है तो आप ड्राइवर के ऊपर कार्रवाई करते हैं, मालिक के ऊपर कार्रवाई नहीं करते हैं तो मेरा प्रश्न यह है कि आपने कितने मालिकों के ऊपर कार्रवाई की है ?

श्री.बाबा सिद्दीकी : सभापति महोदय, यह प्रश्न अलग है, लेकिन प्रश्न गंभीर है, इसलिए मैं इस प्रश्न का जबाब देना चाहता हूँ.

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे . . . .

श्री.बाबा सिद्दीकी : सभापति महोदय, स्टे के बारे में माननीय सदस्य ने प्रश्न पूछा है तो मैं उनको बताना चाहता हूँ कि स्टे नेचुरल जस्टिस के हिसाब से दिया जाता है और यह सभी के शासनकाल में दिया जाता है. स्टे देने के बाद उसकी सुनवाई होती है और उसके ऊपर निर्णय दिया जाता है. मालिकों की यादी इस समय मेरे पास नहीं है, वह मैं सभागृह के पटल पर रख दूंगा.

श्री.श्रीकांत जोशी : सभापती महोदय, जो टँकर पकडण्यात आला, त्याच्या मालकावर जीवनावश्यक वस्तू कायद्यानुसार कारवाई झाली आहे का ? त्याच्यावर केसेस दाखल केली आहे का ?

श्री.बाबा सिद्दीकी : सभापति महोदय, चारों टँकर्स के ड्रायवर्स के ऊपर कार्रवाई हो रही है.

(अनेक सन्माननीय सदस्य एकदम बोलतात)

श्री.बाबा सिद्दीकी : सभापती महोदय, मला संरक्षण पाहिजे. टॅकर्स के ड्रायवर्स का उनके ओनर के साथ में काम के बारे में एग्रीमेंट हुआ है. यह एग्रीमेंट कोर्ट में नोटराइज किया हुआ है, पुलिस इस बारे में चौकशी कर रही है.

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.6604 . . . .

श्री.श्रीकांत जोशी : सभापती महोदय, माझ्या प्रश्नाचे उत्तर आलेले नाही.

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, कांडला पोर्ट हे अडाणी कंपनीचे पोर्ट आहे. ते इम्पोर्ट करुन माल आणतात आणि हाय सीजमध्ये मालाची विक्री केल्याचे दाखवतात. खोटी बिले तयार करतात, कोईमतूर, मुंबईची बिले दाखवतात. त्याकरता नवी मुंबईचे टँकर भाडयाने लावतात. सन्माननीय मंत्री श्री.गावितसाहेबांनी देखील हे माहिती आहे. याचे धुळयात बरेच एक्सपर्ट आहेत. यामध्ये दोन-तीन महत्वाच्या गोष्टी आहेत. पहिली गोष्ट अशी की, नाफ्ता आणि रॉकेलचा माल मिळाला आहे. तर हा माल कोणाचा आहे ? याबाबतीत केवळ ड्रायव्हरवर कारवाई केली जाते ? मी एक उदाहरण देतो. परवा नागपूरला एक टँकर पकडला आहे. ज्याचा टँकर पकडला गेला, त्याने पत्र दिले की, माझा टँकर चोरीला गेला आहे. मग पोलिसांनी रेकॉर्ड तयार करुन हॅबीच्युअल ऑफेंन्डर न दाखवता ती केस संपविली. पण यामध्ये मुख्य मासा हा अडाणी आहे. त्याचा इम्पोर्ट केलेला नाफ्ता आणि रॉकेल आहे. तो कांडला बंदरामध्ये उतरतो. तो त्याचा सेल्स टॅक्स भरत नाही. खोटे "सी" फॉर्म दिले जातात. त्यामध्ये बंगलोर, कोईमतूरचे नाव लावले जाते आणि ते औरंगाबादमध्ये आणून ओतले जाते आणि शेवटी तुम्ही केवळ ड्रायव्हरला पकडता. पण हा माल कोणाकडे आला आहे ? कोणाकडून आला आहे ? याचा सोर्स काय आहे ? यादृष्टीने शासनाने काय कारवाई केली ? हे महत्वाचे आहे. ड्रायव्हरवर कारवाई केली जाते. त्याच्यावर केस झाली की, कंपनीतर्फे त्याला 1 लाख रुपये देतात आणि सांगतात की, तू आरोपी बन. त्यामुळे ते ड्रायव्हर आत जातात, नंतर बाहेर येतात. हे आता हॅबीच्युअल झालेले आहे. पण यामध्ये मुख्य माणूस कोण आहे ? तो माल कोणाकडे जात होता ? हा माल जेथून निघाला, त्या कंपनीचे नाव काय आहे ? त्याचा सोर्स काय आहे ? त्याचा मालक कोण आहे ? तसेच ट्रान्सपोर्ट कंपनीचा मालक कोण आहे ? यादृष्टीने शासनाने कोणती कारवाई केली आहे ?

श्री.बाबा सिद्दीकी : सभापति महोदय, माननीय सदस्य श्री. गडकरी जी ने जो जानकारी दी है, वह बहुत गंभीर है और पुलिस इस बारे में चौकशी कर रही है. पुलिस इस पूरे मामले की जांच करेगी और जो लोग दोषी पाएं जाएंगे, उनके खिलाफ कार्रवाई की जाएगी.

श्री नितीन गड़करी : आप टँकर जब्त करते हैं, ड्राईवर पर कार्रवाई करते है... यहां हाऊस में आने के बाद कहते हो कि जांच करेंगे....

. . . .एल-3

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.6604 . . . .

श्री बाबा सिद्दीकी : सभापति महोदय, टँकर के ड्राईवर के पास पुरावा मिला है. उनके पास एग्रीमेंट मिला है. ओनर ऑफ व्हीकल के बारे में भी जांच चालू है. जांच में अगर टँकर का मालिक दोषी पाया जाएगा अथवा जांच में अगर यह पता चलेगा कि झूठा एग्रीमेंट किया गया था, तो उसके बारे में भी सख्त से सख्त कार्रवाई की जाएगी.

यानंतर श्री.किल्लेदार . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.6604 (पुढे सुरु....

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, आपण मला संरक्षण द्यावे. या प्रकरणामध्ये खरे गुन्हेगार हे ट्रक मालक आणि ट्रान्सपोर्टचे मालक आहेत. यामध्ये जो 3 हजार रुपये पगार घेणारा ड्रायव्हर आहे, त्याला पकडलेले आहे. त्याला जामीन मिळाला. त्याची चौकशी सुरु आहे. मंत्री महोदयांना माल कोणाचा आहे, असे विचारले तर त्याची चौकशी सुरु आहे असे त्यांनी उत्तर दिले. म्हणजे जो खरा फ्रॉड करणारा ट्रक मालक आणि ट्रान्सपोर्टचा मालक आहे ते सुटलेले आहेत आणि महिना 3 हजार, 5 हजार रुपये पगार घेणारा ड्रायव्हर आहे, तो यामध्ये पकडला गेला, त्याच्यावर केस केलेली आहे. त्याची चौकशी सुरु आहे असे मंत्री महोदयांनी उत्तर दिले. परंतु करोडो रुपये मिळणारा खरा मासा खोटे सी फॉर्म, बी फॉर्म भरुन सरकारचा टॅक्स चुकवितो त्याला पकडले जात नाही. 2900 कोटी रुपये सरकारचे यांनी बुडविलेले आहेत याबाबत अर्थमंत्री महोदयांना मी पत्र दिलेले आहे. अशाप्रकारे सर्रास हा व्यवहार सुरु आहे. यामध्ये लपवाछपवी करुन ड्रायव्हरला अटक केल्याचे दाखविलेले आहे, ते योग्य वाटते काय, हा खरा प्रश्न आहे. सभापती महोदय, मला आपल्याकडून संरक्षण पाहिजे. या प्रकरणामध्ये सरकारला आपण आदेश द्यावेत की, या प्रकरणामध्ये ट्रकच्या, ट्रान्स्पोर्टच्या मालकाविरुध्द नॉन बेलेबल ऑफेन्सचा गुन्हा दाखल करुन त्यांच्यावर कारवाई करावी, त्यांना अटक करावी. दुसरे असे की, हा माल ज्या कंपनीकडून आलेला आहे, त्या कंपनीची बिले, त्या बिलांचा सेल्स टॅक्स क्रमांक, बी फॉर्म, हायसीजमध्ये व्यवहार केला त्याची चौकशी करावी. त्या ट्रान्सपोर्ट आणि ट्रक मालकाविरुध्द नॉन बेलेबल ऑफेन्सचा गुन्हा दाखल करण्याची कारवाई सरकार करेल काय ? हे करण्यासाठी चौकशीची गरज नाही. केस क्लअर आहे, त्यांना ताबडतोब अटक करण्याची कारवाई सरकार करेल काय ?

श्री.सुनील तटकरे : सभापती महोदय, सन्माननीय राज्यमंत्री महोदयांनी ड्रायव्हर आणि मालक यांच्यामध्ये जे ॲग्रीमेंट झाले त्याची माहिती सभागृहासमोर ठेवली. पण सन्माननीय श्री.गडकरी साहेबांनी जे सांगितले ती वस्तुस्थिती खरी आहे. अनेकवेळेला मालक ड्रायव्हरशी अशाप्रकारे ॲग्रीमेंट करुन त्यांना यामध्ये अडकविण्याचा प्रयत्न करुन ते सुटण्याचा प्रयत्न करतात. म्हणूनच या मालकांची नावे आम्ही शोधलेली आहेत. मी सभागृहाला सांगू इच्छितो की या मालकांवर ताबडतोबीने इसेन्सियल कमोडीटी ॲक्टखाली गुन्हा दाखल करुन नॉन बेलेबल गुन्हा दाखल करुन, योग्य ती कारवाई केली जाईल. जे कागदपत्रे ड्रायव्हरकडे उपलब्ध होती

त्यामध्ये माल कोठून आला आणि कोठे जाणारा होता याची माहिती दिलेली आहे. त्याप्रमाणे त्या संबंधीत कंपनीकडे पोलिसांना पाठवून खरोखर त्यांच्याकडून माल निघाला होता की नाही, याची माहिती घेण्यात येईल. त्यामध्ये दोष आढळून आला तर जेथून माल आणला गेला त्यांच्यावर कारवाई करण्यात येईल. ज्यांच्याकडे माल जाणार होता, त्यांच्याकडे त्याबाबत काय माहिती आहे याची देखील माहिती घेऊन योग्य ती कारवाई निश्चितपणे केली जाईल.

श्री.पांडुरंग फुंडकर : सन्माननीय मंत्री महोदयांनी ट्रक मालक आणि ट्रान्सपोर्टचे मालक यांच्यावर ताबडतोब कारवाई करु असे सांगितले. माझा प्रश्न असा आहे की, संभाजीनगरमध्ये 6 टँकर अशाप्रकारचे आढळून आल्याची माहिती दै.'लोकमत' या वर्तमानपत्रामध्ये 20 एप्रिलला आली. त्यानंतर 20 एप्रिल ते 18 मे 2005 यामध्ये जवळपास एक महिन्याचा कालावधी उलटून गेला. या एक महिन्याच्या कालावधीमध्ये आपले जिल्हाधिकारी, पुरवठा अधिकारी, त्या विभागातील पोलीस अधिकारी हे काय करीत होते ? हे टँकर प्रशासनाने पकडले नाहीत तर ते जनतेने पकडले. या प्रकरणी माझा स्पेसिफिक प्रश्न असा आहे की, आपण जसे टँकरच्या मालकांवर कारवाई करणार आहात, त्याप्रमाणे ज्या पुरवठा अधिकाऱ्यांनी त्यांना एक महिना अभय दिलेले आहे त्या पुरवठा अधिकाऱ्यावर आपण कारवाई करणार आहात काय ?

श्री.सुनील तटकरे : सभापती महोदय, या संदर्भामध्ये वर्तमानपत्रामध्ये बातमी आली, त्या संदर्भामध्ये उशीरा कारवाई केली. याबाबतीमध्ये विभागाचे प्रधान सचिव यांना त्या ठिकाणी पाठवून त्याची चौकशी करण्यात येईल. त्यामध्ये जे दोषी आढळतील त्यांच्यावर कारवाई केली जाईल.

सभापती : प्रश्नोत्तराचा तास संपलेला आहे.

--

यानंतर कु.थोरात.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: लेखी उत्तरे.

मु.शी.: तारांकित प्रश्नोत्तराची यादी सभागृहासमोर ठेवणे.

सचिव : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सोमवार, दिनांक 18 जुलै, 2005 रोजीची तारांकित प्रश्नोत्तराची यादी सभागृहासमोर ठेवीत आहे.

सभापती : सोमवार, दिनांक 18 जुलै, 2005 ची तारांकित प्रश्नोत्तराची यादी सभागृहासमोर ठेवण्यात आली आहे.

(प्रेस : येथे सोबत जोडलेली यादी छापावी)

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सार्वजनिक उपक्रम समितीचा अहवाल सादर करणे.

श्री. अरविंद सावंत (समिती सदस्य) : अध्यक्ष महाराज, मी आपल्या अनुमतीने सार्वजनिक उपक्रम समितीचा पहिला अहवाल सभागृहाला सादर करतो.

सभापती महोदय, हा अहवाल महाराष्ट्र शहर व औद्योगिक विकास महामंडळ तसेच महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ यांच्या कामकाजासंबंधातील आहे. उद्योग विभाग तसेच महाराष्ट्र शहर व औद्योगिक विकास महामंडळाच्या प्रतिनिधंची साक्ष घेतांना समितीस असे आढळून आले की, या महामंडळाने 1996 मध्ये नवी मुंबई येथे 10 बँकिंग व 14 ऑफिसेसच्या जागा असलेले एक बँकिंग संकुल बांधले. हे बँकिंग संकुल कोणाचीही मागणी नसतांना तसेच प्रथम बुकींग करुन न घेताच बांधले. या प्रकल्पावर सुमारे 18 कोटीची गुंतवणूक केली व सन 1996 पासून आजमितीपर्यंत यापैकी एकही युनिट विकले गेले नसून, गेली सुमारे 9 वर्षे हे संकुल तसेच पडून आहे असे मी अतिशय खेदाने मांडीत आहे. सार्वजनिक उपक्रम समितीच्या बैठकांमध्ये सबंधित अधिका-यांची साक्ष घेतांना समितीसमोर जे आले त्यामुळे वेदना होतात. महामंडळाच्या कुठल्याही अधिका-याला याचे काहीच वाटत नाही. सुमारे 18 कोटींची गुंतवणूक व त्यावरील आजवरचे व्याज याचा हिशोब केला असता जवळजवळ 45 कोटी रुपये या प्रकल्पात विनाकारण अडकून पडले आहेत. समितीने या संबंधात या विवेकहीन व निष्फळ गुंतवणुकीस जबाबदार असलेल्या सर्व संबंधितावर या गैरकारभाराची जबाबदारी निश्चित करुन त्यांच्याकडून झालेले नुकसान भरुन घेण्याची शिफारस केलेली आहे. समितीने या संबंधात अशीही शिफारस केली आहे की, या प्रकल्पासंबंधात वापरात बदल (चेंज ऑफ यूज) करुन प्रकल्पात गुंतविलेला निधी जास्तीतजास्त कशा प्रकारे फलदायी करता येईल यादृष्टीने शासनाने व सिडको प्रशासनाने तातडीने पावले उचलावीत. येथे मला असे नमूद करावयाचे आहे की, या प्रकल्पाच्या चेंज ऑफ युज संबंधी तातडीने विचार करावा असे समितीने सूचविल्यानंतर त्यासंबंधीचा विचार करु असे अधिका-यांनी सांगितले. तोपर्यंत गेले नऊ वर्षे तो प्रकल्प तसाच पडून होता. या प्रकल्पाच्या चेंज ऑफ यूज संबंधी विचार करण्यात आला नव्हता.

दुस-या एका प्रकरणात समितीच्या असे निदर्शनास आले आहे की, सिडकोने केरळ राज्यातील कोची बेटाचा सर्वांगिण विकास करण्यासाठी सल्लागार म्हणून काम करण्याची जबाबदारी स्वीकारली. या संबंधातील पहिल्या टप्प्यातील कामावर सिडकोने केलेल्या 75 लाख

..3..

श्री. अरविंद सावंत....

रुपयांच्या खर्चापैकी जवळजवळ सर्व रक्कम सिडकोस परत मिळाली. मात्र दुस-या टप्यतील कामावर सिडकोने केलेल्या 5.5 कोटी खर्चाची भरपाई आजमितीपर्यंत होऊ शकली नाही. परतफेडीसंबंधात कोणतीही हमी नसतांना सिडकोने केलेल्या या अव्यापारी गुंतवणुकीस जबाबदार असणा-या तत्कालीन अधिका-यांची शासनाने खास अधिका-यांमार्फत चौकशी करुन त्यांच्यावर भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियमाखाली कारवाई करण्याची समितीने शिफारस केली आहे. समितीस या प्रकरणी असेही आढळून आले आहे की, संचालक मंडळाने या प्रकरणात सिडकोच्या व्यवस्थापकीय संचालकांवर दबाव आणून त्यांना ही गुंतवणूक करण्यास भाग पाडले. व्यवस्थापकीय संचालकांनी या दबावाची माहिती शासनास देऊन शासनाचे निदेश घेता आले असते. परंतु त्यांनी देखील तसे केले नाही. याबद्दल देखील समितीने आपली नापसंती व्यक्त केली आहे.

यानंतर श्री. बरवड..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरविंद सावंत ....

सभापती महोदय, दुसऱ्या एका प्रकरणात सिडकोने बेलापूर येथील एक भूखंड निविदा काढून 1994 मध्ये विकला. भूखंड घेणाऱ्या व्यक्तीने भाडे अधिमूल्याची व बयाणाची एकूण सुमारे 3 कोटी 60 लाख रुपयांची रक्कम कंपनीकडे भरली होती. त्यानंतर वर्षभरात त्या भूखंडाची पूर्ण किंमत म्हणजे 13.16 कोटी रुपये त्यांनी सिडकोकडे भरले. वाटपदाराने भूखंड परत केला तर भाडे अधिमूल्याची तसेच बयाणाची रक्कम जप्त करण्याची तरतूद करारात होती. परंतु त्यानंतर वाटपदाराने भूखंडावर अतिक्रमण असल्याची सबब पुढे करुन भूखंड ताब्यात घेण्याचे नाकारले व सिडकोने देखील वाटपदारास सुमारे 13.16 कोटी रुपयांची रक्कम परत केली. वास्तविक पाहता हे अतिक्रमण 2847.39 चौ.मी. क्षेत्रापैकी फक्त 10 चौ.मी.वर होते व ते देखील सिडकोने वाटपदारास त्याची संपूर्ण रक्कम परत करण्यापूर्वी काढून टाकले होते.

सभापती : सार्वजनिक उपक्रम समितीचा अहवाल आपण सभागृहाला सादर केलेला आहे आपण दोन तीन मिनिटात एखादा मुद्दा मांडला तर समजू शकतो.

श्री. अरविंद सावंत : सभापती महोदय, माझी आपल्याला विनंती आहे. ही अतिशय गंभीर बाब आहे. या ठिकाणी दोन्ही महामंडळांबद्दल दोन दोन वाक्ये बोलण्याची गरज आहे. विधानसभेमध्ये सार्वजनिक उपक्रम समितीचा अहवाल मांडत असताना माननीय समिती प्रमुखांनी 20 मिनिटे भाषण केले.

सभापती : आपणही या ठिकाणी 11 मिनिटे बोलला आहात.

श्री. अरविंद सावंत : माननीय सभापती महोदय, मी निश्चितच 11 मिनिटे बोललेलो नाही. यामध्ये दोन महामंडळांसंबंधीचा अहवाल आहे. याबाबत शासन गंभीर नाही हेच सार्वजनिक उपक्रम समितीला नजरेस आणून द्यावयाचे आहे. आतापर्यन्त जेवढे अहवाल सार्वजनिक उपक्रम समितीने सादर केलेले आहेत...

श्री. दिवाकर रावते : विधानसभेमध्ये हे मांडण्यात आलेले आहे.

सभापती : या सभागृहामध्ये सुध्दा सन्माननीय सदस्यांनी भरपूर मुद्दे मांडलेले आहेत.

..2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरविंद सावंत : सभापती महोदय, आम्ही समितीमध्ये काम करतो. समितीच्या अहवालाच्या संदर्भात कार्यवाही होत नसेल तर सगळया समित्या बरखास्त करा. सभापती महोदय, एस.टी. महामंडळाच्या संदर्भात सांगावयाचे म्हणजे एस.टी. महामंडळाने शहादा येथे तत्कालीन आमदारांच्या आग्रहास्तव एक बसस्थानक बांधले. ते स्थानक शहरापासून लांब आहे त्यामुळे त्या बसस्थानकात प्रवासी बसत नाहीत. त्या ठिकाणी 1.25 कोटी रुपये एवढी गुंतवणूक करण्यात आली आणि आजमितीस ते बसस्थानक तसेच पडून आहे. मध्यंतरी कोणी तरी कोर्टात गेले. कोटाने सांगितले की, हे स्थानक सुरु करा. त्याप्रमाणे त्या स्थानकाचा वापर सुरु झाला. त्या ठिकाणी डिझेल, पेट्रोल वाया चालले आहे.

सभापती : सन्माननीय सदस्य श्री. अरविंद सावंत यांना मी सांगू इच्छितो की, आपण जो अहवाल सभागृहाला सादर केला आहे तो आपल्यामार्फत शासनाकडे अंमलबजावणीसाठी जात असतो.

श्री. अरविंद सावंत : सभापती महोदय, मी शेवटची शिफारस वाचून आपले भाषण संपविणार आहे. मी आताच सांगितल्याप्रमाणे हे सर्व वाया जात आहे. समितीने शिफारस करताना यामध्ये हलगर्जीपणा करणारे जे अधिकारीवर्ग आहेत, दुर्दैवाने आय.ए.एस. अधिकाऱ्यांच्या बाबतीत सुध्दा यामध्ये पॉइन्ट आऊट करण्यात आले आहे. सभापती महोदय, गेली कित्येक वर्षे केवळ सार्वजनिक उपक्रम समितीच नव्हे तर आपल्या अनेक समित्या आपले अहवाल सभागृहास सादर करतात. त्यामध्ये या संदर्भात कारवाई करावी अशा शिफारशी करण्यात येतात. दुर्दैवाने आजपर्यन्त त्यासंदर्भात कारवाई केली जात नाही. आपण माननीय संसदीय कार्य मंत्र्यांना निदेश द्यावे की, समितीने केलेल्या शिफारशींबाबतचा अनुपालन अहवाल या सभागृहात तीन महिन्यांच्या आत सादर करावा किंवा पुढच्या अधिवेशनात सादर करावा. त्यातून शासनाने काय कार्यवाही केली ती कार्यवाही सभागृहाला सादर करावी. अशी विनंती करुन मी सार्वजनिक उपक्रम समितीचा अहवाल सभागृहास सादर करीत आहे.

सभापती : सार्वजनिक उपक्रम समितीचा अहवाल सभागृहास सादर झाला आहे.

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी.: औचित्याच्या मुद्दयासंबंधी.

(काही सन्माननीय सदस्य औचित्याचा मुद्दा मांडण्यासाठी परवानगी मागत असतात)

सभापती : औचित्याचा मुद्दा मांडण्याचा प्रकार या सभागृहामध्ये नाही. अपवाद म्हणून काही वेळा मी याबाबतीत परवानगी देतो. सन्माननीय सदस्य श्री. प्रमोद नवलकर यांनी मला एक औचित्याचा मुद्दा मांडण्याकरिता परवानगी मागितलेली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

श्री. प्रमोद नवलकर : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे. सर्व खेळांना उत्तेजन देणे हे आपल्या शासनाचे धोरण आहे. अनेकवेळा आपल्या माननीय मुख्यमंत्र्यांकडे हे खाते असते. त्यांना आपण सगळया सवलती देतो. सर्व प्रकारची आर्थिक मदत करतो. असे असताना काल भारतीय क्रिकेट संघामध्ये मुंबईच्या एकाही खेळाडूचा समावेश झालेला नाही ही अतिशय चिंताजनक बाब आहे. मी कोणावरही आरोप करु इच्छित नाही. परंतु या गोष्टीची दखल आपण घ्यावयास पाहिजे. या मुंबई शहरामध्ये 2 स्टेडियम्स आहेत. 12 जिमखाने आहेत आणि 340 पिचेस आहेत. त्यावर खर्च होतो. आपण सर्व प्रकारचे उत्तेजन देतो. असे असताना भारतीय संघात आपला एकही खेळाडू नाही.

यानंतर श्री.खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.प्रमोद नवलकर....

सचिन आजारी आहे. ज्या गांगुलीवर बंदी आहे त्याचा सोळावा खेळाडू म्हणून समावेश करण्यात आला आहे आणि एक जागा बॅन करुन टाकली आहे. बाकीच्या राज्यांना सवलती द्यावयाच्या आणि मुंबईला दुर्लक्षित करावयाचे असा हा प्रकार आहे. एक काळ असा होता की, मुंबईला क्रिकेटची पंढरी समजले जात होते, त्यावेळी मुंबईचे भारतीय संघामध्ये 10-10 खेळाडू असत आणि आता एकाही खेळाडूचा भारतीय संघात समावेश केलेला नाही. याचा अर्थ मुंबईला जगाच्या नकाशावरुन साफ करण्याचा कट आहे. हे सहज झालेले आहे असे मला तर वाटत नाही. अजित आगरकर सारख्या खेळाडूचा सहज समावेश होऊ शकला असता, परंतु त्याचाही समावेश करण्यात आला नाही. गांगुली बाद झाला नाही तर त्याचा समावेश करण्यात येईल म्हणजे कोर्टाचा निकाल त्याच्या बाजुने लागला तर त्याला संधी द्यावयाची म्हणजे हायकोर्टाच्या निर्णयावर नजर ठेवून हा निर्णय घेण्यात आलेला आहे. भारतीय संघामध्ये मुंबईचा एकही खेळाडू नसणे ही बाब निश्चितच चिंता करण्यासारखी असल्याने मी औचित्याच्या मुद्याद्वारे सभागृहाचे लक्ष वेधू इच्छितो.

सभापती : मा.सदस्य श्री.प्रमोद नवलकर यांनी महाराष्ट्राच्या आणि मुंबईच्यादृष्टीने अत्यंत महत्वाचा मुद्दा याठिकाणी उपस्थित केलेला आहे. सभागृहामध्ये मा.मंत्रिमहोदय श्री.दिलीप वळसे-पाटील आणि मा.क्रीडा मंत्री श्री.वसंत पुरके हे उपस्थित आहेत. त्यांनी या मुद्याच्या बाबतीत लक्ष घालावे.

श्री.दिलीप वळसे-पाटील : सभापती महोदय, मा.सदस्य श्री.प्रमोद नवलकर यांचा निरोप योग्य ठिकाणी कळवितो.

2....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ MHM/ SBT/

पृ.शी./मु.शी.: नियम 93 च्या सूचना

सभापती : आज काही नियम 93 च्या सूचना आलेल्या आहेत. सन्माननीय सदस्य सर्वश्री श्रीकांत जोशी, अशोक मोडक, विलास अवचट, पांडुरंग फुंडकर व इतर वि.प.स.यांनी "पश्चिम केमिकल्स औरंगाबाद येथे 15 जुलै, 2005 रोजी रसायनाचा स्फोट होऊन तीन कामगार ठार होणे, दिनांक 17 जुलै, 2005 रोजी पॉली पेट्रोकेम, दौंड येथे केमिकलचा स्फोट होऊन एक व्यक्ती गंभीर जखमी होणे" या विषयावर नियम 93 ची सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नाही. शासनाने निवेदन करावे असा निदेश देऊन मी या सूचनेस अनुमती नाकारीत आहे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री.कन्हैयालाल गिडवाणी यांनी "अपारंपारिक ऊर्जा स्त्रोताच्या विकासासाठी राज्यात वीज विक्रीच्या करातून जमा केलेला 84 कोटी रुपयांचा निधी गायब झाल्याचे दि.11 जुलै, 2005 रोजी उघडकीस येणे" या विषयावर नियम 93 ची सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नाही. शासनाने निवेदन करावे असा निदेश देऊन मी या सूचनेस अनुमती नाकारीत आहे.

यानंतर सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गो-हे यांनी "दिनांक 18.7.2005 रोजी मुंबईतील कुर्ला, दादर, सीएसटी रेल्वे स्थानकावर घातपात घडवून आणण्याबाबतचे मुंबई पोलिसांना प्राप्त झ ाालेले पत्र" या विषयावर नियम 93 ची सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नाही. शासनाने निवेदन करावे असा निदेश देऊन मी या सूचनेस अनुमती नाकारीत आहे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री नितीन गडकरी व इतर वि.प.स. यांनी "चुकीच्या कर्ज मंजुरीमुळे डबघाईस आलेल्या साऊथ इंडियन कॉ-ऑप.बँकेच्या कर्ज मंजुरी प्रकरणामध्ये बँकेचे अध्यक्ष श्री.राघवन यांचा सहभाग असल्याचे दि.19.7.2005 रोजी उघडकीस येणे" या विषयावर नियम 93 ची सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नाही. शासनाने निवेदन करावे असा निदेश देऊन मी या सूचनेस अनुमती नाकारीत आहे.

यानंतर सन्माननीय सदस्य प्रा.शरद पाटील व इतर वि.प.स. यांनी "सांगली येथील हडको सभासद संघटनेने त्यांच्या गाळे/प्लॉटच्या प्रलंबित मागण्यांसंदर्भात दि.14 जुलै, 2005 पासून सुरु केलेले आंदोलन" या विषयावर नियम 93 ची सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नाही. शासनाने निवेदन करावे असा निदेश देऊन मी या सूचनेस अनुमती नाकारीत आहे.

3....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ MHM/ SBT/

मा.सभापती....

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री मधुकर चव्हाण व इतर वि.प.स.यांनी "मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाच्या ज्ञानेश्वर नगर, शिवडी येथील संक्रमण शिबिरात म्हाडाच्या अधिका-यांनी एक-एक लाख रुपये घेऊन घुसखोर घुसविणे" या विषयावर नियम 93 ची सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नाही.

श्री.मधुकर चव्हाण : सभापती महोदय, या सूचनेवरील निवेदन 1-2 दिवसामध्ये शासनाने करावे असे आपण निदेश द्यावेत अशी मी आपल्याला विनंती करीत आहे.

या सूचनेबाबतचे निवेदन तातडीने सभागृहामध्ये येईल यादृष्टीने शासनाने प्रयत्न करावेत असा निदेश देऊन मी या सूचनेस अनुमती नाकारीत आहे.

यानंतर सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत व इतर वि.प.स.यांनी "नागपूर, भंडारा, वर्धा, गोंदिया भागात मेंदू ज्वराच्या साथीने अनेक रुग्ण दगावण्याची निर्माण झालेली भीती" या विषयावर नियम 93 ची सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नाही. शासनाने निवेदन करावे असा निदेश देऊन मी या सूचनेस अनुमती नाकारीत आहे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री.विलास अवचट यांनी "दिनांक 16 जुलै, 2005 रोजी गिरगाव भागातील पिंपळवाडी येथील रहिवाशांना म्हाडाच्या अधिका-यांनी कुठलीही पूर्वसूचना न देता घराबाहेर काढण्याची घडलेली आक्षेपार्ह घटना" या विषयावर नियम 93 ची सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नाही. सदर सूचना मी दालनामध्येच नाकारलेली आहे. तथापि, मी खास बाब म्हणून शासनाने निवेदन करावे असा निदेश देऊन मी या सूचनेस अनुमती नाकारीत आहे.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, आम्ही एक नियम 93 ची सूचना दिली होती. सलमान खान आणि ऐश्वर्या राय यांचे गेल्या 4 वर्षापूर्वीचे संभाषण टेप झाल्याचा विषय गेले 4-5 दिवस महाराष्ट्रामध्ये गाजत आहे. आम्हाला वर्तमानपत्रातून माहिती मिळाली की, मा.गृहमंत्री खालच्या सभागृहामध्ये उद्या यासंबंधी निवेदन करणार आहेत. जे निवेदन खालच्या सभागृहात करण्यात येईल ते याठिकाणी झाले पाहिजे अशी आमची नियम 93 च्या सूचनेच्या अनुषंगाने मागणी आहे.

नंतर श्री.शिगम.....

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, मा. विरोधी पक्षनेत्यांनी हा विषय आपल्या निदर्शनास आणून देण्याचा प्रयत्न केला. सलमान खान आणि ऐश्वर्या राय हा प्रश्न महत्वाचा नाही. सलमान खानने केलेल्या वक्तव्याबाबत अनेक चॅनल्सवरुन तसेच वृत्तपत्रातून बातम्या प्रसिध्द झाल्या. दाऊद आणि अबू सालेम यांच्याशी माझे संबंध आहेत. बॉम्ब स्फोट कोणी घडवून आणले याची मला माहिती आहे. अशी वक्तव्ये त्याने केलेली आहेत. हा प्रकार अतिशय भयंकर आहे. राष्ट्राला धोका निर्माण होणारी ही वक्तवे आहेत. म्हणून त्याने केलेल्या वक्तव्याची सत्यासत्यता समजण्यासाठी सरकारने सभागृहामध्ये स्पष्ट निवेदन करण्याची आवश्यकता असून नियमाप्रमाणे मा. गृहमंत्र्यांनी निवेदन करावे. खालच्या सभागृहामध्ये निवेदन झाले म्हणून ते या सभागृहामध्ये करावे अशा प्रकारचा आमचा आग्रह नाही. या सभागृहामध्ये सरकारने कोणत्या विषयावर निवेदन करावे किंवा करुन नये हा मा.सभापती महोदयांचा अधिकार आहे. माझी मा.सभापतींना विनंती आहे की, या गंभीर घटनेबाबत या सभागृहामध्ये सरकारने निवेदन करण्याची आवश्यकता आहे. या घटनेबाबत खालच्या सभागृहातील मा.सदस्यांनी माहिती घेतली. या सदनातील सदस्यांच्या भावना देखील तीव्र आहेत. तेव्हा जे निवेदन खालच्या सभागृहामध्ये झाले तसे निवेदन या सभागृहामध्ये झाले पाहिजे अशी आमची सर्वांची आपणास विनंती आहे.

श्री. मधुकर सरपोतदार : मा. विरोधी पक्षनेते श्री. पांडुरंग फुंडकर आणि मा.सदस्य श्री.नितीन गडकरी यांनी याठिकाणी जो मुद्दा उपस्थित केला त्यासंदर्भात मला अतिशय आश्चर्य वाटले की, गेली चार वर्षे मुंबई पोलिसांच्या रेकॉर्डला जी गोष्टी आहे त्या गोष्टीची मला कल्पना नाही असे मुंबईचे पोलीस आयुक्त म्हणतात. असे वक्तव्य करणारे मुंबईचे पोलीस आयुक्त म्हणून राहू शकतात काय हा महत्वाचा प्रश्न आहे. आज मुंबईतील काही मंडळींचे माफीया गँगशी थेट संबंध आहेत. ज्या धमक्या येतात त्याची नोंद देखील पोलिसांकडे नाही ही बाब अतिशय गंभीर आहे. खालच्या सदनामध्ये याबाबतीत चर्चा झाली म्हणून या सदनामध्ये आम्ही चर्चेचा आग्रह धरला नाही. हा सर्वांच्या जीवनमरणाचा प्रश्न आहे. मुंबईतील तीन रेल्वे स्थानक उडवून देण्यासंबंधीच्या बातम्या वृत्तपत्रातून प्रसिध्द झालेल्या आहेत. अशा घटनांसंबंधीची माहिती या सदनाला मिळणे आवश्यक आहे. जर मा.गृहमंत्री खालच्या सदनामध्ये निवेदन करणार असतील तशा प्रकारचे निवेदन या सभागृहामध्येही व्हावे अशी आमची आपणास विनंती आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती : शुक्रवार दिनांक 15 जुलै 2005 रोजी या सभागृहामध्ये औचित्याच्या माध्यमातून या विषयाच्या संदर्भात चर्चा झाली. आज पुनश्च मा.विरोधी पक्षनेते, मा.सदस्य श्री.नितीन गडकरी आणि मा.सदस्य श्री. मधुकर सरपोतदार यांनी याठिकाणी मुद्दा उपस्थित करुन शासनाने निवेदन करण्यासंबंधीचा आग्रह धरलेला आहे. मी मा. गृहमंत्र्यांना अशी सूचना करतो की, खालच्या सभागृहामध्ये या विषयाच्या संदर्भात ज्या पध्दतीने निवेदन केले असेल तशा पध्दतीने याठिकाणी निवेदन करावे.

--

...3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी. : कोराडी वीज केंद्रातून चंद्रपूरकडे वीज वाहून नेणारे वीज वाहिनीचे दोन मनोरे चोरट्यांनी कापणे

मु.शी : कोराडी वीज केंद्रातून चंद्रपूरकडे वीज वाहून नेणारे वीज वाहिनीचे दोन मनोरे चोरट्यांनी कापणे याबाबत श्री जयंत प्र. पाटील,वि.प.स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना

श्री. दिलीप वळसे-पाटील (ऊर्जा (अपांरंपारिक ऊर्जा वगळता) मंत्री) : सभापती महोदय, मा.सदस्य श्री. जयंत प्र.पाटील, यांनी "कोराडी वीज केंद्रातून चंद्रपूरकडे वीज वाहून नेणारे वीज वाहिनीचे दोन मनोरे चोरट्यानी कापणे" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

सभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथेसोबतचे निवेदन छापावे.)

..4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत प्र. पाटील : लेबर कॉस्ट 24 लाख रु. येणार आहे काय ? मटेरियलची कॉस्ट किती आहे ? वीज मंडळा मार्फत पोलीस स्टेशनला गुन्हा नोंदविलेला आहे काय ? असल्यास, त्याबाबतीत काय तपास लागला ? आरोपींना पकडले आहे काय ?

श्री. दिलीप वळसे-पाटील : पोलीस स्टेशनला गुन्हा नोंदविलेला आहे. अजून आरोपी पकडलेले नाहीत. मनोरे उभारण्यासाठी 24 लाख रु. आणि अन्य कामासाठी 18 लाख रु. खर्च येणार आहे.

...5..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ MHM/ SBT/ पूर्वी श्री. खंदारे 15:20

पृ.शी. : अध्यापक महासंघ तसेच शिक्षक, तबलावादक शिक्षक आणि

कलावंतांच्या मागण्याबाबत

मु.शी : अध्यापक महासंघ तसेच शिक्षक, तबलावादक शिक्षक आणि कलावंतांच्या मागगण्याबाबत सर्वश्री श्रीकांत जोशी, विनोद तावडे व मधुकर चव्हाण, वि.प.स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना

प्रा. वसंत पुरके (शालेय शिक्षण मंत्री) : सभापती महोदय, सर्वश्री श्रीकांत जोशी, विनोद तावडे व मधुकर चव्हाण, वि.प.स. यांनी "अध्यापक महासंघ तसेच शिक्षक, तबलावादक शिक्षक आणि कलावंतांच्या मागण्या" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

सभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथेसोबतचे निवेदन छापावे.)

...6...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. श्रीकांत जोशी : मागील अधिवेशनामध्ये मा. मंत्री महोदय प्रा. वसंत पुरके यांनी आश्वासन दिले होते आणि त्यामुळे संगीत शिक्षकांनी विभागीय कार्यालयासमोर सुरु केलेले

उपोषण मागे घेतले होते. आता त्यांचे पुन्हा उपोशण चालू आहे. यामध्ये तीन गोष्टी महत्वाच्या आहेत. मा. उच्च शिक्षण मंत्र्यांनी सांगितले की, कॉलेजमधील संगीत शिक्षणाच्या अभ्यासक्रमासंबंधी कोणतीही निश्चिती केलेली नाही.

...नंतर श्री.गिते...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.श्रीकांत जोशी..

सभापती महोदय, उच्च शिक्षण मंत्र्यांनी गेली दोन वर्षे या लोकांना वेळच दिला नाही ही त्यांची व्यथा आहे. सभापती महोदय, माझा प्रश्न असा आहे की, वित्त मंत्री, उच्च शिक्षण मंत्री आणि शालेय शिक्षण मंत्री यांनी एकत्रीत येऊन या विषयावर मार्ग काढतील काय ? संगीत विषयाची गोडी ही लहानपणीच जोपासली जावी म्हणून इयत्ता 1 ली ते इयत्ता 8 वी पर्यन्त "संगीत " हा विषय अनिवार्य करणे आवश्यक आहे. म्हणून इयत्ता 1 ली ते इयत्ता 8 वी पर्यन्त "संगीत" हा विषय अनिवार्य करण्यात येईल काय ? तबलजी यांना कमी वेतनश्रेणी दिलेली आहे. इतरांना 4500 ते 9000 वेतनश्रेणी दिली जाते. ती वेतनश्रेणी यांना देखील देणे आवश्यक आहे. ती वेतनश्रेणी तबलजी यांना देण्यात येईल काय ? तसेच या लोकांनी इतरही मागण्या शासनाकडे सादर केलेल्या आहेत. हे अधिवेशन संपण्यापूर्वी या महासंघाच्या पदाधिका-यांमसमवेत बैठक घेऊन त्यांच्या मागण्यांच्या बाबतीत निर्णय घेतला जाईल काय ?

श्री. वसंत पुरके : माननीय उच्च शिक्षण मंत्री,वित्त मंत्री आणि शालेय शिक्षण मंत्री यांनी बैठक घ्यावी असा पहिला प्रश्न सन्माननीय सदस्यांनी विचारला आहे. याबाबतीत सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, याबाबतीत निश्चितपणे बैठक घेण्यात येईल व त्या बैठकीस सन्माननीय सदस्यांना देखील बोलाविण्यात येईल. कारण हा प्रश्न अनेक वर्षापासून निरुत्तर आहे. मुलभूत प्रश्न असा आहे की, संगीत शिक्षक हा शिक्षक म्हणून ट्रीट होतो. संगीत शिक्षणाला गायन असेल, त्या गायनाला वादनाची साथ म्हणून अकंपनी म्हणून ट्रीट करतो. त्याची शिक्षण पात्रता स्वतंत्र आहे.बी.ए.बी.एड. किंवा 12 वी डी.एड. असा तो कोर्स नाही. त्या पदाची शैक्षणिक अर्हता,अभ्यासक्रम आणि वर्कलोड ही गृहीत धरुन त्यांची नेमणूक केली जाते. परंतु त्यांना लिपीक पदाची वेतनश्रेणी दिली गेलेली आहे.या सर्व शिक्षक बांधवांची मागणी अशी आहे की,12 वी डी.एड.चे तरी वेतनश्रेणी आम्हाला लागू व्हावी. आम्ही अनेक वेळा वेतन निश्चिती करणा-या पथकास विचारणा केली आहे. ते या वेतनश्रेणीत बसले नसले तरी त्यांचा हा प्रश्न सुटणे गरजेचे आहे. लॉजिकली त्यांचे म्हणणे रास्त आहे. संगीत शिक्षकांना वर्कलोड ठरलेला आहे. तेवढाच वर्कलोड वाजविणा-या शिक्षकाला आहे. म्हणून यासंदर्भात एक बैठक बोलाविणे गरजेचे आहे. या शिक्षक बांधवांना किमान 12 वी डी.एड. यांची वेतनश्रेणी देण्याबाबत निश्चितपणे चर्चा करु आणि संबंधित समितीला ही बाब पटवून देण्याचा प्रयत्न करु.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

2..

श्रीमती संजीवनी रायकर : संगीत शिक्षकांना पदोन्नतीची संधी नसली तरीही त्यांना त्रिस्तरीय वेतनश्रेणी मंजूर करण्यात आलेली आहे.परंतु त्यांना प्रशिक्षण कुठे आहे ? त्यांना इन सर्व्हीस ट्रेनिंग नाही. त्यामुळे त्यांना सिनियर स्केलचा सुध्दा फायदा देत नाही. तबलजी हा संगीत शिक्षकाच्या बरोबरीने काम करतो. संगीत शिक्षकांना आज हा कार्यक्रम आहे. तो कार्यक्रम आहे म्हणून प्रत्येक दिवशी त्यांना काम करावे लागते. संगीत शिक्षक आणि तबलजी यांची उपेक्षा कशासाठी करता आहात ? संगीत शिक्षकांना योग्य ती वेतनश्रेणी कधी देण्यात येणार आहे ?

श्री. वसंत पुरके : मुलभूत प्रश्न असा आहे की, हा संगीत शिक्षक म्हणून नाही. हा माणूस संगीत शिक्षक म्हणून समजला जात नाही. परंतु त्यास संगीत शिक्षकाची श्रेणी दिलेली आहे. परंतु शिक्षक संगीत शिक्षक म्हणून ट्रीट होत नाही. गायन क्षेत्र वेगळे आहे आणि वादन क्षेत्र वेगळे आहे. हे सगळे तबला आर्टिस्ट आहेत. सन्माननीय सदस्यांच्या भावना लक्षात घेऊन यासंदर्भात एक बैठक घेण्यात येऊन यातून मार्ग काढण्याचा निश्चितपणे प्रयत्न करण्यात येईल.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, संगीत ही आपली विरासता आहे, आपली कला आहे. कालातंतराने या क्षेत्रामध्ये मोठा रोजगार उपलब्ध होणार आहे. अनेक कार्यक्रमांमध्ये संगीत शिक्षणामळे वाद्य वाजविणा-या लोकांना रोजगाराचे एक साधन मिळालेले आहे. तसेच आपल्या संस्कृतीशी याचे नाते आहे. एकीकडे गाणा-यास संगीत शिक्षक म्हटल्यावर तबला वाजविणारा येतोच. या क्षेत्रातही साधना करणारे लोक आहेत. त्या लोकांच्या बाबतीत अरसिक दृष्टीकोन महाराष्ट्र सरकारचा आहे तो योग्य नाही. माझी शासनास विनंती आहे की, महाविद्यालयीन स्तरावरचे संगीत, शालेय स्तरावरचे संगीत, त्याचे कोर्सेस, त्याचा अभ्यासक्रम, त्यासाठी लागणारी जागा या सगळयांच्या बाबतीत महाराष्ट्र सारख्या प्रगतशील राज्याचे काही धोरण असले पाहिजे. हे आपल्या रसिकतेला शोभणारे नाही. या संदर्भामध्ये केवळ या शिक्षकांचे वेतनभत्ते महत्वाचे नाहीत. संगीतामधील जी कला आहे, ती पुढे टिकली पाहिजे. संगीत वाढले पाहिजे म्हणून सर्वंकष धोरण ठरले पाहिजे. भविष्यात शासन याबाबतीत शासन काय धोरण ठरविणार आहे व याबाबतीत कधीपर्यन्त निर्णय होणार आहे ?

यानंतर श्री. कानडे...

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

SSK/ MHM/ SBT/ 15:30

प्रा.वसंत पुरके : सभापती महोदय, सभागृहामध्ये उच्चशिक्षण मंत्री आणि सांस्कृतिक कार्य मंत्री आहेत. मा.सदस्य श्री. गडकरी यांनी सांगितल्याप्रमाणे याबाबतीत आम्ही एकत्र बसून तोडगा काढू.संगीत तालाशिवाय पूर्ण होऊ शकत नाही. ज्यामध्ये झपताल,त्रिताल,दादरा इ. गोष्टी आहेत. म्हणून यासंदर्भातील चर्चेच्या वेळी मा.सदस्यांना सुध्दा निमंत्रित करु. संगीत शिक्षकांना योग्य ती वेतनश्रेणी देऊन न्याय देणे गरजेचे आहे.

प्रा.बी.टी.देशमुख : सभापती महोदय, मा.मंत्रीमहोदयांनी ब-याच तालांची याठिकाणी नांवे सांगितली. परंतु तालाचा आधार तबलजी आहे. आज संगीत शिक्षकांना ट्रेंड प्रा.शिक्षकाची सुध्दा वेतनश्रेणी नाही. हे एक विशिष्ट पद आहे. तबलजी शिक्षकांसारखे बीएबीएड नसतील परंतु ते जर त्यांच्या कलेमध्ये वाकबगार नसतील तर गाणा-याचे काय होईल हे सांगण्याची आवश्यकता नाही. या कर्मचा-यांवर अनेक वर्षे अन्याय झालेला आहे. हा विषय समजून सांगणार तरी कसा ? निवेदनामध्ये सुध्दा याबाबत उल्लेख करण्यात आला आहे. म्हणून माझी शासनाला विनंती आहे की, याबाबतीत लवकरात लवकर बैठक घेऊन निर्णय घ्यावा.

प्रा. वसंत पुरके : सभापती महोदय, मी मघाशी सांगितल्याप्रमाणे उच्चशिक्षण मंत्री,सांस्कृतिक कार्यमंत्री आणि मी असे तिघे मिळून चर्चा करु आणि याबाबत निर्णय घेऊ. संगीत हे तालाशिवाय पूर्ण होऊ शकत नाही. गायन,नृत्य आणि वादन हे संगीतातील युनिक पार्ट आहेत. अत्यंत महत्वाचे असे हे विषय आहेत. न शिकलेला माणूस सुध्दा या क्षेत्रातीलअल्लारखाँ होऊ शकतो. कलेची जाण ठेवणे आणि रसिकता ठेवणे आवश्यक आहे. केंद्र शासनाने सुध्दा यासंदर्भात काही पावले उचलली आहेत. यासंदर्भात बैठक घेऊन एक महिन्याच्या आत निर्णय घेऊ.

श्री. रामनाथ मोते : सभापती महोदय, या प्रश्नाच्या अनुषंगाने दोन मुद्यांवर मी शासनाचे लक्ष वेधू इच्छितो. संगीत शिक्षकाची वेतनश्रेणी 1200 रुपयांची आहे. या वेतनश्रेणीमध्ये काम करणारे शिक्षक 4500 या वेतनश्रेणीमध्ये आलेले आहेत. संगीत शिक्षकांना 1350 ही वेतनश्रेणी आहे. या शिक्षकांना सुधारित वेतनश्रेणी देण्यासाठी हे प्रकरण वेतन असमानता समितीकडे शासन पाठविणार आहे काय ? आताच मंत्रीमहोदयांनी सांगितले की, संगीत शिक्षक आणि तबलावादक बरोबर असल्याशिवाय हा विषय पूर्ण होऊ शकत नाही. महाराष्ट्रात अनेक शाळा आहेत की ,

. 2

SSK/ MHM/ SBT/ 15:30

श्री. रामनाथ मोते ...

ज्याठिकाणी संगीत शिक्षक काम करीत आहे परंतु तबलावादकाचे पद मंजूर केले नाही. जोपर्यंत तबलावादक पद मंजूर होत नाही तोपर्यंत या विषयाला अर्थ राहणार नाही. ज्या ज्या शाळांमध्ये संगीत शिक्षकांची पदे आहेत त्या त्या शाळांमध्ये तबलावादकाचे पद शासन मंजूर करील काय ? यासंदर्भातील विशेष आदेश तातडीने निर्गमित केले जातील काय ?

यानंतर श्री. गायकवाड

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.वसंत पुरके : मंजूर पदामधून त्यांची नेमणूक केली जाते परंतु ब-याचदा वर्कलोड कमी असतो. तेव्हा या संदर्भात निश्चितपणे गांभीर्याने विचार करण्यात येईल.

सभापती : या प्रश्नाच्या संदर्भात तीन विभागांच्या मंत्र्यांशी एकत्रित चर्चा करुन एक महिन्यात निर्णय घेण्यात येईल असे मघाशी शालेय शिक्षण मंत्र्यांनी सागितले आहे. या एकत्रित चर्चेमध्ये माननीय वित्त मत्र्यांचाही समावेश करण्यात यावा.तसेच जो काही निर्णय घेण्यात येईल तो सभागृहासमोर येऊन व त्यावर सभागृहात चर्चा व्हावी अशा प्रकारचा निर्णय मी या संदर्भात देतो.

प्रा.वसंत पुरके : ठीक आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी. : जे.जे. फलॉय ओव्हर ब्रीजवर बेस्ट बसला झालेला अपघात

मु.शी : जे.जे.फलॉय ओव्हर ब्रीजवर बेस्ट बसला झालेल्या अपघाताबाबत सर्वश्री नितीन गडकरी,पांडुरंग फुंडकर,विनोद तावडे,मधुकर चव्हाण,श्रीमती कांता नलावडे,वि.प.स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना

श्री.सिध्दाराम म्हेत्रे (गृह राज्य मंत्री) :सभापती महोदय, सर्वश्री नितीन गडकरी,पांडुरंग फुंडकर,विनोद तावडे,मधुकर चव्हाण,श्रीमती कांता नलावडे,वि.प.स. यांनी " जे.जे.फलॉय ओव्हर ब्रीजवर बेस्ट बसला झालेला अपघात" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती,तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्यामुळे मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

सभापती : निवेदन सभगृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस :कृपया सोबत जोडलेले निवेदन येथे छापावे)

3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

- निवेदना नंतर -

श्री.नितीन गडकरी : बेस्ट बसला अपघात झाल्यानंतर संबंधित ड्रायव्हरची वैद्यकीय तपासणी केली होती काय ? आणि त्यामध्ये त्याने मद्यपान केल्याचे आढळून आले होते काय? त्याचबरोबर त्याला चक्कर येत असल्याचे नियम 93 च्या सूचनेमध्ये म्हटले आहे तेव्हा त्याला चक्कर येण्याचे कारण काय होते ?

श्री.सिध्दराम म्हेत्रे : वैद्यकीय तपासणीमध्ये त्या ड्रायव्हरने मद्यपान केलेले नव्हते असे डॉक्टरांनी म्हटलेले आहे.त्याचबरोबर गाडी चालवत असतांना त्याला चक्कर आली नव्हती.

श्री.नितीन गडकरी :हा अपघात होण्याची कारणे काय होती ?

श्री.सिध्दाराम म्हेत्रे : जे.जे. हॉस्पिटलसमोर मांडवी पोस्ट ऑफिस कार्यालयाजवळ एक धोकादायक वळण असून त्या ठिकाणी बस 30 च्या वेगाने चालवावयास पाहिजे परंतु त्या ड्रायव्हरने भरधाव वेगाने बस चालवली व ती बस त्याला कन्ट्रोल न झाल्यामुळे हा अपघात झाला होता.

श्री.पांडुरंग फुंडकर : बेस्टच्या बसला हा अपघात झाला असून उत्तर देतांना असे सांगण्यात आले आहे की भरधाव वेगाने हा ड्रायव्हर गाडी चालवत असतांना त्याचा बसवरील ताबा सुटला आणि त्यामुळे हा अपघात झाला होता. या बाबतीत मला माननीय मंत्रिमहोदयांना असा प्रश्न विचारावयाचा आहे की, मुबईतील बेस्टचे ड्रायव्हर्स किंवा निरनिराळया कॉर्पोरेशनच्या ठिकाणी ज्या संस्थे मार्फत गाडया चालविल्या जातात त्या गाडयांचे ड्रायव्हर्स तसेच एस.टी.महामंडळाच्या ड्रायव्हर्सचे विशिष्ट वयोमर्यादे नंतर दर सहा महिन्यांनी किंवा तीन महिन्यांनी शारीरिक तपासणी होणे आवश्यक आहे तेव्हा अशा प्रकारे या सर्व ड्रायव्हर्सची शारीरिक तपासणी करुन घेण्यासंबंधी शासन आदेश काढणार आहेत काय?

श्री.सिध्दाराम म्हेत्रे : सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी जी सूचना केलेली आहे ती सूचना खरोखरच चांगली आहे. त्या सूचनेप्रमाणे महानगरपालिकेच्या किंवा बेस्टच्या ड्रायव्हर्सची विशिष्ट कालावधीनंतर शारीरिक तपासणी करण्याचे आदेश दिले जातील.

श्री.पांडुरंग फुंडकर : ग्रामीण भागात एस.टी.महामंडळाच्या गाडया चालतात तेव्हा एस.टी.महामंडळाच्या ड्रायव्हर्सची सुध्दा शारीरिक तपासणी केली जाणार आहे काय ?

श्री.सिध्दाराम म्हेत्रे : एस.टी.महामंडळाच्या ड्रायव्हर्सची नियमितपणे वैद्यकीय तपासणी केली जाते .

4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नितीन गडकरी :माननीय मंत्रिमहोदयांना मी सांगू इच्छितो की. मध्यंतरी माझ्या डी.व्ही. कारला अपघात झाला होता. त्या डी.व्ही.कारच्या ड्रायव्हरला 40 टक्के कॅटरॅट होता त्यामुळे जो अपघात झाला त्याचे दुष्परिणाम मला तीन वर्षे भोगावे लागले होते. सरकारी दवाखान्यात जाऊन हे ड्रायव्हर्स सर्टिफिकेट आणत असतात. माझ्या गाडीच्या ड्रायव्हरला कॅटरॅट होता. तेव्हा मी माननीय मंत्रिमहोदयांना सांगतो की, आपणसुध्दा आपल्या गाडीच्या ड्रायव्हरची शारीरिक तपासणी करुन घ्यावी.तसेच सगळया मंत्र्यांच्या गाडयांवरील ड्रायव्हर्सची तपासणी करुन घ्यावी. आपली नोकरी जाईल या भीतीमुळे हे ड्रायव्हर्स खोटे सर्टिफिकेट आणत असतात.50 प्रवाशांना घेऊन हे बेस्टचे ड्रायव्हर्स बस चालवत असतात. सुदैवाने हा मोठा अपघात झाला नाही.परंतु एखाद्यावेळी मोठा अपघात होऊ शकतो.तेव्हा सर्व ड्रायव्हर्सची नियमितपणे शारीरिक तपासणी करुन घेतली पाहिजे आणि जर एखादा ड्रायव्हर फीट नसेल तर त्याला नोकरीतून काढून न टाकता त्याला शिपयाचे वा अन्य कोणते तरी काम दिले गेले पाहिजे.या ड्रायव्हर्समध्ये असुरक्षिततेची भावना असल्यामुळे ते खोटे सर्टिफिकेटस आणतात. सिव्हील सर्जनकडून जे सर्टिफिकेट आणले जाते त्याबद्दल मला काही म्हणावयाचे नाही. 50 रुपये किंवा 100 रुपये देऊन अनेकजण सर्टिफिकेट आणत असतात. माझ्या गाडीच्या ड्रायव्हरला 40 टक्के कॅटरॅट असल्यामुळे गाडीला अपघात झाला होता आणि त्याचे दुष्परिणाम मी तीन वर्षे भोगले आहेत.तेव्हा सरकारी गाडयांच्या ड्रायव्हर्सची तसेच डी.व्ही.कारच्या ड्रायव्हर्सची वर्षातून दोन वेळा शारीरिक तपासणी करुन घेतली पाहिजे. तसेच त्यांच्या डोळयांची तपासणी करुन घेतली पाहिजे. श्री.दिग्विजयसिंह यांच्या गाडीचा ड्रायव्हर अधू होता तसेच श्रीमती सुषमा स्वराज यांच्या गाडीचा ड्रायव्हर आंधळा होता. असे त्यांनीच मला सांगितले होते. तेव्हा सर्व मंत्र्यांच्या आणि माननीय सभापतीच्या तसेच माननीय उपसभपतींच्या गाडयांच्या ड्रायव्हर्सची तपासणी करुन घेण्यासंबंधीची सिस्टीम तयार केली जावी अशी माझी माननीय मंत्रिमहोदयांना विनंती आहे.तेव्हा ही सिस्टीम तयार केली जाणार आहे काय ?

श्री.सिध्दाराम म्हेत्रे : जेवढे सरकारी आणि निम सरकारी गाडयांचे ड्रायव्हर्स असतील त्या सर्वांची वर्षातून किमान एकदा शारीरिक तपासणी करण्याबाबतच्या सूचना देण्यात येतील.

नंतर श्री.सुंबरे

अमुद्रित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी. : शासनाकडून मॅचिंग ग्रँट पोटी येणे असलेल्या कोट्यवधी रुपयां अभावी 'म्हाडा' कडून निधीअभावी इमारत दुरूस्ती व पुनर्रचनेच्या कामावर होणारा विपरित परिणाम.

मु.शी. : शासनाकडून मॅचिंग ग्रँट पोटी येणे असलेल्या कोट्यवधी रुपयांअभावी 'म्हाडा' कडून निधीअभावी इमारत दुरूस्ती व पुनर्रचनेच्या कामावर होणारा विपरित परिणाम याबाबत सर्वश्री मधुकर चव्हाण व विनोद तावडे यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री. मधुकर चव्हाण (मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था) : अध्यज महोदय, मी ि-यम 101 अ-वये पुढील तातडीच्या व सार्वजनिज महत्वाच्या बाबीजडे आपल्या अ-ुमती-े स-मा-ा-ीय मुख्यमंत्र्यांचे (गृहनिर्माण) लज वेधू इच्छितो आजि त्याबाबत त्यां-ी ि-वेद-ा जरावे अशी वि-ंती जरतो.

" म्हाडा जायद्यांतर्जत ि-यमा-ुसार इमारत दुरुस्ती पु-ार्रच-ा मंडळाला शास-ा-े मॅचिंज ग्रॅ-ट देजे जायद्या-े बंध-ाजारज असू-ासुध्दा त्याचे वितरज -ा होजे, जेल्या पाच वर्षात शास-ा-े म्हाडाला 221.64 जोटी मॅचिंज ग्रॅ-ट देजे आवश्यज असू-ासुध्दा त्यापैजी फक्त 186.13 जोटी मॅचिंज ग्रॅ-ट देजे, परिजामत: उपजर प्राप्त इमारतींची दुरुस्ती ि-धीअभावी वेळेवर -ा होजे, त्यामुळे उपजरप्राप्त इमारती जोसळू-ा, अपघात होऊ-ा जीवीत व वित्त हा-ी होज्याची शक्यता ि-र्माज होजे, -वी-ा इमारतींची पु-ार्रच-ा ि-धीअभावी -ा होजे, परिजामत: संक्रमज शिबीरात भाडेजरु दीर्घजाळ जिचपत पडजे, यामुळे भाडेजरुंच्या म-ात असुरजिततेची, अविश्वासाची व संतापाची भाव-ा ि-र्माज होजे, यावर शास-ा-े जरावयाची उपाययोज-ा व शास-ाची प्रतिक्रिया. "

श्री.दयानंद म्हस्के (गृहनिर्माण राज्यमंत्री) : अध्यज महाराज, लजवेधी सूच-ेसबंधीच्या ि-वेद-ाच्या प्रती मा-ा-ीय सदस्यां-ा आधीच वितरित जेल्या असल्यामुळे मी ते ि-वेद-ा आपल्या अ-ुमती-े सभाजृहाच्या पटलावर ठवतो.

सभापती : ि-वेद-ा सभाजृहाच्या पटलावर ठेवज्यांत आले आहे.

ि-वेद-ा

(प्रेस : येथे सोबतचे ि-वेद-ा छापावे)

...... यू 2 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(लक्षवेधी सुचनेवरील मा.गृहनिर्माण राज्यमंत्र्यांच्या निवेदनानंतर ..)

श्री. मधुकर चव्हाण : सभापती महोदय, म्हाडाचा कारभार आंधळा दळतो आहे आणि कुत्रे पीठ खात आहे अशा प्रकारे चालला आहे. ज्या दिवशी प्रथमत: ही लक्षवेधी सूचना सभागृहापुढे आली होती त्या दिवशीच शासनाकडून आलेल्या निवेदनावर चर्चा झाली असती तर त्या निवेदनाद्वारा सभागृहासमोर असत्य व दिशाभूल करणारी माहिती आली असती. आज म्हाडा आपला कारभार नीट करू शकत नाही याचे मुख्य कारण म्हणजे शासनाकडून 72 कोटी रुपये आणि दुरूस्ती उपकरापोटी 96.19 कोटी अशी एकूण 168.85 कोटी इतकी रक्कम म्हाडाला देणे बाकी आहे. इतक्या रकमेतून 225 चौ.फूटाच्या 4000 सदनिका असलेल्या जवळपास 400 इमारती होतील. पण हे पैसे म्हाडाला मिळत नसल्यामुळे म्हाडा आपले काम व्यवस्थित करू शकत नाही. शासन एवढे पैसे वेळच्या वेळी म्हाडाला देऊ लागले तर काय होईल याचा आपणच विचार करावा. दुसरे म्हणजे या निवेदनातील पृ. 3 वर म्हटले आहे की, कायद्यानुसार महापालिका यातील एकही पैसा स्वत:कडे ठेवू शकत नाही. पण महापालिका शासनाचे ऐकत नाही आणि जवळपास त्यामुळे 63 कोटी च्या वर रक्कम महापालिकेने शासनाकडे जमा केलेली नाही. या बाबतीत निवेदनामध्ये आपण म्हटले आहे की, वस्तुत: दुरूस्ती उपकराची रक्कम ही भाडेकरूकडून वसूल करण्यात येत असल्याने ही रक्कम इमारतीच्या दुरूस्ती व पुनर्रचना कार्यक्रमासाठी वेळच्या वेळी देणे कायदेशीरदृष्ट्या बंधनकारक असून या रकमेची सांगड म्हाडाकडून येणाऱ्या रकमेशी घालणे योग्य नाही. ही रक्कम वेळच्यावेळी शासनाकडे जमा करण्याबाबत शासनाने सांगूनही महापालिकेने ती रक्कम शासनाकडे दिलेली नाही. सभापती महोदय, सेक्शन 76-97 प्रमाणे उपकरापोटी वसूल होणारा एक रूपयामध्ये 90 पैसे भाडेकरूचे आणि 10 पैसे इमारतीच्या मालकाचे असतात. त्यात शासनाचा एकही पैसा नसतो. त्यामुळे महापालिका आणि शासन हे पैसे आपल्याकडे ठेवू शकत नाही. तेव्हा ही 168 कोटी रुपयांची रक्कम शासन म्हाडाला केव्हा देणार आहे आणि दुसरा प्रश्न म्हणजे मागील निवेदनामध्ये आणि आताच्या निवेदनामध्ये तफावत का आहे ?

श्री. दयानंद म्हस्के : सभापती महोदय, महापालिकेकडून शासनाला येणे आहे हे सत्य आहे. त्यासाठी हे पैसे लौकरात लौकर दिले जावेत म्हणून शासनाकडून महापालिकेला सूचना देण्यात येतील.

...... यू 3 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर चव्हाण : पण मुळात महापालिका अशा प्रकारे हे पैसे स्वत:कडे ठेवू शकते काय ? कायद्यानुसार महापालिका हे पैसे स्वत:कडे ठेवू शकत नाही हे आपणच या निवेदनात म्हटलेले आहे. हौसिंग बोर्डाची इतर जी काही देणे आहेत त्यांचा आणि या उपकराच्या रकमेचा काहीही संबंध नाही. हे भाडेकरूंचे पैसे आहेत, त्यात शासनाचा एकही पैसा नाही. तुम्ही तर हे 168 कोटी रुपये न आल्यामुळे आता आमदारांचा फंड देखील बंद केला आहे. या एवढ्या रकमेतून 40 ते 42 ग्राऊंड प्लस फोर अशा अनेक इमारती उभ्या राहू शकतील. तेव्हा हे पैसे शासनाने म्हाडाला का दिले नाहीत ?

श्री. दयानंद म्हस्के : सभापती महोदय, महापालिकेकडून येणे बाकी आहे ही वस्तुस्थिती आहे. यासाठी महापालिकेला शासनाकडून सूचना देण्यात येतील. 168 कोटी रुपये शासनाकडून येणे बाकी आहे ही वस्तुस्थिती असली तरी देखील म्हाडाकडून काम थांबलेले नाही ....

श्री. प्रमोद नवलकर : सभापती महोदय, ही रक्कम वसूल करण्यासाठी महापालिकेकडे आपण पाठपुरावा करीत आहात म्हणजे नेमके आपण काय करीत आहात ?

श्री. दयानंद म्हस्के : पाठपुरावा म्हणजे यासाठी त्यांच्या पाठीमागे लागणे, त्याही पेक्षा पुढे जाऊन मी आपल्याला सांगू इच्छितो की, अधिवेशनाच्या कालखंडामध्ये महापालिकेबरोबर या साठी एक बैठक घेण्यात येईल.

श्री. मधुकर चव्हाण : सभापती महोदय, पण ही अशी लाचारी कशासाठी ? हे पैसे आपलेच आहेत. सभापती महोदय, माझा येथे हरकतीचा मुद्दा आहे. महापालिकेला विशिष्ट अधिकारामध्ये शासन भूखंड मोकळे करण्या बाबत आदेश देऊ शकते. ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(यानंतर श्री. जागडे .....व्ही 1 ...

ASJ/ MHM/ SBT/ 15:45

श्री. मधुकर चव्हाण....

हे पैसे देणे महानगरपालिकेच्या अधिका-यांवर बंधनकारक आहे. तेव्हा हे पैसे सात दिवसात दिले पाहिजेत, अशा प्रकारचे आदेश महानगरपालिकेला देण्यात येतील काय ?

श्री. दयानंद मस्के : सभापती महोदय, माननीय सदस्य श्री. मधुकर चव्हाण यांनी सूचना केल्याप्रमाणे महानगरपालिकेला असे आदेश देण्यात येतील.

श्री. प्रमोद नवलकर : सभापती महोदय, शासनाला सुध्दा महानगरपालिकेचे काही पैसे देणे आहे. त्यामुळे महानगरपालिका ही रक्कम देत नाही. जोपर्यन्त महानगरपालिका पैसे देत नाही, तोपर्यन्त शासनानेसुध्दा कोणतीही रक्कम देऊ नये. अशी भूमिका शासनाला घेण्यामध्ये कोणती अडचण आहे ?

श्री. दयानंद मस्के : सभापती महोदय, माननीय सदस्य श्री. नवलकर यांनी सूचना केल्याप्रमाणे कार्यवाही करण्याचा प्रयत्न करु.

श्री. प्रमोद नवलकर : महानगरपालिकेला अशा प्रकारचे आदेश का देऊ शकत नाही ?

सभापती : मुंबई महानगरपालिकेकडून गृहनिर्माण मंडळाला जे पैसे द्यावयाचे आहेत, ते देण्याबाबतचे आदेश माननीय मंत्रिमहोदय देऊ शकतात काय ?

श्री. दिलीप वळसे-पाटील (खाली बसून) : अशा प्रकारचे आदेश देण्यात येतील असे माननीय मंत्रिमहोदयांनी सांगितले आहे.

श्री. विलास अवचट : सभापती महोदय, उपकरापोटी जी रक्कम महानगरपालिका वसूल करीत असते, ती गृहनिर्माण मंडळाला देणे कायद्याने बंधनकारक आहे. सभापती महोदय, माझ्या माहितीप्रमाणे 1998 सालापासून महानगरपालिकेने ही रक्कम म्हाडाला दिलेली नाही. त्यामुळे महानगरपालिकेने कायद्याचा भंग केला आहे. गेल्या सात वर्षापासून ही रक्कम महानगरपालिकेने म्हाडाला दिलेली नाही. त्यामुळे महानगरपालिकेने कायद्याचे उल्लंघन केलेले आहे. म्हाडाचे पैसे देणे महानगरपालिकेला मँडेटरी आहे. तेव्हा महानगरपालिकेतील ज्या अधिका-यांने या बाबतची कार्यवाही केली नाही, त्या अधिका-याविरुध्द कारवाई करण्यात येईल काय ? सभापती महोदय, निवेदनाच्या शेवटच्या परिच्छेदामध्ये असे म्हटले आहे की, "अंशदानापोटी तसेच उपकरापोटी द्यावयाची रक्कम काही अंशी कमी मिळाली असली तरी वेळोवेळी म्हाडाकडून तात्पुरत्या स्वरुपात मंडळास निधी देऊन दुरुस्ती व पुनर्रचना कार्यक्रमाच्या उद्दिष्टांची पूर्तता करण्याचा प्रयत्न करण्यात

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विलास अवचट......

आला आहे, त्यामुळे दुरुस्ती व पुनर्रचनेच्या कार्यक्रमासाठी शासनाने वेळोवेळी उपाययोजना केली आहे हे दिसून येते." सभापती महोदय, मी या ठिकाणी चिराबाजार येथील दोन इमारतींची माहिती देत आहे. 18, 20, 22, 24, महादेव शंकर लेन येथील या दोन इमारती 1976 साली पाडण्यात आल्या आहेत. तेव्हापासून येथील सर्व रहिवाशी संक्रमण शिबिरात राहत आहेत. त्यांच्यासाठी कोणती व्यवस्था माननीय मंत्रिमहोदय करणार आहेत ?

(सभापतीस्थानी : मा. उपसभापती)

श्री. दयानंद मस्के : सभापती महोदय, महापालिकेकडून येणे असलेल्या रकमेबाबत संबंधीत अधिका-यांना सूचना देण्यात येतात. आता यावेळी त्यांना शेवटची संधी देण्यात येईल. त्यानंतर त्या बाबतची पुढील कारवाई करण्यात येईल.

श्री. विलास अवचट : ही रक्कम देणे महानगरपालिकेवर मँडेटरी असतानाही गेल्या सात वर्षापासून ही रक्कम देण्यात आलेली नाही. महानगरपालिकेने कायद्याचे उल्लंघन केले आहे. असे असताना गेली सात वर्षे फक्त पत्रव्यवहारच करण्यात येत आहे. कोणत्या प्रकारचा पाठपुरावा शासन करीत आहे ?

श्री. दयानंद मस्के : यापूर्वी आपण महानगरपालिकेला संधी दिली आहे. अजून एक संधी देऊ. त्यानंतर पुढील कारवाई करु.

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, शासनाकडून महानगरपालिकेला द्यावयाची रक्कम मोठी आहे. यामध्ये शासनाच्या वेगवेगळ्या विभागाचा अंतर्भाव आहे. मुंबई महानगरपालिकेला शासनाने 358 कोटी रुपये द्यावयाचे आहेत. त्यामुळेच मुंबई महानगरपालिका ही रक्कम देत नाही. गृह खात्याकडून महानगरपालिकेच्या बेस्टच्या सर्विसचा वापर केला जातो. त्यापोटी द्यावयाची रक्कम दिली जात नाही. माननीय उर्जामंत्री श्री. दिलीप वळसे-पाटील यांनी मघाशी हस्तक्षेप करुन एका प्रश्नाला उत्तर देण्याचा प्रयत्न केला होता.

(यानंतर श्री. सरफरे...

अमुद्रित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे...

तेव्हा या बाबतीत सरकार व महानगरपालिका या दोघांनी एकत्र बसून दोघांची जी काही देणी घेणी आहेत ती मिटवून हा विषय संपविला पाहिजे. नाहीतर या दोघांच्या भांडणामध्ये घर दुरुस्ती मंडळाने तरी किती वेळा मार खायचा हा प्रश्न आहे. आज सरकारने 478 कोटी रुपये महानगरपालिकेला दिलेले नाहीत. तेव्हा या देण्या-घेण्याच्या रकमेचा कुठेतरी एकदा निपटारा झाला पाहिजे. कारण सर्वसामान्य लोकांच्या जीविताचा हा प्रश्न आहे. यामध्ये मंडळ निष्कारण मार खात आहे. या बाबतीत वरिष्ठ मंत्रिमहोदयांनी लक्ष घालून वेळोवेळी बैठका घेऊन हा विषय एकदाचा संपविला पाहिजे. दुसरा प्रश्न असा आहे की, निवेदनामध्ये म्हटल्याप्रमाणे अंशदानापोटी म्हाडाकडून तात्पुरत्या स्वरुपामध्ये इमारत दुरुस्ती व पुर्नरचना मंडळास रक्कम दिली जाते ती देणगीच्या स्वरुपामध्ये दिली जाते? कर्जाऊ दिली जाते? टक्केवारीनुसार दिली जाते? आणि दिलेल्या रकमेची वसूली कशी केली जाते?

श्री. दयानंद मस्के : म्हाडाकडून इमारत दुरुस्ती व पुर्नरचना मंडळास सहकारी तत्वावर अंशदानाची रक्कम दिली जाते. व ती परतफेडीच्या हिशेबाने वसूल केली जाते.

श्री. मधुकर चव्हाण : म्हाडा ही पॅरेंट बॉडी आहे, ती रिपेअर बोर्डाला 12 टक्के व्याज दराने बिजभांडवल देते कां?

श्री. दयानंद मस्के : होय, 12 टक्के व्याजदराने देते.

श्री. मधुकर चव्हाण : प्रश्न असा आहे की, तुम्ही सेक्शन 97 प्रमाणे 168 कोटी रुपये देऊ शकता काय? आज साडे बारा लाख लोक ट्रँझिट कँपमध्ये 1976 सालापासून रहात आहेत. आणि आपले अधिकारी केवळ पैसे घ्यायचे काम करीत आहे. वडाळा येथे एकेक लाख रुपये लोकांकडून घेऊन खोटे भाडेकरु घरामध्ये घुसविले आहेत आणि मूळ भाडेकरुंना रस्त्यावर आणले आहे. आपण किती लोकांची घरे बुडविली आहेत? शासनाने 1997 पासून हे पैसे आतापर्यंत कां ठेवले आहेत? ट्रँझिट कँपमध्ये लोक 1976 सालापासून आजपर्यंत खितपत पडले आहेत. ताराबागमधील एका विधवा महिलेची बातमी वर्तमानपत्रामध्ये छापून आली आहे. तिचे लग्न या ट्रँझिट कँपमध्ये झाले तरीही तिला अजून खोली मिळाली नाही. आणि आजही ती या ट्रँझिट कँपमध्ये विधवा झाली आहे. तुम्ही उत्तर दिले की, म्हाडाकडे पैसे नाहीत. अशा पध्दतीने म्हाडाचा कारभार चालला आहे. रिपेअर बोर्डाचे निम्म्यापेक्षा अधिक अधिकारी हे दलाल म्हणून बसलेले असतात. यापैकी ताजुद्दीन

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर चव्हाण...

नावाचा एक माणूस या प्राधिकरणावर पूर्वी होता. माझा प्रश्न असा आहे की, सेक्शन 97 प्रमाणे आपण 168 कोटी रुपये देऊ शकता कां? In Section 97 it is mentioned that " the Government shall pay.." तुम्ही एकही पैसा देऊ शकत नाही. तुम्ही हे 168 कोटी रुपये कधी देणार आहात ते सांगा?

श्री. दिलीप वळसे पाटील : सभापती महोदय, या प्रश्नाच्या संदर्भात सभागृहाच्या असलेल्या भावना लक्षात घेऊन मुंबई महानगरपालिका, म्हाडा व गृहनिर्माण विभागाच्या अधिकाऱ्यांची एकत्रित बैठक घेऊन आणि जी काही एकमेकांची येणी-देणी आहेत ती देण्याच्या संदर्भात माननीय अर्थमंत्र्यांच्या पातळीवर एक बैठक घेऊन या बाबतचा निर्णय 15 दिवसात करण्यात येईल.

डॉ. अशोक मोडक :सभापती महोदय, एक महत्वाचा विषय आहे. त्या संदर्भातील हे कात्रण मी आपणामार्फत मंत्रिमहोदयांकडे पाठवितो. महाराष्ट्र सरकारने म्हाडाकडे कॉटन ग्रोअरना देण्यासाठी 500 कोटी रुपये मागितले. याबाबतीत म्हाडाचे उत्तर असे आहे की, "If MHADA pays Rs.500 crores, it will have to pay Rs.60 crores as income-tax on it's surplus of Rs.210 crores. Under such circumstances, the MHADA has to knock at the doors of financial institutes, the officials said. However, MHADA refused to comply with the order of the government." हे जर नाते असेल तर महाराष्ट्र सरकार म्हाडाकडे भीक मागत आहे. असे असतांना तुम्ही कोणत्या अधिकाराखाली म्हाडाला आदेश देणार? या कात्रणातील बातमी खोटी आहे कां ते सांगा?

श्री. दिलीप वळसे पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी जरुर ती माहिती माझ्याकडे पाठवावी, ती माहिती तपासून घेण्यात येईल.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

लक्षवेधी सूचनेसंबंधी

उपसभापती : आजच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमातील दुसऱ्या क्रमांकाची माननीय सदस्या श्रीमती संजीवनी रायकर व इतर याची लक्षवेधी सूचना पुढे ढकलण्यात आली आहे.

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: 1999 मध्ये सुरु करण्यात आलेली जिजामाता महिला कल्याण विमा योजना.

मु.शी.: 1999 मध्ये सुरु करण्यात आलेली जिजामाता महिला कल्याण विमा योजना यासंबंधी डॉ.नीलम गो-हे, सर्वश्री.विलास अवचट, अनंत तरे, वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

डॉ.नीलम गो-हे (विधानसभेव्दारा निर्वाचित) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय महिला व बालविकास मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छिते आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे,अशी विनंती करते.

"राज्यातील कमावत्या स्त्रियांना अपघात अथवा अपघाती मृत्यू झाल्यास त्यासाठी शासनाने सुरु केलेली जिजामाता महिला कल्याण विमा योजना, सदर योजना 1999 मध्ये सुरु करण्यात आलेली असून हजारो कुटुंबांना या योजनेचा असलेला आधार, जिजामाता महिला कल्याण विमा योजना ही विमा कंपन्यांच्या माध्यमातून चालविण्यात येत असून या योजनेसाठी शासनाने अर्थसंकल्पात कोणतीही आर्थिक तरतूद न केल्याने सदर योजना बासनात गुंडाळली जाणे, परिणामी राज्यातील तमाम कमावत्या महिला वर्गात पसरलेला तीव्र असंतोष व संतापाची लाट, सदर योजना पुनर्जिवित करण्याबाबत शासनाने दाखविलेली अक्षम्य बेपर्वाई लक्षात घेता या प्रकरणी शासनाने तातडीने केलेली वा करावयाची उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया."

श्री.हर्षवर्धन पाटील (महिला व बालकल्याण मंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचने संबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरीत केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

उप सभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

<u>निवेदन</u>

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

. . . .एक्स-2

डॉ.नीलम गो-हे : सभापती महोदय, महाराष्ट्र राज्याने जो मानवी विकास अहवाल प्रकाशित केलेला आहे. त्यामध्ये ज्यांना कुटुंब प्रमुख म्हणता येईल, अशा 88 लाख स्त्रियांची संख्या या शासनाच्याच अहवालात दिलेली आहे. 2000 पासून गेल्या चार वर्षामध्ये जेव्हा-जेव्हा अर्थसंकल्प सादर केला जात होता, तेव्हा महिला बाल विकास कल्याणच्या संबंधात, तसेच पुरवणी मागण्यांवर चर्चा होते, तेव्हा वारंवार शासनाला याबाबतीत आठवण करुन दिलेली आहे. याठिकाणी लक्षवेधी सूचनेच्या निवेदनामध्ये शासनाने म्हटल्याप्रमाणे परत ही विमा योजना सुरु करीत आहात. याचे मी निश्चितच स्वागत करते. पण गेली चार वर्षे ही योजना लाल फितीमध्ये अडकली होती. आपण याठिकाणी जे उत्तर दिलेले आहे, त्यातून स्पष्ट होते की, ज्या विधवा, परितक्ता किंवा कमावत्या कुटुंत प्रमुख स्त्रिया आहेत, त्यांना या योजनेचा फायदा झालेला नाही. उलटपक्षी ज्या विमा कंपन्यांना काही कोटी रुपये दिले होते, त्यामध्ये लाभधारकांची व्याख्या निश्चित न केल्यामुळे हे पैसे वाया गेले. गेल्यावर्षी नाममात्र का होईना, पण यासाठी एक लाख रुपयांची तरतूद दाखविण्यात आली आणि आता असे सांगण्यात आले आहे की, नव्याने विमा योजना सुरु करीत आहोत. या संबंधात माझे बरेच प्रश्न आहेत. पहिला प्रश्न असा आहे की, कमावत्या स्त्रिया, ज्या कुटुंब प्रमुख आहेत, त्यांना याचा फायदा होणार या दृष्टीने किती महिलांसाठी योजना तयार केलेली आहे ? त्यासाठी किती आर्थिक तरतूद केलेली आहे आणि किती दिवसात याची अंमलबजावणी सुरु होईल ? दुसरा प्रश्न असा आहे की, आर्थिक तरतूदीप्रमाणे त्याचे कोणते निकष असतील आणि त्याचे वाटप कशा प्रकारे करण्यात येणार आहे, जेणेकरुन सर्वसामान्य महिलांना या योजनेचा लाभ होऊ शकेल ?

श्री.हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, एक गोष्ट खरी आहे की, जिजामाता महिला आधार विमा योजना शासनाने सुरु केलीहोती. परंतु त्यामध्ये "कुटुंबप्रमुख व्यक्ती" याऐवजी "कमावती व्यक्ती" याच्या डेफीनेशनमध्ये आपण काही बदल प्रस्तावित केले आहेत. यापूर्वी ही योजना एक वर्षासाठी सुरु झाली आणि त्यानंतरच्या काळात म्हणजे पुढील आर्थिक वर्षात याची सुरुवात करता आली नाही. म्हणून यासंदर्भात पुन्हा ही योजना सुरु करण्याच्या बाबतीत आम्ही महिला बालविकास विभागाच्यावतीने विचार सुरु केला आहे. यादृष्टीने आमची सर्व विमा कंपन्यां बरोबर एक बैठकही झ ाली आहे. या बैठकीत चर्चा झाल्याप्रमाणे 30 तारखेपर्यंत त्यांच्याकडून शासनाने प्रस्ताव मागितले आहेत. ते प्रस्ताव प्राप्त होताच, मागच्या पॉलिसीमध्ये काही त्रुटी

. . . .एक्स-2

APR/MHM/SBT 15:55

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

आढळल्या. त्यामुळे अंमलबजावणी करताना काही अडचणी निर्माण झाल्या. म्हणून सर्वसमावेशक अशा प्रकारची, ज्याप्रमाणे विद्यार्थ्यांसाठी राजीव गांधी अपघाती विमा योजना, तसेच शेतक-यांसाठी राजीव गांधी अपघाती विमा योजना आय.सी.आय.सी.आय.मार्फत सुरु करण्याचा प्रयत्न केला. अशाच प्रकारच्या सर्वसमावेशक नव्या योजनेबाबत राज्य शासन विचार करीत आहे आणि ती लवकरात लवकर येथे आणू.

श्रीमती कांता नलावडे : सभापती महोदय, खरे म्हणजे जिजामाता महिला कल्याण विमा योजना युती शासनाच्या काळामध्ये सुरु झाली होती. त्या काळात त्याचा प्रिमिअमही शासनाने भरला होता. पण मधली चार वर्षे ही योजना बानसात गुंडाळली गेली होती. पण आता पुन्हा ही योजना सुरु करीत आहात, त्याबद्दल मी अभिनंदन करते. पण येणा-या काळामध्ये या योजनेचा प्रिमिअम कोण भरणार आहे ? शासन भरणार आहे का ? त्या काळात आम्ही नॅशनल इन्शुरन्स् कंपनीच्या माध्यमातून ज्या घरात कुटुंब प्रमुखांचे अपघाती मृत्यू झाले आहेत, अशा महिलांकडून फॉर्म भरुन घेतले होते आणि त्यांना मदत दिली होती. त्यावेळी पूर्वीच्याच शासनाने याचा प्रिमिअम भरला होता. आता या योजनेचा प्रिमिअम कोण भरणार आहे ?

यानंतर श्री.किल्लेदार . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, पहिल्या पॉलिसीमधील प्रत्येक महिला 1.25 रु. प्रिमियम आिहे. जवळपास 2 कोटी 80 लाख रुपये एवढे प्रिमियम भरलेले होते. त्या पहिल्या पॉलिसीमधील कव्हरेजमध्ये अपघाती मृत्यू झाला तर त्यांच्या कुटुंबियांना 25 हजार रुपये त्याचप्रमाणे कायमस्वरुपी अपंगत्व आले तर 25 हजार रुपये आणि एक हात, एक डोळा गमवावा लागला तर 12,500 रुपये द्यावेत असे होते. शासनाने यामध्ये अशी भूमिका स्वीकारली की महिलेचा अपघाती मृत्यू झाला तर किमान त्यांच्या मागे त्यांच्या कुटुंबियांना 1 लाख रुपये मिळावेत. अपंगत्व आले तर 50 हजार महिलेला मिळावेत आणि एक डोळा, हात, पाय गमवावा लागला तर 25 हजार रुपये महिलेला मिळावेत. अशाप्रकारचे प्रपोजल तयार झालेले आहे. हे पिवळे आणि केशरी शिधापत्रिकाधारक आहेत त्यांच्यापुरती मर्यादित योजना आहे. त्यांची 2001 च्या जनगणनेप्रमाणे 1 कोटी 60 लाख एवढी संख्या आहे. प्रामुख्याने वैद्यकीय मदतीचा विचार करत आहोत. विशेषत: डिलिव्हरीमध्ये नॉर्मल डिलीव्हरी झाली तर त्यामध्ये कव्हरेज नाही, परंतु सिझरींग झाले किंवा इतर काही प्रसंग उदभवले तर त्याचे कव्हरेज या पॉलिसीमध्ये कसे करता येईल याबाबत सर्वसमावेशक अशी योजना कशी करता येईल हे प्रस्तावित केलेले आहे. ही योजना वर्कआऊट करतो आहोत. याकरिता कंपन्यांचे प्रपोजल मागविलेले आहे. त्यामध्ये नॅशनल इन्शुरन्स कोर्पोरेशन, आयसीआय इन्शुरन्स कंपनी, ओरिएन्ट इन्शुरन्स कंपनी, महेंद्र कोटक इन्शुअरन्स कंपनी यांना 30 तारखेपर्यन्त प्रपोजल पाठविण्यास कळविलेले आहे. त्यांची प्रपोजल्स आल्यानंतर त्याची छाननी केली जाईल आणि ज्यांचा कमी प्रिमियम आहे आणि जास्तीत जास्त कव्हरेज असेल त्या कंपन्यांच्या प्रपोजलचा विचार होईल. साधरणत: किंती प्रिमियम बसेल याबाबत माहिती आलेली आहे. जवळपासस 5 ते 6 कोटी रुपये वर्षाला शासनाला प्रिमियम भरावा लागणार आहे. निश्‍चितपणे त्याबाबत फायनल प्रपोजल आल्यानंतर प्रिमियमबाबत विचार केला जाईल.

श्री.विलास अवचट : सभापती महोदय, 'जिजामाता महिला आधार विमा योजने'मध्ये कुटुंबप्रमुखाचे अपघाती निधन झाल्यानंतर त्यांना आर्थिक मदत काय अनुज्ञेय राहील, याबाबतची 'अ' आणि 'ब' मध्ये कोणता लाभ दिलेला आहे ते सांगितलेले आहे. याप्रमाणे किती व्यक्तींना आतापर्यन्त लाभ दिलेला आहे, किती व्यक्तींनी अर्ज केलेले आहेत आणि किती अर्ज प्रलंबित आहेत ?

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, प्राप्त झालेल्या दाव्यांची संख्या 1891 आहे, मंजूर केलेल्या दाव्यांची संख्या 703 आहे आणि मंजूर केलेल्या दाव्यापौटी 1 कोटी 75 लाख 62 हजार 500 रुपये अदा केलेले आहेत. नामंजूर केलेल्या दाव्यांची संख्या 819 आहे आणि योग्य कागदपत्रांअभावी प्रलंबित राहिलेल्या दाव्यांची संख्या 369 आहे.

डॉ. नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, अतिशय आशावादाच्या दृष्टीकोनातून या योजनेचा पुनर्विचार केला जात आहे, ही चांगली गोष्ट आहे. कोणताही धोरणात्मक निर्णय घेत असतांना शासनाच्या विभागाचे मत घेतले जाते, त्यामध्ये महिला आयोगाचे आणि महिला आर्थिक विकास मंहामंडळाचे मत घेतले जाते. परंतु या महिला आयोगाचे अध्यक्ष आणि महिला आर्थिक विकास महामंडळाचे अध्यक्ष ही दोन्ही पदे रिक्त आहेत. त्यामुळे महिला आयोग आणि महिला विकास मंडळातील अनुभवी अधिकारी असतील, त्यांची मते घेतली जाणार. त्याचबरोबर महिला संघटना, आणि अनेक सेवाभावी संस्था यामध्ये काम करत असतात यांची मते घेतली पाहिजेत. योजनेमधील ज्या त्रुटी नंतर लक्षात येतात त्या दृष्टीकोनातून सर्वपक्षाच्या महिला आमदार, महिला संघटना यांची याबाबतीतील मते विचारात घेतली पाहिजेत. मी निदर्शनास आणून देते की, त्यावेळचे पंतप्रधान श्री.राजीव गांधी आणि निलाबेन भट्ट यांनी श्रमशक्ती संघटनेचा अहवाल मागवून त्यांची या संबंधाने मत घेतलेले होते. तेव्हा या योजनेची चांगल्याप्रकारे कशी अंमलबजावणी करता येईल या दृष्टीने श्रमशक्ती संघटनेकडून या संबंधातील अहवाल घेण्याच्या संबंधात, सर्व क्षेत्रामधील महिलांचा यामध्ये फायदा कसा करुन घेता येईल या दृष्टीकोनातून सरकार पावले उचलेल काय ?

यानंतर कु.थोरात....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हर्षवर्धन पाटील :सभापती महोदय, सन्माननीय सदस्या डॉ. नीलम गो-हे यांनी मागणी केलेली आहे आणि महिला संघटना व श्रमिक संघटनांच्या बाबतीत प्रश्न उपस्थित केलेला आहे. त्याप्रमाणे निश्चितपणाने इन्सुरन्स कंपनीचा प्रस्ताव आल्या नंतर महिला आयोग, महिला आर्थिक विकास महामंडळ या सर्वांची बैठक ही योजना चालू करण्यापूर्वी निश्तिपणाने मी घेईल. त्या बैठकीत ज्या सूचना येतील, त्यांचा विचार करण्यात येईल. कुठल्याही परिस्थितीत आज पिवळे कार्डधार, केशरी कार्डधारक महिला असतील त्यांच्यासाठी आता जरी एक लाख रुपयाची टोकन प्रोव्हिजन केली असली तरी ही योजना फायनल झाल्यानंतर निश्चितपणाने नागपूर अधिवेशनात पुरवणी मागण्यांमध्ये तरतूद करण्यात येईल. परंतु महिलांची विमा पॉलिसी काढण्याचा राज्य सरकारचा निश्चितपणाने विचार आहे.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : शासनाने पात्र शाळांना व अनुदानित शाळांना दिलेल्या तुकडयांना अद्याप अनुदान न देणे.

मु. शी : शासनाने पात्र शाळांना व अनुदानित शाळांना दिलेल्या तुकडयांना अद्याप अनुदान न देण्यासंबंधी स-मा-ा-ीय सदस्य सर्वश्री वसंतराव काळे, प्रा. फौजिया खान श्री. रणजितसिंह मोहिते-पाटील,वि.प.स. यां-ी दिलेली लज्वेधी सूच-ाा.

श्री. वसंतराव काळे (औरंगाबाद जिल्हा शिक्षक) : सभापती महोदय, मी आपल्या अ-ुमती-ो -ियम 101 अ-वये पुढील तातडीच्या व सार्वजनिज महत्वाच्या बाबीज्डे स-मा-ा-ीय शालेय शिक्षण मंत्र्यांचे लज वेधू इच्छितो आजि त्याबाबत त्यां-ी -िवेद-ा ज्रावे, अशी वि-ांती ज्रतो.

"सन 2000 साली मंजूर केलेल्या शाळा व तुकडयांना सन 2004-2005 मध्येच अनुदानाचा पहिला टप्पा मिळणे आवश्यक असतानाही अद्याप शासनाने पात्र शाळांची यादी तयार न करणे, पात्र शाळांना व अनुदानित शाळांना दिलेल्या तुकडयांना अद्याप अनुदान न ल्यिामुळे शाळेत काम करणा-या हजारो शिक्षक, कर्मचा-यांची मानसिक स्थिती ढासळणे, त्यांना त्यांच्या भवितव्याची निर्माण झालेली चिंता, त्याचा परिणाम समाजातील नागरिकांमध्ये असंतोषाचे वातावरण निर्माण होणे, त्याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

श्री. हसन मुश्रीफ (शालेय शिक्षण राज्यमंत्री) : सभापती महोदय, निवेदनामध्ये एक दुरुस्ती आहे. पृष्ठ 2 वर खालून आठव्या ओळीत "शाळांची संख्या 1800 इतकी असून" असे म्हटले आहे त्या ऐवजी "शाळांची संख्या 1250 इतकी असून" असे वाचावे. लज्वेधी सूच-ोसंबंधीच्या -िवेद-ााच्या प्रती मा-ा-ीय सदस्यां-ाा आधीच वितरीत जेल्या असल्यामुळे मी ते -िवेद-ा आपल्या अ-ुमती-ो सभाजृहाच्या पटलावर ठेवतो.

उपसभापती : -िवेद-ा सभाजृहाच्या पटलावर ठेवज्यात आले आहे.

-िवेद-ा

(प्रेस : येथे सोबतचे -िवेद-ा छापावे.)

....3 ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. वसंतराव काळे : सभापती महोदय, शासनाने अनुदान देण्याचे जे निकष तयार केलेले आहेत त्या अनुदानाच्या सूत्राप्रमाणे पाचव्या वर्षी 20 टक्के अनुदानाचा टप्पा मिळाला पाहिजे. पण दर वर्षी या पध्दतीने मूल्यांकनाचे निमित्त करुन मूल्यांकनाला वेळ लावून 20 टक्क्याचा टप्पा न देण्याची एक अलिखित अशी योजना या खात्याने आखली आहे असे यातून दिसून येते. या वर्षी कहर असा झाला की, गेल्या वर्षी 20 टक्क्याचे अनुदन मिळण्यासाठी शाळांचे मूल्यांकन करण्यासाठी मूळातच विलंब केला. मार्चमध्ये जिल्हा समितीकडून त्याचे मूल्यांकन झाले.त्यानंतर राज्यसमित्या आणि संचालकांकडे ते अद्यापपर्यंत प्रलंबित आहे. हे मूल्यांकन प्रलंबित असण्याचे मुख्य कारण काय? भ्रष्टाचाराला संधी देण्यासाठी हा विलंब लावला जातो काय? यावेळी मूल्यांकन 15 ऑगस्ट पर्यंत पूर्ण करु असे लेखी निवेदनात म्हटले आहे. गेल्या वर्षीचा 20 टक्क्याचा टप्पा आणि या वर्षीचा 40 टक्के किंवा 60 टक्केचा टप्पा या वर्षीच्या कुठल्या तरतुदीतून हे खाते आणि सरकार देणार आहे याबाबतची निश्चित माहिती द्यावी.

श्री. हसन मुश्रीफ : सभापती महोदय,शाळाचे मूल्यांकन जिल्हा स्तरीय समित्यांचे पूर्ण होऊन ते राज्यस्तरीय समित्यांकडे गेलेले आहे, असे स्पष्टपणे म्हटले आहे. 15 ऑगस्ट, 2005 पर्यंत हे मूल्यांकन पूर्ण होऊन शासनास अहवाल प्राप्त झाल्यानंतर दोन महिन्याच्या आत शासन त्याची यादी तयार करील आणि ती यादी तयार झाल्यानंतर आऊटले मंजूर करुन लवकरात लवकर निधी देण्याचा प्रयत्न करु.

श्री. वसंतराव काळे : सभापती महोदय, मी या ठिकाणी मुख्य मुद्दा उपस्थित केला होता की, मूल्यांकन करण्यासाठी विलंब कां लागला ? विलंब लागण्याचे मुख्य कारण काय? ती प्रक्रिया बँकीग पध्दतीने, नियमितपणे झाली पाहिजे याचे वेळापत्रक आहे. असे असतांना त्या वेळाहपत्रकानुसान ते मूल्यांकन कां केले गेले नाही? मूल्यांकन वेळेवर न करण्यामागे सरकारचा हेतू काय आहे?

श्री. हसन मुश्रीफ : सभापती महोदय, हया विलंबाबद्दल निश्चितपणे संबंधित अधिका-याकडून खुलासा मागवू पण यामध्ये कुठे भ्रष्टाचार झाल्याचे सन्माननीय सदस्य श्री. काळेसाहेबांकडे एखादे उदाहरण असेल तर त्यांनी ते शासनाच्या निदर्शनास आणून द्यावे. शासन त्याबाबतीत निश्चितपणे कारवाई करील.

..4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. वसंतराव काळे : सभापती महोदय, यासंबंधात शेकडो पुरावे देता येतील. माननीय मंत्रिमहोदय, स्वत:चे उत्तर देत आहेत की, अधिका-यांनी तयार करुन दिलेले उत्तर देत आहेत? अशा प्रकारची शंका येते. शासन लोकप्रतिनिधींच्या, लोकांच्या भावना विचारात घेणार नसेल आणि अधिका-यांनी लिहून दिलेले उत्तर स्टिरियोटाईप पध्दतीने उत्तर देणार असेल तर हा प्रश्न सुटणार नाही. हजारो शिक्षक 5/5 वर्षे उपाशी राहिलेले आहेत. त्यांना त्यांचा 20 टक्केचा पहिला टप्पा मिळणे आवश्यक आहे. त्याचे मूल्यांकन वेळेवर होणे आवश्यक आहे. ते मूल्यांकन वेळेवर होत नाही. माननीय मंत्रिमहोदय, सांगत आहेत की, यांबंधीचा खुलासा मागवू, माहिती घेऊ.

यानंतर श्री.बरवड.....

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री. वसंतराव काळे ...

मग तुम्ही हा विलंब का लावला ? आपण पुरवणी मागण्यांमध्ये यांसदर्भात एक पैशाचीही तरतूद मागितलेली नाही. म्हणजे तुम्हाला ते द्यावयाचे नाही. त्यांना तुम्हाला कोणताही टप्पा द्यावयाचा नाही. फक्त आम्ही उपस्थित केलेल्या प्रश्नाला समाधान करण्यासाठी दोन महिन्यात यादी जाहीर करु असे सांगत आहेत. कधी तरी याबाबत आऊट ले देऊ असे सांगत आहेत. या वर्षाचा टप्पा द्यावयाचा नाही, गेल्या वर्षीचा टप्पा द्यावयाचा नाही अशी शासनाची भूमिका आहे. हा कट आहे असा माझा आरोप आहे. दोन महिन्याच्या आत नुसती यादी जाहीर करुन चालणार नाही तर यादी जाहीर करुन त्यांचे गेल्या वर्षीचे 20 टक्के अनुदान आणि या वर्षीचा जो टप्पा असेल त्या टप्प्यातील अनुदान या शाळांना दोन महिन्याच्या आत देण्याची व्यवस्था करणार काय ?

श्री. हसन मुश्रीफ : सभापती महोदय, यापूर्वी सुध्दा शासनाने 154 कोटी रुपयांची तरतूद केलेली आहे. यापूर्वी डीपीडीसी मार्फत त्यांचे पगार भागविले जावयाचे. सन 2003-04 पासून शासनाने हे शासकीय पातळीवर आणले आहे आणि महिन्याच्या महिन्याला वेतन मिळण्याची सुविधा निर्माण करुन दिलेली आहे. जो विलंब झालेला आहे त्याबाबत सन्माननीय सदस्य श्री. वसंतराव काळे साहेबांनी जी तक्रार केलेली आहे त्याबाबत सांगू इच्छितो की, थोडासा अवधी झालेला असला तरी निकष पूर्ण करण्यासाठी त्या शाळांना बराच वेळ देतो. या 2000 सालच्या शाळा आहेत. यापूर्वीच्या सगळया तुकडया अनुदानावर आणलेल्या आहेत. आपण चार वर्षेपर्यन्त अनुदान देत नाही. पाचव्या वर्षी 20 टक्के अनुदान चालू करतो. राज्य स्तरावर थोडासा विलंब झालेला आहे. त्याबाबतीत खुलासा मागवू असे सांगितले आहे. 15 ऑगस्ट पर्यन्त यादी तयार होईल. दोन महिन्यात यादी जाहीर करु असे मी सांगितले आहे. लवकरात लवकर निधीची तरतूद करुन त्यांना अनुदान प्राप्त करुन देऊ

उपसभापती : यानंतर पुढची लक्षवेधी सूचना घेण्यात येईल.

श्री. वसंतराव काळे : सभापती महोदय, गेल्या वर्षीचे 20 टक्के अनुदान आणि या वर्षीचा जो टप्पा असेल ते अनुदान दिले पाहिजे. फक्त यादी जाहीर करुन चालणार नाही.

उपसभापती : : मी पुढची लक्षवेधी सूचना पुकारलेली आहे.

...2..

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ MAP/ KGS/

श्री. वसंतराव काळे : सभापती महोदय, आम्हाला न्याय मिळाला पाहिजे. हा त्यांच्या जीवनमरणाचा प्रश्न आहे. पाच पाच वर्षे उपाशी मरणाऱ्या माणसांचा विचार करण्यात येत नाही. याबाबत आमच्या वेदना आहेत. यासाठी निश्चितपणे आर्थिक तरतूद करुन त्यांना अनुदान देणार काय ? याबाबत माननीय मंत्रिमहोदयांनी उत्तर दिलेले नाही. सभापती महोदय, आम्हाला आपले संरक्षण पाहिजे. मी आपल्याला विनंती करतो.

श्री. हसन मुश्रीफ : यातील किती शाळा अनुदानावर येणार आहेत, किती शाळा पात्र ठरणार आहेत हे पाहून त्यानंतर नियतव्ययाची तरतूद करावी लागेल. मी सांगितले की, 15 ऑगस्टपर्यन्त यादी आल्यानंतर दोन महिन्याच्या आत यादी जाहीर केली जाईल.

श्री. वसंतराव काळे : गेल्या वर्षीचे 20 टक्के अनुदान देणार काय ?

श्री. हसन मुश्रीफ : गेल्या वर्षीचे देता येणार नाही. मूल्यांकनाच्या आधीचे कसे देता येईल ? जिल्हास्तर पातळीवर निकष पूर्ण करण्यासाठी त्यांना वेळ देतो. बराच वेळ झालेला आहे हे म्हणणे खरे नाही. परंतु 15 ऑगस्टपूर्वी यादी पाठविण्यास सांगितले आहे. आम्ही दोन महिन्याच्या आत यादी जाहीर करु आणि निकष पूर्ण करणाऱ्या ज्या शाळा असतील त्यांच्या नियतव्ययाची तरतूद करुन त्यांना अनुदान देऊ.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ MAP/ KGS/

पृ. शी. : कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालयातील शिक्षणासाठी इतर मागासवर्गीय विद्यार्थ्यांकरिता लागू केलेल्या फी माफी व शिष्यवृत्ती योजनेस देण्यात आलेली स्थगिती.

मु. शी. : कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालयातील शिक्षणासाठी इतर मागासवर्गीय विद्यार्थ्यांकरिता लागू केलेल्या फी माफी व शिष्यवृत्ती योजनेस देण्यात आलेली स्थगिती यासंबंधी सर्वश्री सुधाकर गणगणे, प्रा. जोगेंद्र कवाडे, सर्वश्री नतिकोद्दीन खतिब, सुधीर सावंत, चंद्रकांत रघुवंशी, वसंतराव खोटरे, जितेंद्र आव्हाड, धोंडीराम राठोड, वसंतराव काळे, रामदास तडस, रमेश निकोसे, उल्हास पवार, संजय दत्त, व्ही. यू. डायगव्हाणे, पांडुरंग फुंडकर, प्रा. बी. टी. देशमुख, सर्वश्री अब्दुल सत्तार अब्दुल नबी, विनायक मेटे, रणजितसिंह मोहिते-पाटील, श्रीमती सुधा जोशी, सर्वश्री सदाशिवराव पोळ व गुरुनाथ कुलकर्णी, वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री. सुधाकर गणगणे (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय सामाजिक न्याय मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"राज्यातील इतर मागासवर्गीय विद्यार्थ्यांना सन 2003-04 या शैक्षणिक वर्षापासून भारत सरकार पुरस्कृत मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती योजना शासकीय व अनुदानित महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना व स-I 2004 मध्ये शास-I निर्जयान्वये ही योजना विनाअनुदानित महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनाही लागू करण्यात आलेली असणे, कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालयातील शिक्षणासाठी इतर मागासवर्गातील विद्यार्थ्यांकरिता फी माफी व शिष्यवृत्तीबाबत राज्य शासनाने अचानक स्थगितीचे आदेश दिले असणे, यामुळे शैक्षणिक वर्षाअखेर सदरहू फीची रक्कम भरणा केल्याशिवाय इतर

...4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ MAP/ KGS/

श्री. सुधाकर गणगणे .....

मागासवर्गीय गरीब विद्यार्थ्यांना परीक्षेला बसता न येणे, शासकीय कार्यवेळेमध्ये आपल्याच काळात शासनाने अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती आणि इतर मागासवर्ग या तिन्ही वर्गातील अनुदानित व विनाअनुदानित संस्थांमध्ये शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना फी माफी आणि शिष्यवृत्ती देण्याचा निर्णय घेतला असून त्या निर्णयाला राज्य शासनाने घेतलेल्या स्थगितीमुळे अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती आणि इतर मागासवर्ग या तिन्ही वर्गातील विद्यार्थ्यांची व त्यांच्या पालकांची निर्माण झालेली उपेक्षा, मागील विधिमंडळ अधिवेशनात राज्य शासनाने दिलेले आश्वासनपूर्ती न झाल्याने राज्यातील इतर मागासवर्गीय विद्यार्थ्यांमध्ये निर्माण झालेला असंतोष व त्यांच्यावर झालेला अन्याय, याबाबत शासनाची भूमिका."

श्री. धर्मरावबाब आत्राम (सामाजिक न्याय राज्यमंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

उपसभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ MAP/ KGS/

श्री. सुधाकर गणगणे : सभापती महोदय, विधिमंडळाच्या गेल्या अधिवेशनामध्ये राज्य शासनाने असे आश्वासन दिले होते की, ज्या विनाअनुदानित शाळा आणि कॉलेजेस आहेत त्यासंबंधीची परीक्षा फी व शिक्षण फी देण्याबाबतचा निर्णय मंत्रिमंडळ एक महिन्याच्या आत घेईल. आता जवळजवळ 4 महिन्याचा कालावधी गेलेला आहे. अजूनही या बाबतचा निर्णय झालेला नाही. हा निर्णय न झाल्यामुळे ओबीसी विद्यार्थ्यांमध्ये अत्यंत निराशा निर्माण झालेली आहे. ही अतिशय गंभीर बाब आहे. या निवेदनामध्ये असे म्हटले आहे की, सदरची बाब पुन्हा मंत्रिमंडळापुढे आणून निर्णय लवकरच घेण्यात येईल. निर्णय किती कालावधीमध्ये घेण्यात येईल ?

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ MAP/ KGS/ श्री.बरवडनंतर 16:15

श्री.धर्मरावबाबा अत्राम : सभापती महोदय, या अगोदर आम्ही मा.वित्त मंत्र्यांकडे प्रस्ताव पाठविला होता परंतु त्यांनी त्याला नकार दिला आहे. त्यामुळे आम्ही सदर प्रस्ताव मुख्य सचिवांशी बोलून मंत्रिमंडळासमोर आणत आहोत. लवकरात लवकर म्हणजे एक महिन्याच्या आत मंत्रिमंडळासमोर आणून योग्य तो निर्णय आम्ही घेणार आहोत.

श्री.सुधाकर गणगणे : सभापती महोदय, हा सभागृहाचा अवमान आहे, ही बाब अत्यंत गंभीर आहे. एक महिन्याच्या आत यासंदर्भात निर्णय घेऊ अशाप्रकारे शासनाने जाहीर केल्यानंतरही ओबीसीच्या विद्यार्थ्यांना आतापर्यंत कोणताही रिलीफ दिलेला नाही. याबाबत निश्चित निर्णय केव्हा होईल याचे सभागृहामध्ये आश्वासन द्यावे.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, आज सकाळपासून तिस-यांदा हा विषय आलेला आहे. या सभागृहामध्ये विविध प्रश्नांवर आश्वासने दिली जातात. एक महिन्याच्या आत करतो असे सांगितले जाते. पण एक महिना उलटल्यानंतर तो विषय पुढील अधिवेशनामध्ये जातो. आज दुपारीही ओबीसीच्या विद्यार्थ्यांचा विषय सभागृहामध्ये आला होता. फुले, शाहू महाराज, आंबेडकर यांचे नाव घेणारे हे शासन त्यांच्या नावाचे भांडवल करते आणि असे सांगते की, काहीही झाले तरी याबाबत मागेपुढे पाहणार नाही आम्ही एक महिन्यामध्ये निर्णय घेऊ. निर्णय घेऊ म्हणजे हा शासनाचा शब्द आहे आणि तो पाळण्याची शासनाची जबाबदारी असते, सरकारची असते. परंतु मंत्र्यांच्या आश्वासनांना वाटाण्याच्या अक्षता लावण्याचे काम वित्त विभागातील अधिकारी करीत असतील, वित्त विभागाचे अधिकारी नकार देत असतील तर तुम्ही राजीनामा का देत नाही ? कशासाठी येथे बसला आहात ? सदनामध्ये तुम्ही शब्द देता आणि वित्त विभागाचे अधिकारी तुम्हाला नाचवितात आणि तुम्ही त्यांच्यासमोर वाकता ? ओबीसीच्या विद्यार्थ्यांच्या परीक्षा झाल्या आहेत. त्या विद्यार्थ्यांना परीक्षेला बसता आले नाही. वित्त विभागाचे अधिकारी मंत्र्यांचे ऐकत नाहीत, महाराष्ट्रामध्ये शाहू महाराज, फुले, आंबेडकर यांचे नाव घेऊन कारभार करणा-या शासनाचे अधिकारी जर असे वागत असतील तर अशा अधिका-यांना जागेवर ठेवू नये नाही तर या सदनामध्ये शाहू महाराज, फुले, आंबेडकर यांचे नाव घेऊन भाषणे करु नये. सभापती महोदय, आम्ही हा प्रश्न मांडल्यानंतर आपण आम्हाला संरक्षण दिले होते. तरीही शासन या प्रश्नाबाबत अद्यापही गंभीर नाही.

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ MAP/ KGS/

श्री.सुधाकर गणगणे : सभापती महोदय, मी मघाशी उपस्थित केलेल्या प्रश्नाला उत्तर मिळालेले नाही. हा प्रश्न अत्यंत गंभीर आहे, ज्याप्रकारे मंत्रिमहोदय, उत्तर देत आहेत हा सदनाचा अवमान आहे.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, गेल्या तीन अधिवेशनामध्ये हा प्रश्न उपस्थित झ ाालेला आहे. मागील डिसेंबरच्या नागपूर अधिवेशनापूर्वीही हा प्रश्न आला होता तेव्हापासून हेच उत्तर सुरु आहे की, निधीची तरतूद करीत आहोत, निर्णय घेत आहोत, लवकरच निर्णय घेऊ. शासनाने एक वर्षापूर्वी शिष्यवृत्ती दिली ती निवडणुका होत्या म्हणून दिली होती काय ? ओबीसींची मते पाहिजे होती म्हणून त्यावेळी शिष्यवृत्ती दिली काय ? निवडणुका संपल्यावर शिष्यवृत्ती बंद केली आहे. राज्यामध्ये ओबीसीच्या विद्यार्थ्यांवर अन्याय होत आहे, त्यांचे प्रवेश झालेले नाहीत, आता त्यांचा आर्थिक भार शासनावर येत नाही तरीही वित्त मंत्री मंजुरी देत नाहीत त्यामुळे आपण संरक्षण दिले पाहिजे. हे विद्यार्थी परीक्षेला बसू शकले नाहीत, ओबीसींच्या विद्यार्थ्यांबाबत शासनाची चालढकल सुरु आहे. मी शासनाला विनंती करीत आहे, यासंबंधी निर्णय घेण्यात यावा. शाहू महाराज, फुले, आंबेडकर यांचे नाव घेऊन राज्यकारभार करता आणि ओबीसींच्या विद्यार्थ्यांवर तुम्ही अन्याय करीत आहात तेव्हा हे अधिवेशन संपेपर्यंत शासन तातडीने यासंबंधी निर्णय घेणार आहे काय ?

नंतर श्री.शिगम.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ MAP/ KGS/ पूर्वी श्री. खंदारे 16:20

श्री. धर्मरावबाबा आत्राम : मी या अगोदर सांगितले आहे की, आम्हाला मंत्रिमंडळापुढे जावयाचे आहे. एका महिन्यात आम्ही जावू. ओ.बी.सी.वर आम्ही कधीही अन्याय केलेला नाही. अनुदानित शाळांतील विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती, परीक्षा फी दिली जाते. विनाअनुदानित शाळातील जे 65 हजार रु. उत्पन्नाच्या आतील नॉन क्रिमिलिअर आहेत त्यांना देखील शिष्यवृत्ती, परीक्षा फी दिली जाते. फक्त 30 हजार विद्यार्थ्यांचा प्रश्न आहे. मागच्या वेळी 71 कोटी रु. लागतील असे सांगितले होते. वास्तविक इतके पैसे लागत नाहीत. म्हणून मंत्रिमंडळापुढे आम्ही जाणार आहोत. एक महिन्याच्या आत मंत्रिमंडळापुढे जावू.

(दोन्ही बाजूचे अनेक मा.सदस्य एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करीत असतात.)

प्रा. बी.टी.देशमुख : गेल्या वेळी मा.मंत्री महोदयांनी याबाबतीत एक महिन्यामध्ये निर्णय घेऊ असे स्पष्टपणे सांगितले होते. अनुदानित शाळांतील विद्यार्थ्यांना सवलत दिली जाते मात्र विनाअनुदानित शाळांतील विद्यार्थ्यांना सवलत दिली जात नाही ही गोष्ट अत्यंत चुकीची आहे. एकाच घरातील अनुदानित शाळेत जाणा-या विद्यार्थ्याला सवलत मिळते आणि विनाअनुदानित शाळेत जाणा-या विद्यार्थ्याला ती सवलत मिळत नाही. हे विनाअनुदानित शाळांचे पाप या सरकारचे आहे. त्यामध्ये विद्यार्थ्यांचा काय दोष आहे ? एकाच घरामध्ये, गावामध्ये अशा गोष्टी घडणे इष्ट नाही असे मी मागच्या वेळी शासनाला सांगितले होते. समाजामध्ये अशा प्रकारची विस्कळीत व्यवस्था जिवंत राहू शकत नाही. मागच्या वेळी एक महिन्यामध्ये याबाबतीत निर्णय घेतला जाईल असे मंत्री महोदयांनी सांगितले. आता वित्त विभागाची मान्यता घेतो असे मंत्री महोदयांनी सांगितले. हा वित्त विभाग स्वर्गातून खाली पडला आहे काय ? याठिकाणी मंत्री महोदयांनी शासन म्हणून उत्तर दिलेले आहे. वित्त विभाग तुम्हाला कस्पटासमान समजते असा अर्थ होणे चांगले नाही. तेव्हा वित्त विभागाला त्यांची जागा दाखवण्यासाठी हे सभागृह आहे. म्हणून मा.मंत्री महोदय याप्रकरणी हे अधिवेशन संपण्यापूर्वी निर्णय घेतील काय ?

श्री. धर्मरावबाबा आत्राम : आपल्याला जी तरतूद पाहिजे होती ती तरतूद 71 कोटी रु. होती असे मागच्या वेळी मी सांगितले होते. प्रत्यक्षात तरतूद कमी लागते. म्हणून ती गोष्ट वित्त विभागाच्या नजरेस आणून एक महिन्याच्या आत याबाबतीत निर्णय घेऊ.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(दोन्ही बाजूचे अनेक मा.सदस्य आपापल्या जागा सोडून मार्गिकेमध्ये येऊन बोलण्याचा प्रयत्न करीत असतात.)

श्री. सुधाकर गणगणे : अधिवेशन संपण्यापूर्वी निर्णय घ्यावा...

प्रा. बी.टी.देशमुख : याप्रकरणी अधिवेशन संपण्याच्या आत शासनाने निर्णय घेतला पाहिजे.

उपसभापती : मा.सदस्य श्री. सुधाकर गणगणे व इतर विधान परिषद सदस्य यांची या विषयावरील लक्षवेधी सूचना मागील तीन अधिवेशनामध्ये सातत्याने उपस्थित होत असून आता या सदनाच्या भावना लक्षात घेता हे अधिवेशन संपण्यापूर्वी याप्रकरणी शासनाने निर्णय घ्यावा अशा प्रकारचे निदेश मी देत आहे.

श्री. धर्मरावबाबा आत्राम : होय.

....3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी. : ठाणे जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यात नागरी संरक्षण दल व होमगार्डची स्थापना करणे

मु.शी. : ठाणे जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यात नागरी संरक्षण दल व होमगार्डची स्थापना करणे याबाबत श्री.मुझफ्फर हुसैन, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

उपसभापती : माननीय सदस्य श्री. मुझफ्फर हुसैन,वि.प.स. यांनी एक विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री. मुझफ्फर हुसैन (महाराष्ट्र विधानसभेने निवडलेले : महोदय, मी पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो.

...नंतर श्री.गिते..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ABG/ MAP/ KGS/ प्रथम श्री. शिगम 16:25

श्री.मुझफ्फर हुसेन...

सभापती महोदय, ठाणे जिल्हयात 7 महानगरपालिका,9 नगरपालिका,15 तालुक्याची ठिकाणे आहे. या जिल्हयात पश्चिम व मध्य रेल्वेच्या खाडीवरील ब्रीज,अहमदाबाद हायवेचा वसई क्रिक ब्रिज व धरणे, विद्युत निर्मिती केंद्र तसेच जिल्हयात अनेक भुकंप प्रवण क्षेत्रामध्ये येत असल्याने नैसर्गिक किंवा मानवनिर्मित आपत्कालीन परिस्थितीत लोकांना मदत करण्यासाठी कोणतीही यंत्रणा कार्यरत नसल्याने व जिल्हयातील बहुतांश भाग हा किनारपट्टीचा असल्याने सुनामी सारखे दुर्देवी प्रसंग उदभवल्यास तसेच काही दिवसापूर्वी घडलेला शहापूर तालुक्यातील घाटघर विजमिर्निती केंद्रामधील दुर्देवी प्रसंग, पुराचे प्रसंग, मोडकळीस आलेल्या इमारती पडणे,आकस्मीत आग लागणे, अशा प्रकारच्या नैसर्गिक आपत्तीची तीव्रता कमी करण्यासाठी, लोकांचे मनोबल कायम करण्यासाठी, अग्निशमन विमोचन कार्य करणे, प्रथमोपचार करणे आदी महत्वाची आपत्कालीन नागरी संरक्षणाची शासकीय यंत्रणा फक्त जिल्हयाच्या ठिकाणी कार्यरत आहे, आपत्कालीन सेवा देण्यासाठी ठाणे जिल्हयात सर्व तालुक्यांच्या ठिकाणी नागरी संरक्षण दल व होमगार्डची स्थापना करणे गरजेचे आहे. ठाणे जिल्हयाची भौगोलिक परिस्थिती आणि वाढती लोकसंख्या लक्षात घेता ठाणे जिल्हयातील प्रत्येक तालुक्यात नागरी संरक्षण दल व होमगार्डची निर्मिती करावी यासाठी ही विशेष उल्लेखाव्दारे विनंती करीत आहे.

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : रायगड जिल्हयातील आय.पी.सी.एल.प्रकल्पग्रस्तांच्या मागण्या.

मु. शी. :रायगड जिल्हयातील आय.पी.सी.एल.प्रकल्पाग्रस्तांच्या मागण्या याबाबत श्री.जयंत प्र. पाटील,वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

उपसभापती : मा-ा-ीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील यां-ी एज विशेष उल्लेजासंबंधीची सूच-ाा दिली आहे. त्यां-ी ती मांडावी.

श्री.जयंत प्र.पाटील (महाराष्ट्र विधानसभा सदस्याव्दारा निर्वाचित) : महोदय, मी पुढील विशेष उल्लेजासंबंधीची सूच-ाा मांडतो.

" रायगड जिल्हयातील आय.पी.सी.एल. प्रकल्पग्रस्तांच्या मागण्यांबाबत कोणताही निर्णय वीस वर्षे उलटूनही झाला नसल्याने प्रकल्पग्रस्त व अन्याय निवारण समितीने दिनांक 2 मे,2005 रोजी "रास्ता रोको" आंदोलन केले आहे.

सन 1984-85 मध्ये आय.पी.सी.एल.च्या वतीने भूसंपादन अधिकारी रायगड यांच्याकडून प्रकल्पग्रस्तांना दाखले देण्यात आले आहेत. 1997 मध्ये तत्कालीन मुख्यमंत्री यांच्यासह त्यांनी व्यवस्थापन आणि प्रशसकीय अधिका-यांची बैठक घेऊन कंपनीसाठी जमीन संपादित केलेले 90, प्रकल्पग्रस्त, कंपनीच्या रेल्वेमार्गासाठी जमीन संपादित केलेले 68, प्रकल्पाला ज्यांच्या घरांचा अडथळा होत होता, तसेच उर्वरित 16 प्रकल्पग्रस्त व ज्यांची 1987-88 मध्ये वैद्यकीय चाचणी झ ाली असे 42 प्रकल्पग्रस्त अशा अनेकांना कंपनीने अजूनही कामावर घेतले नाही. प्रकल्पग्रस्त समितीने राज्याचे मुख्यमंत्री व संबंधित अधिकारी व कंपनी याकडे निवेदने देऊन हा प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न केला परंतु प्रकल्पग्रस्तांना अद्यापि न्याय मिळाला नाही.

तरी प्रकल्पग्रस्तांच्या या मागण्याबाबत शासनाने विशेष लक्ष देण्यासाठी हा विशेष उल्लेख करीत आहे.

3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : मुंबई शहरातील पुनर्रचीत झालेल्या इमारतींना कर सवलत रद्द करणे.

मु. शी. :मुंबई शहरातील पुनर्रचीत झालेल्या इमारतींना कर सवलत रद्द करणे याबाबत श्री.मधुकर चव्हाण,वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

उपसभापती : मा-ा-ीय सदस्य श्री.मधुकर चव्हाण यां-ी एज विशेष उल्लेजासंबंधीची सूच-ा दिली आहे. त्यां-ी ती मांडावी.

श्री.मधुकर चव्हाण (मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था) : महोदय, मी पुढील विशेष उल्लेजासंबंधीची सूच-ा मांडतो.

" सभापती महोदय, मुंबई शहरामध्ये सुमारे 20 हजार जुन्या व मोडकळीस आलेल्या इमारती असून यामध्ये अंदाजे 30 लाख गरीब, निम्नस्तर मध्यमवर्गीय लोक राहतात. यापैकी आतापर्यन्त विकास नियंत्रण नियम 33/7 अन्वये सुमारे 750 इमारती पुनर्रचित झालेल्या आहेत. मुंबई शहर व उपनगरातील झोपडपट्टी पुनर्विकास योजनेंतर्गत झालेल्या इमारतींना दि.23.11.95 पासून नगरविकास खात्याच्या नोटिफिकेशननुसार पहिल्या 10 वर्षाकरिता 20 टक्के नंतरच्या 5 वर्षाकरिता 50 टक्के व त्यानंतरच्या 5 वर्षाकरिता 80 टक्के असा सवलतीच्या दराने मालमत्ता कर आकारण्यात येतो. तसेच जुन्या मोडकळीस आलेल्या व पुनर्रचीत केलेल्या चाळींनाही सवलतीच्या दराने मालमत्ता कर दिनांक 24.9.2001 पर्यन्त आकारण्यात येत होता. परंतु मुंबई महानगरपालिकेने दिनांक 25.9.2001 पासून पुनर्रचीत झालेल्या इमारतींना ही कर सवलत अचानकपणे रद्द केल्याने गरीब व सामान्य नागरिकांना नवीन कर न परवडल्यामुळे मुंबई बाहेर जावे लागेल. त्यामुळे त्यांच्या मनात शासनविषयी असंतोष निर्माण झाला असल्याने वरील कर सवलत त्वरीत पुनर्स्थापित करुन गरीब व मध्यम वर्गीयांना न्याय व दिलासा द्यावा.

मुंबई शहरामध्ये अंदाजे 20 हजार जुन्या व मोडकळीस आलेल्या चाळी असून यामध्ये अंदाजे 30 लाख गरीब व निम्नस्तर मध्यमवर्गीय लोक राहतात. यापैकी आतापर्यन्त विकास नियंत्रण नियम क्रमांक 33/7 अन्वये अंदाजे 750 इमारतीपुनर्रचित झालेल्या असून शेकडो इमारती

4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पुनर्रचित होण्यास सुरुवात झाली आहे. उरलेल्या इमारतीपैकीही शेकडो इमारतीआज ना उद्या नियम क्रमांक 33/7 अन्वये पुनर्रचित होण्याची दाट शक्यता आहे. या सर्व इमारतींमध्ये गरीब, कामगार वर्गातील व निम्नस्तर मध्यमवर्गीय लोकच राहत आहेत. परंतु दि. 23.11.1995 पर्यन्त नियम क्रमांक 33/7 अन्वये पुनर्रचित झालेल्या इमारतींमधील रहिवाशांना मालामत्ताकरात कोणतीही सवलत दिली जात नव्हती.

परंतु,मुंबई शहर व उपनगरातील झोपडपट्टी पुनर्विकास योजनेअंतर्गत म्हणजेच वि.नि.नि.क्र.33/10 अन्वये पुनर्रचित झालेल्या इमारतींना मात्र दि.23.11.95 पासून नगरविकास खात्याचे नोटिफिकेश क्र.बी.एम.सी./1996/66183/सीआर-50/97/युडी/21 दि.7 नोव्हेंब,1997 च्या व्दारे पहिल्या 10 वर्षाकरीता केवळ 20 टक्के, नंतरच्या 5 वर्षाकरीता 50 टक्के व त्यानंतरच्या 5 वर्षाकरीता 80 टक्के असा सवलतीच्या दराने मालमत्ता कर आकरण्यात यावा, अशी सवलत देण्यात आली.

वरील नोटीफिकेशनच्या आधारे मुंबई महानगरपालिकेने सर्क्युलर क्र.एसी/42/जन. दि.3/2/98 व्दारे वि.नि.नि.क्र.33/7,33/8 व 33/9 अन्वये पुनर्रचित झालेल्या इमारतींनासुध्दा पूर्वलक्षी प्रभावाने म्हणजेच दिनांक 23.11.1995 पासून वरील सवलत जारी केली व ही सवलत दिनांक 24.09.2001 पर्यन्त सुरु होती.

परंतु मुंबई महानगरपालिकेने सर्क्युलर क्र.एसी/27/जन.दि.25.09.2001 व्दारे वि.नि.नि.क्र.33/7,33/8 व 33/9 अन्वये पुनर्रचित झालेल्या इमारतींना वर दर्शविलेली सवलत अचानकपणे रद्द केली आणि यासाठी याच सर्क्युलरमध्ये असे कारण देण्यात आले की, मुंबई महानगरपालिका अधिनियमातील कलम क्र.144 "ब" नुसार अशी सवलत देता येणार नाही.

याचाच अर्थ जोपर्यन्त मुंबई महानगरपालिका अधिनियमातील कलम क्र.144 "ब" मध्ये योग्य त्या सुधारणा केल्या जात नाहीत. तोपर्यन्त वरील सवलती मुंबई महानगरपालिकेस पुन्हा सुरु करणे शक्य नाही व त्यासाठीच वरील संघर्ष समितीने चळवळ उभारुन वरील बाब शासनाच्या निदर्शनास आणली.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

5...

माजी मुख्यमंत्री श्री. सुशीलकुमार शिंदे यांच्या नेतृत्वाखाली दि.18.8.2004 च्या कॅबिनेट मिटींगमध्ये व पुन्हा सध्याचे मुख्यमंत्री श्री. विलासराव देशमुख यांच्या नेतृत्वाखाली दिनांक 12.4.2005 च्या कॅबिनेट मिटींगमध्ये पुनर्रचित इमारतींना मालमत्ताकरात वरील प्रमाणेच सवलत पुन्हा देण्यात यावी. हा विषय अत्यंत महत्वाचा व सार्वजनिक हिताच्या दृष्टीने महत्वाचा असल्याने तो मी आज सभागृहात विशेष उल्लेखाव्दारे उपस्थित केलेला आहे.

यानंतर श्री. कानडे..

अस्धारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: कोकण विभागासाठी स्वतंत्र शिक्षण उपसंचालक,न्यायाधिकरण व शालांत परीक्षा मंडळ मिळणे.

मु.शी.: कोकण विभागासाठी स्वतंत्र शिक्षण उपसंचालक,न्यायाधिकरण व शालांत परीक्षा मंडळ मिळणे याबाबत श्री.रामनाथ मोते,वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

उपसभापती : मा.सदस्य श्री. रामनाथ मोते यांनी एक विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री. रामनाथ मोते (कोकण विभाग शिक्षक): सभापती महोदय, मी पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो.

सभापती महोदय, नागपूरच्या हिवाळी अधिवेशनात आणि मागील अर्थसंकल्पीय अधिवेशनात मी वरील विषयाबाबतची विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडली होती. परंतु त्याचे उत्तर शासनाकडून आजपर्यंत आलेले नाही. आजच्या विशेष उल्लेखासंबंधीचे उत्तर सुध्दा शासनाकडून मिळणार नाही असे गृहीत धरुन मी हा विशेष उल्लेख करीत आहे.

कोकण विभागासाठी स्वतंत्रपणे शिक्षण उपसंचालक कार्यालय,न्यायाधिकरण,शालांत परीक्षा मंडळ व्हावे यासाठी हा विशेष उल्लेख करीत आहे. कोकण विभागामध्ये ठाणे,रायगड,रत्नागिरी आणि सिंधुदूर्ग या चार जिल्हयांचा समावेश होतो. महाराष्ट्रामध्ये जे महसूली विभाग आहेत त्या महसूली विभागांमध्ये स्वतंत्रपणे एस.एस.सी.परीक्षेसाठी स्वतंत्र बोर्ड आहे. शिक्षण उपसंचालकाचे स्वतंत्र कार्यालय आहे. याबाबतीत कोकणावर मात्र अन्याय झालेला आहे. कोकणातील या चार जिल्हयांपैकी रत्नागिरी आणि सिंधुदूर्ग हे दोन जिल्हे उपसंचालकांच्या बाबतीत कोल्हापूरला जोडले आहेत आणि रायगड व ठाणे जिल्हा हे दोन जिल्हे मुंबईला जोडले आहेत. शालांत परीक्षा बोर्डाचा विचार केला तर रत्नागिरी आणि सिंधुदूर्ग जिल्हा कोल्हापूर बोर्डाला आणि ठाणे व रायगड जिल्हा मुंबईला जोडला आहे. शाळा न्यायाधिकरणाचा विचार केला तर ठाणे जिल्हयासाठी नवी मुंबईला न्यायाधिकरण आहे. रायगडसाठी पुण्याला आणि रत्नागिरी व सिंधुदूर्ग जिल्हयासाठी कोल्हापूरला न्यायाधिकरण आहे. अशा प्रकारे केवळ कोकण विभागासाठी काम करणा-या शिक्षकांची कुचंबणा होते. कोकणावर झालेला अन्याय दूर झाला पाहिजे. मध्यंतरी लातूर,रायगड आणि ठाण्यासाठी स्वतंत्र शिक्षण उपसंचालक कार्यालय होण्याचा प्रस्ताव शासनाच्या

....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामनाथ मोते ...

विचाराधीन होता. यासंदर्भातील ठरावही मंजूर झालेला होता. लातूरच्या एस.एस.सी.बोर्डाला मान्यता मिळाली पण कोकणाला मात्र मान्यता मिळाली नाही. म्हणून या विशेष उल्लेखाद्वारे मी विनंती करीत आहे की,कोकणासाठी स्वतंत्र शिक्षण उपसंचालक ,स्वतंत्र न्यायाधिकरण आणि स्वतंत्र परीक्षा मंडळ मिळावे आणि याबाबतीत गांभीर्याने विचार करावा अशी मी विनंती करतो.

....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: अवैध पध्दतीने गर्भजल परीक्षा होणे.

मु.शी.: अवैध पध्दतीने राज्यात गर्भजल परीक्षा होणे याबाबत श्री. विनोद तावडे,वि.प.स.यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

उपसभापती : मा.सदस्य श्री. विनोद तावडे यांनी एक विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री. विनोद तावडे (महाराष्ट्र विधानसभा सदस्यांद्वारा निर्वाचित) : सभापती महोदय, मी पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो.

सभापती महोदय, राज्यामध्ये छुप्या पध्दतीने भ्रुण हत्या होत आहे. यासंबंधी गोखले संस्थेने पाहणी अहवाल तयार केला आहे. शासनाने या अहवालाचा अभ्यास केला तर त्यातून निश्चितपणाने काही रिझल्ट मिळू शकतील. विशेषत: मुंबई शहरात हे प्रमाण जास्त आहे. राज्याचा विचार केला तर शहरी भागात भ्रुण हत्येचे प्रमाण जास्त आहे आणि ग्रामीण भागात कमी आहे. म्हणून गोखले संस्थेने तयार केलेला अहवाल शासनाने जरुर अभ्यासावा आणि त्याप्रमाणे कार्यवाही करावी. राज्यातील मुलींचे प्रमाण झपाटयाने घटणे. 1991 च्या हजार मुलामागे 946 प्रमाण धटून ते 917 वर येणे. गोखले संस्थेचे अहवालात शहरी भागात सोनोग्राफीच्या सहभागाचा धक्कादायक निष्कर्ष. त्यात सोनोग्राफी केंद्रे जवळ असलेल्या भागात मुलींचे प्रमाण कमी असणे. सोनोग्राफीकरुन मुलीचा गर्भ असल्यास गर्भपात करण्याची छुपी प्रवृत्ती. त्यात डॉक्टरांचा सहभाग. छुप्या गर्भजल परीक्षेमुळे निर्माण झालेले धोके. आर्थिकदृष्टया संपन्न वर्गात छुप्या भ्रुण हत्येचे वाढते प्रमाण. सामाजिक संतुलन यामधून बिघडण्याची भिती. राज्यातील जनतेत असुरक्षिततेची भावना निर्माण होणे. या अवैध पध्दतीने गर्भजल परीक्षा करणा-या वैद्यकीय व्यावसायिकांवर कारवाई करण्याची शासनाची असमर्थता. सभापती महोदय, या विशेष उल्लेखाद्वारे मी या गंभीर विषयाकडे शासनाचे लक्ष वेधू इच्छित आहे.

उपसभापती : आता सभागृहाची बैठक मध्यंतरासाठी स्थगित होईल आणि दुपारी 4.50 वा. पुन: भरेल.

(4.34 ते 4.50 मध्यंतर)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

- मध्यंतरा नंतर -

(सभापती स्थानी :माननीय उपसभापती)

श्री.अनंत तरे :सभापती महोदय, सभागृहामध्ये कॅबिनेट मंत्री उपस्थित नसल्यामुळे सभागृहाची बैठक तहकूब करण्यात यावी.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, वारंवार सांगूनसुध्दा कॅबिनेट मंत्री सभागृहात उपस्थित नाहीत तेव्हा सभागृहाची बैठक तहकूब करण्यात यावी.

श्री.विनोद तावडे : पूरक मागण्यांवरील चर्चेच्या वेळी माननीय कॅबिनेट मंत्री सभागृहात उपस्थित नाहीत तेव्हा त्यांना समज देण्यात आली पाहिजे.

श्रीमती सुधा जोशी :बैठक तहकूब करण्यात येऊ नये. मंत्री महोदय येण्याची आपण वाट पहावी.

श्री.मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, कॅबिनेट मंत्री सभागृहात उपस्थित नाहीत तेव्हा आता सभागृहाची बैठक तहकूब करण्यात यावी.

उपसभापती : आज सभागृहासमोर पूरक मागण्यांवरील चर्चेसारखा महत्वाचा विषय असतांना सभागृहात माननीय कॅबिनेट मंत्र्यांनी उपस्थित राहणे बंधनकारक आहे.परंतु सभागृहात माननीय कॅबिनेट मंत्री उपस्थित नाहीत. असा प्रकार विधान परिषदेमध्ये घडणे योग्य नाही.सभागृहात कॅबिनेट मंत्री उपस्थित नसल्यामुळे मी सभागृहाची बैठक 5.00 वाजेपर्यन्त तहकूब करीत आहे.

(सभागृहाची बैठक 4 वाजून 52 मिनिटांनी स्थगित झाली)

नंतर श्री.सुंबरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(सभागृह स्थगितीनंतर ...)

सभापतीस्थानी - माननीय उपसभापती

माजी राज्यमंत्री श्री.दादा जाधवराव यांना अटक करताना पोलिसांकडून देण्यात आलेली अपमानास्पद वागणूक याबाबत....

उपसभापती : या सदनामध्ये शुक्रवारी सन्माननीय विरोधी पक्षनेता श्री.फुंडकर, सन्माननीय सदस्य श्री. गडकरी, श्री. सरपोतदार आणि मंडळींनी माजी राज्यमंत्री श्री.दादा जाधवराव यांना पोलिसांनी अटक करताना दिलेल्या अपमानास्पद वागणुकीसंबंधात दिलेल्या नियम 93 च्या सूचनेवर शासनाकडून करण्यात आलेल्या निवेदनावर चर्चा करीत असताना मी भाष्य केले होते की, तेथे त्या दिवशी जो काही प्रसंग घडला आहे त्याबाबत मी स्वत तेथे भेट देईन. त्याप्रमाणे मी शनिवारी दुपारी साडेबारा वाजता श्री. दादा जाधवराव यांच्या निवासस्थानी जाऊन त्यांना भेटलो. त्यावेळी ते स्वत: आणि त्यांचे कुटुंबिय तेथे हजर होते. त्यांच्याकडून झाल्या घटनेसंबंधीची सर्व परिस्थिती जाणून घेतल्यानंतर दुपारी 4.00 वाजता पुणे ग्रामीणचे एस.पी. आणि ॲडिशनल एस.पी. यांची देखील मी भेट घेतली. मी आपणा सर्वांना या संदर्भात सांगू इच्छितो की, त्या दिवशी एकंदरीत जो काही प्रकार घडला होता त्यावेळी रात्र होती आणि रात्री साडे दहाच्या सुमारास तेथे जमाव जमला होता आणि त्याच वेळी त्या भागातील वीज गेली होती. पोलीस ठाण्यावर जमावाकडून दगडफेक देखील झाली होती. तेथील आंदोलकांना शांत करण्यासाठी त्यावेळी श्री.दादा जाधवराव तेथे येऊन त्यांनी तेथील आंदोलकांना शांत राहून घरी जाण्याची विनंती केली आणि ते स्वत:ही घरी गेले. त्या नंतरही जमाव तेथे होता म्हणून अर्ध्या तासानंतर ते पुन्हा पोलीस ठाण्यावर गेले. त्यावेळी तेथे जमाव वाढला होता. तेथील परिस्थिती अधिक चिघळू नये म्हणून .. कारण जमावाकडून पोलीस ठाणे जाळण्यापर्यंतही मजल जाण्याची शक्यता होती म्हणून पोलिसांनी श्री. दादा जाधवराव यांना विनंती करून त्यांना आपण म्हणता त्याप्रमाणे कलम 151 (3) हे जे प्रतिबंधात्मक कलम होते ते लावून त्यांना अटक केली. मी स्वत: याबाबत श्री.दादा जाधवराव यांच्याशी बोललो आणि पोलिसांशी देखील बोललो आहे. त्यावेळी श्री.दादा जाधवराव यांनी माझ्याकडे हे स्पष्ट केले की, जे काही झाले ते संपले. पुन्हा असे घडू नये. जे काही त्यावेळी घडले ते दुर्दैवी घडले. पण मला देखील त्याबाबत पुढे काही करावयाचे नाही. पोलिसांनी देखील सांगितले की, आम्ही त्यावेळी ते

..... जीजी 2 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

उपसभापती ......

पाऊल उचलले नसते, प्रतिबंधात्मक उपाय योजले नसते तर जमावाची पोलीस स्टेशन जाळण्या पर्यंत मजल गेली असती. त्यामुळे जे काही घडले ती केवळ आम्ही प्रतिबंधात्मक कारवाई म्हणून केली आहे. याबाबत श्री.दादा जाधवराव यांचेशी आणि पोलिसांशी बोलल्यानंतर माझीसुद्धा खात्री झालेली आहेकी, त्या ठिकाणी त्यावेळी झालेली कारवाई ही योग्य होती. स्वत: श्री.दादा जाधवराव यांची देखील त्याबाबत काही तक्रार राहिलेली नाही. कारण त्यांचेवर कोठल्याही प्रकारचा गुन्हा पोलिसांनी दाखल केलेला नाही. इतकेच मला आपल्याला सांगावयाचे होते.

****

सेंट झेवियर्स कॉलेजच्या मल्हार महोत्सवामध्ये राष्ट्रीय मानचिन्हाचा करण्यात आलेला अवमान याबाबत उपस्थित करण्यात आलेला औचित्याचा मुद्दा.

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, पुरवणी मागण्यांवरील चर्चेसारखा महत्त्वाचा विषय सुरू होण्यापूर्वी मला या ठिकाणी आपल्या परवानगीने एक औचित्याचा मुद्दा उपस्थित करावयाचा आहे. मुंबईमध्ये सेंट झेवियर कॉलेज तर्फे 'मल्हार महोत्सव' म्हणून एक महोत्सव तेथील विद्यार्थ्यांकडून आयोजित केला जातो. त्याचे जे निमंत्रण काढले जाते त्यावर राष्ट्रीय मानचिन्हाचा अवमान करण्यात आलेला आहे. आपल्या राष्ट्रीय मानचिन्हामध्ये तीन सिहांचा समावेश आहे. त्याचा उपयोग करून, तीन सिहांच्या ठिकाणी माकडांचे चित्र त्या निमंत्रण पत्रिकेमध्ये काढण्यात आलेले आहे. सेंट झेवियर्सच्या प्राचार्यांचे याबाबत मत असे आहे की, ही विद्यार्थ्यांची क्रिएटिव्हिटी आहे. सभापती महोदय, या कॉलेजकडून नेहमी आयोजित केला जाणारा हा 'मल्हार महोत्सव' एक चांगला महोत्सव असतो यात शंका नाही. परंतु त्यामध्ये जर अशा प्रकारे राष्ट्रीय मानचिन्हाचा विपर्यास केला जाणार असेल आणि ती एक क्रिएटिव्हिटी आहे म्हणून दुर्लक्षित केले जाणार असेल तर ते योग्य नाही. त्या प्राचार्यांना याबाबत सांगण्यात आले की, त्यांनी याबाबत दिलगिरी व्यक्त करून हा विषय संपवावा. पण यामध्ये कसली दिलगिरी व्यक्त करावयाची असे म्हणून त्यांनी ही बाब उडवून लावली. सभापती महोदय, अल्प संख्यांकांच्या संस्थांना, कॉलेजांना जे अल्प संख्यांक म्हणून स्वातंत्र्य मिळाले आहे ते सगळ्याच बाबतीत आहे अशी त्यांची एक समजूत झालेली आहे.

..... जीजी 3 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. तावडे ....

म्हणूनच आपण या गोष्टीची गंभीरतेने दखल घेतली पाहिजे असे मला वाटते. अशा प्रकारे राष्ट्रीय मानचिन्हाचा अवमान होणार असेल आणि त्याकडे दुर्लक्ष होणार असेल तर उद्या ते राष्ट्रीय ध्वजाबद्दल देखील तोच व्यवहार करतील. तेव्हा विद्यार्थी आहेत त्यांचेकडून चुका होऊ शकतात, त्यामुळे फार मोठी कडक कारवाई वा शिक्षा त्यांना याबाबत केली पाहिजे असे मला वाटत नाही. ..

(यानंतर श्री. जागडे .....एचएच 1 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ASJ/ KGS/ MAP/ 16:45

श्री. विनोद तावडे....

या बाबत आपण विद्यार्थी आणि प्राचार्यांना जाणीव करुन दिली पाहिजे. राष्ट्रीय चिन्हाचा तसेच बोधचिन्हाचा अशा प्रकारे कोणी वापर करीत असेल आणि अशा प्रकारची घटना घडत असेल तर त्या बाबत आपण संबंधितांना कडक शिक्षा दिली पाहिजे.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, या ठिकाणी तीन सिंहाच्या चिन्हाच्या ठिकाणी तीन माकडे दाखविण्यात आली आहेत. राष्ट्रीय ध्वज, राष्ट्रीय मानचिन्ह यांचा अपमान करण्याचा कोणी प्रयत्न केला तर त्यासाठी शिक्षेची तरतूद आहे. राष्ट्रध्वज, राष्ट्रगान, आणि राष्ट्रीय मानचिन्हाबद्दल अशा प्रकारची अवहेलना करणे ही गंभीर बाब आहे. राष्ट्रध्वजाचा अपमान करणे ही गंभीर बाब आहे. तेवढीच ही बाबही गंभीर आहे. माननीय सदस्य श्री. विनोद तावडे या बाबत अतिशय माईल्ड भाषेत बोलले आहेत. या ठिकाणी अशा प्रकारे जे काही करण्याचा पध्दतशीरपणे प्रयत्न करण्यात आला आहे, त्यांच्याविरुध्द कठोर कारवाई केली पाहिजे. यामध्ये विद्यार्थ्यांच्या हातून जरी हा प्रकार झाला असला तरी त्यांच्याविरध्द कठोर कारवाई केली पाहिजे. तेव्हा या बाबत सरकारने ताबडतोबीने कारवाई करण्याची आवश्यकता आहे. राष्ट्रध्वजाचा तसेच मानचिन्हाचा कोणीही अपमान करता कामा नये. जो कोणी राष्ट्रध्वजाचा आणि मानचिन्हाचा अपमान करीत असेल तर त्यांच्याविरुध्द कारवाई केली पाहिजे. सिंहाच्या मानचिन्हाच्या ठिकाणी माकडे दाखविण्यात आली आहेत. तेव्हा या बाबत सखोल चौकशी करण्याची आवश्यकता आहे.

श्री. जितेंद्र आव्हाड : सभापती महोदय, माननीय सदस्य श्री. विनोद तावडे यांनी एका गंभीर विषयाला वाचा फोडली आहे. आपल्या आसनावरील भागात सत्यमेव जयते असे लिहिले आहे आणि आपल्या आसनावर तीन सिंहाचे चिन्ह आहे. आता माननीय श्री. विनोद तावडे यांनी सांगितल्याप्रमाणे या तीन सिंहाच्या ठिकाणी तीन माकडे दाखविण्यात आली आहेत. त्या प्रकारची निमंत्रण पत्रिका विद्यार्थ्यांच्या हातात देण्यात आली आहे. वर्तमानपत्रात असे वाचावयास मिळाले की, It is a creativity. But, it cannot go above law.

सभापती महोदय, या देशातील कायदा, राष्ट्रध्वज याचा सन्मान राखला पाहिजे. आता या ठिकाणी राष्ट्रीय चिन्हाचा अपमान कळत न कळत ज्यांच्या हातून घडला असेल, त्याचा सजा देण्याची आवश्यकता आहे. क्रिएटीव्हच्या नावाखाली असे प्रकार होणार असतील तर ते योग्य नाही. त्यांच्याविरुध्द योग्य ती कारवाई करण्याची आवश्यकता आहे. Art should not be above

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जितेंद्र आव्हाड.....

Law. म्हणून या बाबत योग्य ती दखल घेऊन कडक कारवाई करण्याची आवश्यकता आहे.

श्री. मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, आताच हे माझ्या पाहण्यात आले आहे. सत्यमेव जयते या राष्ट्राच्या सन्मानचिन्हाची प्रतिकृती या ठिकाणी काढण्यात आली आहे. तीन सिंहांच्या ठिकाणी तीन माकडे दाखविण्यात आली आहे. त्याला मल्हार असे नाव दिले आहे. देशाच्या सन्मानचिन्हाबद्दल कोणीही टिंगलटवाळी करावी, गैरप्रकार करावा, विनोद निर्माण करावा, हे योग्य नाही. देशाच्या अस्मितेला ही बाब घातक आहे. हा प्रकार विद्यार्थ्यांनी केलेला असो किंवा प्रिन्सपॉलनी केलेला असो, याबाबत संबंधितविरध्द कडक कारवाई केली जावी. कोणत्याही क्षेत्रात असे प्रकार पुन्हा होता कामा नयेत, यासाठी कठोर कारवाई केली पाहिजे. कठोर सजा अपराध्यांना झाल्याशिवाय हे थांबणार नाही. माननीय सदस्य श्री. विनोद तावडे यांनी हा प्रश्न उपस्थित केला आहे, त्याबद्दल मी त्यांना धन्यवाद देत आहे.

उपसभापती : माननीय सदस्य श्री. विनोद तावडे यांनी एक औचित्याचा मुद्दा उपस्थित करुन त्याबाबतची सर्व कागदपत्रे सभागृहासमोर ठेवली आहेत. मी स्वत: ही कागदपत्रे पाहिली आहेत. तेव्हा या बाबत शासनाने निश्चितपणे योग्य ती कारवाई करावी, अशा प्रकारची सूचना मी शासनास करीत आहे.

श्री. छगन भुजबळ : होय.

--

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी.: सन 2005-2006 च्या खर्चाच्या पूरक विवरणपत्रावर चर्चा.

उपसभापती : पूरक मागण्यावरील चर्चा आज उद्या दि. 20 जुलै 2005 रोजी घ्यावयाचे ठरले आहे. आज कार्यक्रम पत्रिकेवर दाखविलेल्या मंत्र्यांच्या मागण्यांवर चर्चा व्हावयाची आहे. पूरक मागण्या आणि त्याखालील बाबी यासंबंधीची माहिती सदस्यांना पत्रक भाग दोन द्वारे वेगळी प्रसृत करण्यात आली आहे. प्रत्येक सदस्यांने भाषण करताना बाब क्रमांक आणि पूरक विवरणपत्राचा पृष्ठ क्रमांक सांगण्याची कृपा करावी. चर्चा संबंधीत बाबीपुरतीच मर्यादीत असून मुळ मागणीवर चर्चा करता येणार नाही, हे सदस्यांना सांगावयास नको. कार्यक्रम पत्रिकेवर दर्शविलेल्या पूरक मागण्यावरील चर्चा व उत्तर आजच पूर्ण करावयाचे आहे, हे सदस्यांनी कृपया ध्यान्यात घ्यावे.

(यानंतर श्री. सरफरे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

विविध मंत्र्यांच्या विभागाच्या पूरक मागण्या

मा.उपसभापती : खालील मंत्र्यांच्या विभागांच्या पूरक मागण्या एकत्रितपणे चर्चेस घेण्यात येतील--

(1) सार्वजनिक बांधकाम मंत्र्यांच्या विभागाच्या पूरक मागण्या क्रमांक एच-3, एच-4, एच-5, एच-6, एच-7, एच-8, एच-9.

(2) जलसंपदा (कृष्णा खोरे पाटबंधारे महामंडळ वगळून), लाभक्षेत्र विकास व पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्र्यांच्या विभागाच्या पूरक मागण्या क्रमांक आय-1, आय-2 ए, आय-3, आय-5, आय-6, वाय-2.

(3) सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्र्यांच्या विभागाच्या पूरक मागण्या क्रमांक आर-1, आर-3.

(4) सहकार, पुनर्वसन व मदत कार्य मंत्र्यांच्या विभागाच्या पूरक मागण्या क्रमांक व्ही-2, व्ही-3, व्ही-4, व्ही-5.

(5) वस्त्रोद्योग, माजी सैनिकांचे कल्याण व रोजगार व स्वयंरोजगार मंत्र्यांच्या विभागाच्या पूरक मागण्या क्रमांक व्ही-2, व्ही-3, व्ही-5.

(6) वित्त व नियोजन मंत्र्यांच्या विभागाच्या पूरक मागण्या क्रमांक जी-1, जी-3, जी-6, जी-7, ओ-1, ओ-4, ओ-7, ओ-8.

(7) ऊर्जा (अपारंपारिक ऊर्जा वगळून) वैद्यकीय शिक्षण, उच्च व तंत्रशिक्षण मंत्र्यांच्या विभागाच्या पूरक मागण्या क्रमांक के-6, के-11, एस-1, डब्लू-2, डब्लू-3, डब्लू-4, डब्लू-7.

(8) पणन, रोजगार हमी योजना, संसदीय कार्य व महिला व बालविकास मंत्र्यांच्या विभागाच्या पूरक मागण्या क्रमांक ओ-3, व्ही-1, व्ही-3, व्ही-5, एक्स-1

(9) अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्र्यांच्या विभागाच्या पूरक मागण्या क्रमांक एम-2.

(10) वन मंत्र्यांच्या विभागाच्या पूरक मागण्या क्रमांक सी-7, सी-10

(11) अपारंपारिक ऊर्जा व फलोत्पादन मंत्र्यांच्या विभागाच्या पूरक मागण्या क्रमांक डी-3, के-6.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, आज विविध विभागाच्या मागण्यांवर चर्चा होणार आहे. सभागृहापुढील कामकाज व उपलब्ध असलेला वेळ लक्षात घेता हे कामकाज आज पूर्ण होईल अशी शक्यता वाटत नाही. तेव्हा आपण उद्या सकाळी सभागृहाची विशेष बैठक घेऊन मागण्यांवरील चर्चा घ्यावी अशी माझी विनंती आहे.

उपसभापती : सद्या तरी तशी आवश्यकता वाटत नाही. आपण हे कामकाज पूर्ण करु. आणि जर आवश्यकता वाटली तर उद्या सकाळी विशेष बैठक घेण्याबाबतचा निर्णय नंतर घेऊ.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर (विरोधी पक्षनेता) : सभापती महोदय, सन 2005-06 च्या पुरवणी मागण्यांवरील चर्चेमध्ये सहभागी होण्यासाठी मी या ठिकाणी उभा आहे. सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभागाच्या पान क्रमांक 310 वरील बाब क्र. 291, पूरक मागणी क्रमांक व्ही-5/6425, सहकारासाठी कर्जे

(सभापतीस्थानी तालिका सभापती माननीय श्रीमती सुधा जोशी)

यामध्ये कापूस प्रापण योजनेच्या कार्यन्वयनासाठी 989 कोटी 80 लाख रुपयांची मागणी करण्यात आली आहे. गेल्या 30 वर्षापासून या राज्यातील कापूस उत्पादक शेतकऱ्यांचा कापूस एकाधिकार खरेदी योजनेच्या माध्यमातून खरेदी केला जातो. केंद्राचा हमीभाव अधिक राज्य सरकारचा बोनस या माध्यमातून शेतकऱ्याला कापसाची रक्कम अदा केली जाते. कापूस उत्पादनाच्या बाबतीत महाराष्ट्र हे देशातील क्रमांक 3 चे राज्य आहे. देशाच्या एक पंचमांश कापूस या राज्यामध्ये पिकतो. या कापसाची खरेदी ही कापूस पणन महासंघाच्या माध्यमातून केली जाते. या ठिकाणी शासनाने 990 कोटी रुपयांची मागणी केली आहे. गेल्या चार-पाच वर्षापासून या राज्यामध्ये कापूस एकाधिकार योजना रखडत चालली आहे. आणि गेल्या दोन वर्षामध्ये कापूस उत्पादक शेतकरी हा अधिक रखडला गेला आहे. या राज्यामध्ये जवळपास 650 शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या आहेत. त्या शेतकऱ्यांना सहा-सहा महिने, वर्ष-वर्ष पैसे मिळाले नाहीत. विरोधी पक्षाच्या माननीय सदस्यांनी मागील वर्षीच्या डिसेंबरच्या अधिवेशनामध्ये, मार्चच्या अधिवेशनामध्ये आणि या अधिवेशनामध्ये या प्रश्नावर हे सभागृह बंद पाडण्याचा प्रयत्न केला त्यावेळी शासनाला जाग आली. आणि शासनाने निवडणुकीच्या जाहिरनाम्यामध्ये 2700 रुपये भाव जाहीर केला होता. आणि प्रत्यक्षात 2500 रुपयाचे हमीवचन दिले. परंतु नंतर 2300 रुपये हा भाव देऊन दोन हप्त्यामध्ये पैसे देण्याचे ठरले. तसेच, पहिला हप्ता सुरुवातीला देऊ असे सांगितले आणि दुसरा हप्ता दिवाळीपर्यंत देऊ असे सांगितले. परंतु जून महिन्यापर्यंत तरी त्यांना हप्ता मिळालेला नाही. जुलै महिन्याच्या 11 तारखेला हे अधिवेशन सुरु झाले त्यावेळी विरोधी पक्षनेत्यांनी पहिल्या दिवशी हा विषय उपस्थित करुन हे सभागृहाचे कामकाज बंद पाडले व कापसाच्या चुकाऱ्याच्या रकमेची मागणी केली. त्यामुळे

श्री. पांडुरंग फुंडकर...

माननीय पणन मंत्र्यांना सभागृहामध्ये घोषणा करावी लागली. ही पार्श्वभूमी सांगण्याचे कारण असे की, ही योजना अशापध्दतीने पैश्याअभावी रखडत चालली आहे. आज शासनाच्या माध्यमातून 1 हजार कोटी रुपयांची मागणी या ठिकाणी करण्यात आली आहे. म्हणजे अजून शेतकऱ्यांचे 1 हजार कोटी रुपये देणे शासनाकडे आहेत. आणि म्हणून ही मागणी करीत असतांना या कापूस पणन महासंघाचा कारभार कसा चालला आहे याकडे थोडे लक्ष देण्याची गरज आहे.

सभापती महोदया, कापूस पणन महासंघ हा एक असा संघ आहे की, ज्याच्या हातामध्ये राज्यातील एक कोटी कापूस उत्पादक शेतकऱ्यांचे भवितव्य आहे. या पणन महासंघाचे एक संचालक मंडळ आहे. त्यांचे अधिकार काय आहेत? धोरण ठरवून कापसाची खरेदी कशी केली पाहिजे? पैसे कधी दिले पाहिजेत? एवढे फक्त संचालक मंडळ ठरविते. अशाप्रकारे जवळपास 4 हजार कोटी रुपयांचा व्यवहार पणन महासंघाच्या हातामध्ये आहे. हा कापूस कोण विकते, सरकी कोण विकत घेते याच्याशी संचालक मंडळाचा काही संबंध नाही. बारदान कोण खरेदी करते?

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर . . . .

ताडपत्री कोण खरेदी करते ? याचा पणन महासंघाच्या संचालक मंडळाचा संबंध येत नाही. रुईच्या गाठींची विक्री करण्यासाठी एक सेल्स् कमिटी निर्माण केली. या सेल्स् कमिटीमध्ये कोण-कोण आहेत ? तर त्यामध्ये पणन महासंघाचा एकही संचालक नाही. त्याचे एम.डी.अध्यक्ष आहेत, कृषी खात्याचे सेक्रेटरी, पणन विभागाचे सेक्रेटरी, स्टॅटीस्टीक्स विभागाचे सेक्रेटरी आणि पणन महासंघाचे जॉईंट एम.डी. यांची कमिटी केली. या कमिटीचे काम काय ? एकीकडे कापसाचे पैसे देण्यास वेळ होतो. खरेदी केलेल्या कापसावर प्रक्रिया करुन, रुईच्या गाठी बांधल्या जातात. पण त्याची पध्दत सदोष आहे आणि शासनाने या अधिका-यांच्या हातात चार हजार कोटीचा व्यवहार दिला आहे. हे अधिकारी काय करतात ? यावर्षी 1 कोटी 80 लाख क्विं.कापसाची खरेदी झाली म्हणजे जवळजवळ चार हजार कोटीचा कापूस खरेदी केला. परंतु शेतक-यांची पैशासाठी वणवण झाली. शेतक-यांनी आत्महत्या केल्या. जेव्हा रुईच्या गाठी बांधल्या गेल्या, तेव्हा त्याकडे कोणीही पाहिले नाही. त्याचे जिनिंग कसे झाले आहे ? प्रेसिंग कसे झाले आहे ? मोठी गंमत आहे. जेव्हा या विषयाच्या संबंधात स्वतंत्रपणे चर्चा होईल, तेव्हा मी फेडरेशनच्या संबंधातील गंमती-जमती सांगेन. पण परळी-वैजनाथला सेंटर आहे, झोन आहे आणि त्याच्या अजूबाजूला जिनिंग-प्रेसिंग आहेत. पण जे काँग्रेसचे चमचे आहेत, अशा लोकांच्या जिनिंग-प्रेसिंगला माल दिला. ज्या जिनिंग-प्रेसिंगची कपॅसिटी 40 हजार क्विं.आहे, त्यांना दीड ते दोन लाख कापूस दिला गेला. प्रत्यक्षात त्या जिनिंग-प्रेसिंगची कपॅसिटी तेवढी नव्हती, त्यामुळे तेथे तेवढया कापसाचे जिनिंग झाले नाही.

(माननीय मंत्री श्री.दिलीप वळसे-पाटील खाली बसून बोलतात.)

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, "चमचा" हा शब्द अनपार्लमेंटरी नाही. त्याठिकाणी दीड ते दोन लाख क्विं.कापूस . . . .

डॉ.पतंगराव कदम : सभापती महोदय, मघाशी सन्माननीय विरोधी पक्षनेत्यांनी भाषण करताना असे सांगितले की, काँग्रेसच्या चमच्यांना जिनिंग-प्रेसिंगसाठी कापूस दिला जातो. तर आम्ही काँग्रेसच्या बाबतीत विचार करीत नाही तर संपूर्ण महाराष्ट्राच्या हिताच्यादृष्टीने विचार करतो.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, हे मी सिध्द करण्यास तयार आहे. तुम्ही जिनिंग-प्रेसिंगसाठी कोणाला माल दिला ? ज्या जिनिंगची एक लाखापर्यंत कपॅसिटी आहे, त्यांना तुम्ही माल दिला नाही.

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.पंतगराव कदम : सभापती महोदय, माननीय विरोधी पक्षनेत्यांनी यासंबंधातील माहिती माझ्याकडे द्यावी. मी ती माननीय मंत्री महोदयांकडे देऊन, त्यांना याबाबतीत तपासणी करण्यास सांगेन.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, ठीक आहे. जे काँग्रेसचे हितसंबंधी आहेत, अशा लोकांना जिनिंगसाठी कापूस दिला. ज्यांची कपॅसिटी नाही, जे 40-50 हजार क्विं.कापसाचे जिनिंग करु शकतात, त्यांना दोन-दोन लाख क्विं. कापूस जिनिंगसाठी दिला. त्याचा परिणाम असा झाला की, सर्व कापसाचे जिनिंग झाले नाही. मराठवाडयात कापसाच्या गंजा पडून राहील्या, त्यांना आगी लागल्या. पतंगराव, या आगी कोणी लावल्या ? महाराष्ट्रात 100 कोटीचा कापूस जळला. आपण चौकशी करणार नाही का ? कापूस उत्पादक शेतकरी आपल्या शेतात राबराब राबतो, कष्ट करतो. एकेक गोण जमा करतो आणि आग लागल्यावर एका क्षणात सगळा कापूस भस्मसात होतो. परळी-वैजनाथ येथील जिनिंग-प्रेसिंगमध्ये सगळया कापसाचे जिनिंग झाले नाही. पावसाळा जवळ येत असताना तेथून 10-12 कि.मी.च्या अंतरावरील जिनिंगच्या ठिकाणी तो कापूस दिला नाही. तर पणन महासंघाच्या अधिका-यांचे कसे डोके चालते ते पहा, परळी-वैजनाथ या झोनमधील कापूस बुलढाणा जिल्हयातील देऊळगाव येथे जिनिंगसाठी देण्याचे कॉन्ट्रॅक्ट झाले. यातून ट्रान्सपोर्टमध्ये मलिदा मिळतो. त्यामुळे बुलढाणा जिल्हयातील देऊळगाव येथे जिनिंगसाठी कापूस देण्याचे आदेश झ ाले. अगोदरच पैसे नाहीत आणि त्यामध्ये अशा प्रकारे लूट सुरु आहे. मघाशी मी सेल्स् कमिटी बद्दल बोलत होतो. या कमिटीने मुख्यत: काय काम केले पाहिजे ? तर त्यांनी रोज एकत्र बसले पाहिजे. जगातील कापसाच्या बाजारभावाची माहिती घेतली पाहिजे. त्याची प्राईज लिस्ट तयार करुन ताबडतोब ती जाहीर केली पाहिजे आणि कापसाचे भाव रोज ठरले पाहिजेत. पण तसे झाले नाही.

यानंतर श्री.किल्लेदार . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर (पुढ चालू...

अधिकाऱ्यांशी संगनमत करुन कॉटन परचेस कंपनीने कापूस खरेदी केला. प्राईज लिस्ट क्रमांक 18 प्रसिध्द करुन, एका विशिष्ट कंपनीसाठी कापूस खरेदीचा भाव कमी केला. या कंपनीचे नाव "सिध्दी विनायक कॉटन कार्पोरेशन आहे." या कंपनीने कमी भावाने दीड लाख गाठी घेतल्या. पध्दत अशी आहे की, कापसाच्या गाठी घेतल्यानंतर त्या दीड लाख गाठी त्यांनी उचलल्या पाहिजेत, त्यासाठी त्यांनी किती दिवसात पैसे भरले पाहिजेत,याबाबत नियम आहे. परंतु त्या गाठी त्या कंपनीने दोन-दोन महिने उचलल्या नाहीत. तोपर्यन्त कोणालाही कापूस आपण दिलेला नाही. यामध्ये त्या कंपनीला 10 कोटी रुपयांचा फायदा फेडरेशनने करुन दिला. पणन महासंघाच्या अधिकाऱ्यांशी त्या कंपनीने संगनमत केले. कापूस उत्पादक शेतकऱ्यांच्या कापसाची धुळधाण केली. अशापध्दतीने फेडरेशनने व्यवहार केल्यानंतर फेडरेशन नफ्यामध्ये येण्या ऐवजी घाट्यातच जाणार. मागच्या वर्षीही असाच प्रकार घडला. बरीच वर्षे असे प्रकार चाललेले आहेत. अशाप्रकारे सिध्दीविनायक कॉटन कार्पोरेशन ऑफ इंडिया लिमिटेड, मुंबई, राधालक्ष्मी कॉटन कंपनी, तिरुपती कॉटन कंपनी, बालाची कॉटन कंपनी यांनी मागच्या वर्षी कमीत कमी 10 ते 15 कोटी रुपयांचा फेडरेशनला चुना लावलेला आहे. हे सगळे फेडरेशनमधील अधिकाऱ्यांच्या संगनमताने चाललेले आहे. एका बाजूला सरकार सांगते की, शेतकऱ्यांच्या कापसाचे पैसे देण्यासाठी कर्ज काढावे लागते. कापूस उत्पादक शेतकऱ्याचे कापसाचे पैसे देण्यासाठी कर्ज काढले तर आमचे काही म्हणणे नाही. परंतु राज्य सहकारी बँकेच्या कर्जाचे व्याजदर जास्त आहे म्हणून राष्ट्रीकृत बॅंकेचे व्याज कमी आहे म्हणून त्यांचे कर्ज घेत आहोत, असे सांगितले गेले. आज राष्ट्रीयकृत बॅंका कोणाच्या ताब्यात आहेत? केंद्रातील सरकार आपल्या पक्षाचे आहे. केंद्रातील अर्थमंत्री आपल्याच पक्षाचे आहेत. या कर्जाला महाराष्ट्र सरकारने गॅरंटी दिलेली आहे. बॅंक ऑफ इंडियाचे 300 कोटी रुपये कर्ज मिळविण्यासाठी अरेंजर नेमले. निविदा प्रसिध्दीला दिली. माझा आक्षेप एकाच गोष्टीला आहे की, ज्या पाच निविदा आलेल्या होत्या त्यापैकी चार्टर्ड फायनान्स मॅनेजमेंट यांच्या माध्यमातून बॅंक ऑफ इंडियाकडून 300 कोटी रुपयाचे कर्ज घेण्याचे ठरविले. पणन महासंघाला कर्ज पाहिजे होते, त्या संदर्भात पणन महासंघाच्या संचालक मंडळामध्ये ठराव व्हायला पाहिजे होता. परंतु पणन महासंघाच्या संचालक मंडळामध्ये ठराव झाला नाही. पणन महासंघाच्या सचिवांनी यासंबंधात आदेश दिला की, अशाप्रकारच्या निविदा काढा. पणन महासंघाच्या व्यवस्थापकीय संचालकांनी निविदा फोडली आणि सरकारकडे प्रस्ताव पाठविला. त्याचा निर्णय पणन महासंघाच्या

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ MHM/ SBT/

श्री.पांडुरंग फुंडकर (पुढे सुरु...

संचालक मंडळामध्ये झालेला नाही. तो मंत्रालयामध्ये झाला. पणन विभागाच्या सचिवांनी आदेश दिला की 300 कोटी रुपयांचे कर्ज घेण्यासाठी, अमुक अमुक कंपनीला अरेंजर फी म्हणून 62 लाख रुपये द्यावे.. एका बाजूला पणन महासंघाला पैसे परत करता आले नाहीत तर त्यासाठी गव्हर्नमेंटने गॅरंटी दिली, आपल्या सरकारने गॅरंटी दिली. परंतु यामध्ये ब्रोकरेजला पैसे दिले गेले. कर्ज देणारी कंपनी सरकारची आहे, केंद्रीय अर्थमंत्र्यांनी आदेश दिले असते तर बँक ऑफ इंडियाने लगेच कर्ज दिले असते. परंतु पणन विभागाचे सचिवांनी आदेश देऊन चार्टर्ड कंपनीला ब्रोकरेज अरेंजर्स म्हणून नेमले. यामध्ये पणन महासंघाच्या संचालक मंडळाचा काही संबंध नाही. चार्टर्ड कंपनीचा मालक कोण आहे, याची आपण चौकशी करणार आहात काय ? त्याचा पणन विभागाच्या सचिवांचा संबंध आहे काय ?

यानंतर कु.थोरात...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर...

इतर बँकाकडून कर्ज काढले गेले, त्याच्याहीपोटी ब्रोकरेज दिले गेले, या सर्व व्यवहाराची चौकशी झाली पाहिजे, अशा प्रकारची मागणी मी याठिकाणी करतो. पणन महासंघाच्या सचालकांचा यामध्ये दुरान्वयानेही संबंध नाही. हा कारभार पणन खात्याचे सचिव, एम.डी.या दोन-तीन लोकांच्याभोवती फिरतो आहे. गाठीचा कारभार फिरतो आहे. ब्रोकरेजचा कारभार फिरतो आहे. 62 लाख रुपये ब्रोकरेज बँक ऑफ इंडियाच्या कर्जापोटी दिलेले आहे, ते कशासाठी दिले? याचेही उत्तर महाराष्ट्रातील शेतक-याला दिले पाहिजे. गेल्या महिन्या, दोन महिन्यात फेडरेशनने ज्या गाठी विकल्या असतील, त्या गाठीच्या व्यवहाराची संपूर्णपणे सी.आय.डी.च्या माध्यमातून चौकशी झाली पाहिजे. हे ब्रोकरेज कां दिले गेले? इतर बँकाच्या माध्यमातून जे कर्ज काढले, त्याचेही ब्रोकरेज एका विशिष्ट कंपनीला दिले गेले. त्या कंपनीचे लागेबांधे कुणाशी आहेत? याचीही चौकशी झाली पाहिजे. पणन सचिव आणि ही कंपनी यांचे नाते आहेत. नात्याच्या प्रेमापोटी हा व्यवहार झाला. पणन महासंघातील हा पैसा ॲरेंज करुन काढला गेला. एक प्रकारे पणन महासंघावर दरोडा टाकण्याचे काम या चौकडीने केलेले आहे. म्हणून या सर्व प्रकरणाची चौकशी झाली पाहिजे, अशा प्रकारची मी याठिकाणी मागणी करतो. या ठिकाणी हजार कोटी रुपयाची पुरवणी मागणी करण्यात आलेली आहे. मागच्या अधिवेशनातच शासनाने हे पैसे मागितले असते तर आम्ही नकार दिला नसता. कापूस उत्पादक शेतक-यासाठी जो पैसा लागतो, त्याला आम्ही कधीही विरोध करीत नाही. पण जाणीवपूर्वक शेतक-याला जेरीस आणण्याचे काम या सरकारच्या माध्यमातून चालू आहे. एका बाजूला कोटयावधी रुपयाचा मलिदा या पणन महासंघाच्या माध्यमातून लूटण्याचा प्रकार चालू आहे. आणि दुस-या बाजूला शेतक-याला जेरीस आणण्याचे काम चालू आहे. हे ख-या अर्थाने लोकशाही आघाडी सरकार शेतक-याला तुमची देणगी म्हणू की काय म्हणू मला शब्द आठवत नाहीत, पण अशा पध्दतीने या शासनाचा कारभार चाललेला आहे. या मागणीला मी विरोध करणार नाही. पण या मागणीच्या अनुषंगाने पणन महासंघाच्या माध्यमातून गेल्या दोन महिन्यात गाठीचा जो व्यवहार झाला आणि कोटयावधी रुपयाचा चूना पणन महासंघाला चौकडीने लावला, त्याची चौकशी झाली पाहिजे. यासंबंधात जर काही माहिती लगणार असेल तर पणन मंत्र्यांना आम्ही ती माहिती देण्यास तयार आहोत.पण त्यासंबंधीची चौकशी झाली पाहिजे. तसेच व्यापा-यांना जो डिस्काऊंट दिलेला आहे, तो डिस्काऊंट ताबडतोब स्थगित केला पाहिजे. अशा प्रकारची मागणी मी याठिकाणी करतो आणि माझे दोन शब्ध्द पूर्ण करतो.

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत प्र. पाटील (महाराष्ट्र विधानसभा सदस्यांद्वारा निर्वाचित) : सभापती महोदय, बाब क्रमांक 77 पान क्रमांक 69. सार्वजनिक बांधकाम विभागाच्या रस्त्यावर जे होर्डिंग्ज लावले जातात त्या होर्डिंग्जचे नियम आता बदलले पाहिजेत. खाजगी व्यापा-यांना, खाजगी उद्योगांना होर्डिंग्ज लावण्यासाठी निविदा मागवतो व त्यांच्याकडून पैसे घेतो. पण वाढदिवसाच्या होर्डिंग्जवर,शुभेच्छांच्या होर्डिंग्जवर टॅक्स लावला पाहिजे. सभापती महोदय, मी या ठिकाणी गंभीरपणे बोलात आहे. या राज्यामध्ये अनेक शहरांमध्ये सार्वजनिक मालमत्तेवर, विरोधी पक्षाचे माझ्या पक्षासकट खाजगी होर्डिंग्ज लावण्याची नियमावली बनविली पाहिजे.त्याच्यार काही तरी जबदरस्त टॅक्स लावला पाहिजे, अशी मागणी या निमित्ताने मी करतो. रायगड जिल्हयातील पनवेल ते महाड या महामार्गावर मोठया प्रमाणात ट्राफिक वाढलेली आहे. या रस्त्यावर दिवसाला किमान 10 ते 12 अपघात होतात. या राज्याचे सार्वजनिक बांधकाम राज्यमंत्र्यांनी या ठिकाणची पाहणी केली आणि त्याठिकाणी अपघात होतात हे कबूल केले. या पट्टयामध्ये जे उद्योग वाढले आहेत, विशेषत: राज्य शासन रेतीच्या रुपाने त्या ठिकाणी 30 कोटी रुपयाचा महधूल घेते. मग त्या ठिकाणी ट्राफिक जाम होते म्हणून पोलीसांचा दटया, सार्वजनिक बांधकाम खात्याचा दटया असल्यामुळे त्या ठिकाणच्या उद्योगावर परिणाम होत आहे.

यानंतर श्री.बरवड.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत प्र. पाटील ....

म्हणून हा रस्ता चौपदरी करण्याच्या दृष्टीने शासनाने तातडीने लक्ष घातले पाहिजे. सभापती महोदया, कोकण डिव्हीजनमध्ये करंट रिपेअरचा जो निधी येतो त्याबाबत मला सांगावयाचे आहे. कोकणामध्ये मोठया प्रमाणावर पाऊस पडतो. ठाणे आणि रायगड जिल्हयामध्ये औद्योगिकीकरण झ ाालेले आहे आणि त्यामुळे त्या ठिकाणी मोठया प्रमाणावर वाहतूक असते. पाऊस सुध्दा मोठया प्रमाणावर पडतो. परंतु सी.आर. चा निधी देताना कोकणामध्ये मराठवाडयाच्या नॉर्म्स प्रमाणे निधी येतो. म्हणून सार्वजनिक बांधकाम विभागाने कोकणासाठी खास नॉर्म्स केले पाहिजेत. गणपती आणि दिवाळी या दोन्ही सणासाठी ज्यावेळी मुंबई शहरामध्ये काम करणारे कोकणातील सर्व नोकरदार कोकणात जातात त्यावेळी दोन्ही रस्ते मोठया प्रमाणावर नादुरुस्त असतात. म्हणून यासाठी खास निधी देण्यात यावा अशी मागणी मी या पुरवणी मागण्यांच्या माध्यमातून करीत आहे.

सभापती महोदया, यानंतर मी बाब क्रमांकक 77 बाबत सांगू इच्छितो. महाड डिव्हीजनमध्ये कुराड ते काचवे या रस्त्याचे डांबरीकरण न करता 8 लाख रुपये ठेकेदाराला दिले. रस्त्यावर डांबर टाकलाच नाही. त्या ठिकाणी कार्यकारी अभियंता यांनी चौकशी केली. त्यांनीही मान्य केले की, त्या ठिकाणी डांबर टाकलेला नाही. तरी सुध्दा डांबर टाकल्याचे पेसे त्या ठिकाणी घेतलेले आहेत. त्या ठिकाणी शासनाचे खोटे दस्तऐवज करुन फसवणूक केलेली आहे. म्हणून संबंधित बांधकाम विभागाच्या अभियंत्यांपासून ओव्हरसियर पर्यन्त याची चौकशी करुन त्यांच्यावर कडक कारवाई झ ााली पाहिजे.

सभापती महोदया, यानंतर अन्न व नागरी पुरवठा विभागाच्या बाबत क्रमांक 184, पृष्ठ क्रमांक 155 यावर मला बोलावयाचे आहे. शासनाची जी गोदामे आहेत त्यामध्ये एकाधिकार भात खरेदी चालू असताना कोकणामध्ये या गोदामाची कामे मोठया प्रमाणावर होत असतात. त्यावेळी ती गोदामे चांगल्या परिस्थितीमध्ये होती. ज्यावेळी एकाधिकार खरेदी पध्दतीने भात खरेदी करतो त्यावेळी तो भात ठेवण्यासाठी आज गोदामे चांगल्या स्थितीमध्ये नाहीत. त्यासाठी लागणारी तरतूद झ ाालेली नाही. त्यामुळे जो भात किंवा धान खरेदी केला होता तो भरपूर प्रमाणात उंदीर आणि बाकीच्या प्राण्यांनी खाऊन संबंधित संस्थांना मोठी घट आलेली आहे. त्यामुळे या एकाधिकार भात

...2...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ SBT/ MHM/

श्री. जयंत प्र.पाटील ....

खरेदीमध्ये एजंसी घेण्यासाठी कोणतीही संस्था कोकणामध्ये येण्यास तयार नाही. यादृष्टीकोनातून ही गोदामे तातडीने दुरुस्त करण्याची मागणी मी या निमित्ताने या ठिकाणी करीत आहे.

सभापती महोदया, यानंतर मला सहकार विभागाच्या बाबीच्या संदर्भात बोलावयाचे आहे. या ठिकाणी जी ॲफेक्स बँक आहे त्यामध्ये दोन बँका झाल्या. दुसऱ्या ॲफेक्स बँकेचे रजिस्ट्रेशन नामदार सुप्रीम कोर्टाने रद्द केले. त्यामुळे त्या बँकेमार्फत ज्या सहकारी कारखान्यांना किंवा ज्या संस्थांना कर्ज दिले होते त्यांचा कर्ज पुरवठा आज बंद झालेला आहे. आमच्या बँकेसारख्या बँकेचे, ज्या ठिकाणी जॉइन्ट व्हेंचर मध्ये कर्ज दिलेले आहे ते कर्ज थकित झालेले आहे. त्यामुळे राज्य शासनाने जे पैसे ॲफेक्स बँकेच्या मार्फत त्या त्या संस्थांना दिले होते त्यांना एम.एस.सी. बँकेमार्फत किंवा इतर बँकेमार्फत कर्ज पुरवठा देण्याच्या दृष्टीने, दिलेले पैसे सुरक्षित ठेवण्याच्या दृष्टीने आणि तेथील शेतकऱ्यांना योग्य न्याय देण्याच्या दृष्टीने शासनाने प्रयत्न करावा अशी विनंती मी या बाबीच्या निमित्ताने करतो व माझे भाषण संपवितो.

यानंतर श्री. खंदारे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर सरपोतदार (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, सन 2005-06 च्या पूरक मागण्यांवर सभागृहामध्ये चर्चा सुरु झालेली आहे. महसूल व वन विभागातील महसूल विभागाची बाब क्र.40, पृष्ठ क्रमांक 29 वरील विषय माझ्यासमोर आलेला आहे. मुद्रांकाच्या छपाईचे 54 कोटी रुपयांचे प्रलंबित बिल प्रदान करण्याची ही बाब आहे. या मुद्रांकाचे पुढे काय झाले ? 2001 पासून या मुद्रांक छपाईची बिले प्रलंबित आहेत. त्यानंतर मुद्रांक घोटाळा महाराष्ट्रात आणि संपूर्ण देशामध्ये सुरु झाला. या मुद्रांक घोटाळयामुळे एक मंत्र्यांना मंत्रिमंडळाच्या बाहेर जावे लागले आणि ते पुन्हा मंत्रिमंडळामध्ये आले आहेत अशी परिस्थिती आहे. संबंधित मंत्री येथे बसलेले आहेत. मी एकदा नागपूरला विमानतळावर त्यांचे अभिनंदन केले होते. आम्ही नागपूरला अधिवेशन काळामध्ये विमानतळावर बसलो होतो त्यावेळी मा.मंत्री श्री.छगन भुजबळ तेथे आले त्यावेळी मी त्यांना म्हटले की, भुजबळसाहेब तुमचे अभिनंदन. ते म्हणाले की, कशाचे अभिनंदर करता ? मी त्यांना म्हटले की, देशातील मुख्य वर्तमानपत्रामध्ये तुमचे आणि तेलगीचे फोटो एकत्र छापून येत आहेत म्हणून तुमचे अभिनंदन करीत आहे. तुम्ही आमच्याकडे होता तेव्हाही महाराष्ट्रामध्ये प्रसिध्द होता. त्यावेळी ते त्यांची प्रसिध्दी यंत्रणा बरोबर घेऊन फिरत होते. आता तुम्ही संपूर्ण जगभर प्रसिध्द झाला आहात. कारण ही बातमी संपूर्ण जगभर पसरलेली आहे. आमचे जगभर फिरणे होत नाही, परंतु त्यांना याप्रकरणामुळे भरपूर प्रसिध्दी मिळाली आहे. हे 54 कोटी रुपये केव्हापासूनचे प्रलंबित आहेत ? वास्तविक ही मागणी बजेटमध्ये येणे आवश्यक असताना पूरक मागणीमध्ये का आली हा प्रश्न आहे.

सभापती महोदय, बाब क्रमांक 41, पृष्ठ क्र.29 वर जुन्या गाडयांच्या जागी नवीन गाडयांची खरेदी करण्यासाठी 30 लाखाची मागणी करण्यात आलेली आहे. पूर्वीच्या गाडयांचे काय केले, त्या गाडया कोणाला विकल्या आणि ज्या गाडया घेतल्या जाणार आहे त्या कोणासाठी वापरल्या जाणार आहेत याविषयीची सदनाला माहिती दिली तर बरे होईल.

त्यानंतर बाब क्रमांक 45, पृष्ठ क्रमांक 30 वर बाराव्या वित्त आयोगाच्या शिफारशीनुसार वनांच्या संरक्षणासाठी 70 कोटीच्या केंद्रीय सहाय्यक अनुदानापैकी आपण 14 कोटी रुपयांची मागणी केलेली आहे. वनाच्याबाबतीत मी म्हणेन की, पैसा खर्च करता परंतु वनाचे संरक्षण तरी करा. आज शेकडो लॉरी लाकूडतोड होत आहे. त्यामुळे वनाचे संरक्षण होण्याची गरज आहे. या

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ MHM/ SBT/

श्री.मधुकर सरपोतदार.....

जंगलतोडीमुळे महाराष्ट्रामध्ये पावसाचे प्रमाण कमी होत आहे. पावसाचे प्रमाण कमी झाल्यामुळे आता कृत्रिम पाऊस पाडण्यासाठी शासनाला तरतूद करावी लागते. हे टाळण्यासाठी शासनाने वन संरक्षण केले पाहिजे

त्यानंतर मी वित्त विभागाच्या बाब क्रमांक 52, पृष्ठ क्रमांक 68 वर बोलणार आहे. शासनाने राज्यामध्ये 1 एप्रिल, 2005 पासून व्हॅट सुरु केला आहे. या व्हॅटच्या प्रचारासाठी, जाहिरातीसाठी 7 कोटी रुपये खर्च केले आहेत आणि यापुढेही खर्च होणार आहेत. व्हॅटचे राज्यात स्वागत करण्यात आले. पण त्यातील वस्तुस्थिती अशी आहे की, या सभागृहामध्ये व्हॅट लावण्याचे मान्य केले होते परंतु त्यानंतर 4-5 वर्षे तो लागू करण्याचे स्थगित ठेवले होते आणि पुन्हा महाराष्ट्रामध्ये आणला कारण तो देशामध्ये आणला गेला होता. त्यावेळी पुरेसा प्रचार झाला नाही म्हणून आता त्यावर खर्च करावा लागला असे म्हटले आहे. पण ज्यावेळी व्हॅट लागू झाला त्याचा परिणाम काय झाला तर व्यापा-यांनी निदर्शने केली, आंदोलने आजही सुरु आहेत. व्हॅटची अंमलबजावणी झाली असली तरी त्याची जेवढी परिणामकारक अंमलबजावणी झाली पाहिजे होती ती न झाल्यामुळे त्याची जाहिरात करावी लागली असा त्याचा अर्थ होतो.

नंतर श्री.शिगम...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ MHM/ SBT/ पूर्वी श्री. खंदारे 17:40

(श्री. मधुकर सरपोतदार....)

अन्न व नागरी पुरवठा विभागाच्या पृ.क्र. 184वरील बाब क्रमांक 155मध्ये गोदामांच्या दुरुस्तीसाठी 1 कोटी रु.ची पुरवणी मागणी करण्यात आलेली आहे. प्रश्न असा आहे की, अशा प्रकारची गोदामे महाराष्ट्र किती आहेत ? कोणत्या साली ती बांधली गेली ? या 1 कोटीमध्ये कोणकोणत्या गोदामांची दुरुस्ती करण्यात येणार आहे ? या प्रश्नांची माहिती मंत्री महोदय सदनाला देतील काय ? नाही तर प्रत्येक वेळा अशा प्रकारची तरतूद केली जाते आणि प्रत्यक्षात ती तरतूद पाहिजे त्या बाबीवरच खर्च होते की नाही हे मात्र सदनाला कळत नाही. म्हणून यासंदर्भात मा. मंत्री महोदयांनी माहिती द्यावी.

नियोजन विभागाच्या पृ.क्र. 161 वरील बाब क्रमांक 187मध्ये मागासवर्गीयांच्या सहकारी गृहनिर्माण संस्थांना वित्तीय सहाय्य देण्यासाठी 30 कोटीची पुरवणी मागणी करण्यात आलेली आहे. या गृहनिर्माण योजनेंतर्गत मागासवर्गीय सहकारी गृहनिर्माण संस्थांना जमीन खरेदी, बांधकाम व व्याजापोटी अर्थसहाय्य दिले जाते. अर्थसंकल्पात केलेली तरतूद अपुरी असल्याने 2005-06 च्या अर्थसंकल्पामध्ये 3 कोटीची पूरक मागणी केलेली आहे असा पुस्तिकेमध्ये उल्लेख करण्यात आलेला आहे. या मागासवर्गीय वसाहती कुठे कुठे आहेत याची मा.मंत्री महोदयांनी माहिती दिली तर बरे होईल.

पृ.क्र.161 वरील बाब क्रमांक 187मध्ये बीड जिल्ह्यामध्ये सांस्कृतिक सभागृह बांधण्यासाठी 2.5 कोटीची पुरवणी मागणी करण्यात आलेली आहे. हे सांस्कृतिक सभागृह बीड जिल्ह्यामध्ये नेमके कोणत्या ठिकाणी असेल आणि कशा प्रकारची ही योजना आहे याचा खुलासा मा.मंत्री महोदयांनी करावा. तसेच एवढ्याच खर्चामध्ये ह्या सर्व गोष्टी होणार आहेत की, यासाठी आणखी मागणी केली जाणार आहे ? यासंसबंधी देखील मा.मंत्री महोदयांनी माहिती दिली तर बरे होईल.

पृ.क्र. 170 वरील बाब क्रमांक 205मध्ये गुरु-दा-गद्दी त्रिशताब्दी सोहळा कार्यक्रमासाठी 11 कोटी 99 लाख रु.ची पुरवणी मागणी करण्यात आलेली आहे. गुरु-दा-गद्दी हा विषय मला समजलेला नाही. माझे अज्ञान प्रगट करण्यास काही हरकत नाही. तेव्हा या विषयासंबंधी अधिक माहिती दिली तर चांगले होईल.

पृ.क्र. 170 वरील बाब क्रमांक 206मध्ये रोजगार हमी योजना व जवाहर विहीर कार्यक्रमासाठी 4 कोटी 18 लाख रु.ची पुरवणी मागणी करण्यात आलेली आहे. या जवाहर विहीर

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. मधुकर सरपोतदार...)

कार्यक्रमाच्या संदर्भात तसेच रोजगार हमी योजनेच्या संदर्भात रोज तक्रारी ऐकावयास मिळतात. ही पुरवणी मागणी मंजूर झाल्यानंतर हा पैसा गरजू लोकांपर्यन्त जाणार आहे काय ? जवाहर विहीर योजनेमध्ये, विशेषत: रोजगार हमी योजनेमध्ये प्रचंड प्रमाणावर भ्रष्टाचार चालू आहे. खोट्या हजे-या दाखवून मजुरांचे वेतन हडप केले जाते, अनेक मजुरांना मजुरी मिळत नाही अशा प्रकारच्या शेकडो तक्रारी आमच्याकडे येत असतात. याबाबतीत शासन काळजी घेणार आहे की नाही हा खरा प्रश्न आहे.

पृ.क्र. 171वरील बाब क्रमांक 208मध्ये गडचिरोली जिल्ह्याच्या विकासासाठी 15 कोटीची पुरवणी मागणी करण्यात आलेली आहे. गडचिरोली जिल्ह्यामध्ये नक्षलवादी चळवळ आहे आणि तेथील जनतेची त्यांना साथ मिळत असल्यामुळे ही चळवळ वाढत चाललेली आहे. केवळ पोलीस बळाने किंवा आदिवासी लोकांना त्रास देऊन हा प्रश्न सुटणार नाही. मूलभूत प्रश्न हा त्या गडचिरोली जिल्ह्याचा विकासाचा आहे. गडचिरोली जिल्ह्याचा विकास केल्याशिवाय हा प्रश्न सुटणार नाही असे मला वाटते आणि म्हणून त्यादृष्टीकोनातून शासनाने या प्रश्नाकडे पहावे.

...नंतर श्री. गिते...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर सरपोतदार...

सभापती महोदय, आता मी सहकार विभागाच्या बाब क्रमांक 270,275 आणि 276 वर बोलणार आहे. या ठिकाणी माननीय सहकार मंत्री उपस्थित आहेत. या मागण्यांच्या निमित्ताने मी काही बाबी माननीय सहकार मंत्र्यांच्या निदर्शनास आणून देणार आहे. बाब क्रमांक 270-महाराष्ट्र सहकार विकास महामंडळाने 1250 मेट्रीक टन गाळप क्षमता असलेल्या 12 साखर कारखान्यांना भाग भांडवलाची तरतूद करण्यासाठी रुपये 85 कोटी 76 लाख 65 हजार इतके अंतरिम कर्ज मंजूर केले आहे. या 12 साखर कारखान्यांसाठी एवढी मोठी तरतूद शासनाकडून करण्यात आलेली आहे. सध्या महाराष्ट्रातील सहकारी साखर कारखान्यांची परिस्थिती अतिशय भयानक आहे. या साखर कारखान्यांना शासनाकडून सगळया प्रकारची मदत दिली जाते. परंतु या सहकारी साखर कारखान्यांचा शेवट काय असतो तर सहकारी साखर कारखाना दिवाळखोरीत निघाला. एवढी मदत करुनही साखर कारखाने दिवाळखोरीत गेला असे दाखविले जाते. यामुळे राज्य शासनाचे पर्यायाने राज्यातील जतनेचे कोटयावधी रुपये या सहकारी साखर कारखान्यांवर वाया जात आहेत. महाराष्ट्रातील जे साखर सम्राट आहेत त्यांच्याकडून साखर कारखान्यांच्या बाबतीत काहीच दखल घेतली जात नाही. त्यामुळे राज्यातील अनेक सहकारी साखर कारखाने आजारी पडत चालले आहेत. राज्यातील सहकारी साखर कारखान्यांचा कारभारावर सहकार आयुक्त,सहकार मंत्री यांचे कोणाचेही नियंत्रण राहिलेले नाही. अतिशय अनागोंदी कारभार या साखर कारखान्यामध्ये चालला आहे. शासनाकडून मोठया प्रमाणात मदत करुनही सहकारी साखर कारखान्यांच्या कारभारात काही सुधारणा होतील यावर माझा थोडाही विश्वास नाही. "गोड साखरेची कडू कहाणी " अशी या कारखान्यांच्या परिस्थिती झालेली आहे. ही कडू कहाणी गोड करण्याचा आपण प्रयत्न करावा अशी माझी सहकार मंत्र्यांना विनंती आहे. सभापती महोदय, साखर उद्योगातून हजारो कोटी रुपये शासनाला मिळत आहेत. हे पैसे केवळ खर्च होणार असतील व त्यात महाराष्ट्रातील जनतेचे कल्याण होत नसेल, लोकांना रोजंदारी मिळणार नसेल तर साखर उद्योग हा कधीही भरभराटीस येणार नाही. परवा सहकारी साखर कारखान्यासंबंधी सभागृहात प्रश्न उपस्थित करण्यात आला होता. त्यावेळी मी माझे मत व्यक्त केले होते की, खरोखरच हे सहकारी साखर कारखाने फायद्यामध्ये आले तर महाराष्ट्रातील जनतेचे कल्याण होऊ शकेल. राज्यातील शेतक-यांचे कल्याण होऊ शकेल, कामगारांचे कल्याण होऊ शकेल आणि---

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर सरपोतदार...

त्यामुळे समाजामध्ये अतिशय आनंदाचे वातावरण निर्माण होऊ शकेल. परंतु साखर उद्योगाच्या बाबतीत जसे घडावयास पाहिजे होते तसे घडत नाही ही दुर्देवाची बाब आहे.

बाब क्रमांक 275- सहकारी साखर कारखान्यांना अंशदानासाठी 18 कोटी रुपयांची तरतूद करण्यात आलेली आहे. सहकारी साखर कारखान्यातील अंतर्गत रस्ते दुरुस्तीसाठी ही तरतूद करण्यात आलेली आहे. पुरवणी मागणी सभागृहात आणून आर्थिक तरतूद उपलब्ध करुन देण्यात येत आहे. साखर कारखान्यातील अंतर्गत रस्त्याच्या दुरुस्तीसाठी महाराष्ट्र शासन कशासाठी पैसे देत आहे याचा माननीय सहकार मंत्र्यांनी खुलासा करावा. सभापती महोदय, बाब क्रमांक 276 देखील अशाच प्रकारची आहे. रस्ते विकासासह पायाभूत विकासासाठी सहकारी साखर कारखान्यांना सहाय्यक अनुदान 18 कोटी रुपये उपलब्ध करुन देण्यात येत आहे. शासनाचा पैसा अशा अंतर्गत बाबीवर खर्च व्हावयास लागला तर राज्यातील इतर विकासाची कामे थांबतील. या ठिकाणी सार्वजनिक बांधकाम मंत्री श्री.छगन भुजबळ बसले आहेत ते राज्यातील बाहेरच्या रस्त्यांची कामे बघतील. रस्ते विकासासह पायाभूत विकासासाठी सहकारी साखर कारखान्यांना सहाय्यक अनुदान का उपलब्ध करुन देण्यात आले याचा देखील मंत्री महोदयांनी खुलासा करावा.

सभापती महोदय, उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या बाब क्रमांक 297 वर बोलून मी माझे भाषण संपविणार आहे. सोलापूर येथे सोलापूर विद्यापीठाच्या इमारतीच्या बांधकामासाठी 2 कोटी रुपयांची तरतूद केलेली आहे. या राज्याचे पूर्वीच्या मुख्यमंत्र्यांनी या विद्यापीठासंबंधी घोषणा केली. पूर्वीचे मुख्यमंत्री जाऊन एक वर्ष होऊन गेले. सोलापूर विद्यापीठाची घोषणा करुन सोलापूर जिल्हयातील जनतेची मते घेतली. परंतु याकामासाठी वेळीच तरतूद करण्यात आली नाही. या वर्षी मात्र 2 कोटी रुपयांची तरतूद करण्यात आलेली आहे. या कामासाठी तरतूद करण्यास एवढा विलंब का लावला याचे स्पष्टीकरण माननीय उच्च शिक्षण मंत्र्यांनी करावे. एकदा घोषणा केली की, त्या घोषणेची अंमलबजावणी तात्काळ केली पाहिजे. कोणतीही घोषणा करतान प्रथम विचार केला पाहिजे. घोषणा करुन नंतर विचार करण्यात काही अर्थ रहात नाही. प्रथम लोकांना घोषणेची पुंगी दाखवावयाची व ती पुंगी वाजली नाही तर खाऊन टाकावयाची अशा प्रकारची प्रवृत्ती शासनामध्ये वाढलेली आहे. लोकांची दिशाभूल करण्याची प्रवृत्ती शासनामध्ये वाढत चालली आहे ती योग्य नाही असे माझे स्पष्ट मत आहे. या ठिकाणी विद्यापीठ होत आहे ही आनंदाची गोष्ट आहे. त्यास माझा

3...

ABG/ SBT/ MHM/ प्रथम श्री.शिगम 17:45

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर सरपोतदार...

मुळीच विरोध नाही. सोलापूर विद्यापीठ निर्माण होऊ द्या, परंतु विद्यापीठ निर्मितीच्या कामास गती आणा असे माझे म्हणणे आहे. या वर्षी 2 कोटी रुपये तरतूद विद्यापीठाच्या कामासाठी उपलब्ध करुन दिली आहे. या कामासाठी दरवर्षी तरतूद करण्यात आली पाहिजे. अचानक 10 वर्षांनी या कामासाठी तरतूद उपलब्ध करुन दिली तर त्या तरतुदीचा काही उपयोग होणार नाही. या विद्यापीठासाठी तुम्ही 10 कोटी रुपयांची तरतूद उपलब्ध करुन दिली असती तरी त्यास माझा विरोध राहिला नसता. विद्यापीठाची निर्मितीचे काम चांगले आहे. मुलांच्या शिक्षणाची त्या ठिकाणी सोय होणार आहे. मुलांच्या शिक्षणाकडे आपल्याला दुर्लक्ष करुन चालणार नाही. माझे एवढेच म्हणणे आहे की, प्रथम घोषणा करावयाच्या आणि काही वर्षानंतर त्या कामासाठी तरतूद उपलब्ध करुन द्यावयाची ही पध्दत योग्य नाही. शासनाने अशा प्रकारच्या पोकळ घोषणा करु नये. त्या घोषणा प्रत्यक्षात कृतीत आणू शकतो अशाच घोषणा शासनाने जाहीर कराव्यात...

यानंतर श्री. कानडे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर सरपोतदार .....

वीज फुकट देतो म्हणून घोषणा केली आणि आता सरकार या घोषणेच्या अंमलबजावणीपासून दूर जात आहे. सभापती महोदय, पृष्ठ क्र. 321,बाब क्र.312 कडे मी मंत्रीमहोदयांचे लक्ष वेधू इच्छितो. तंत्रशिक्षणाचा विस्तार व सांगली जिल्हयातील आर्थिकदृष्टया मागासलेल्या विद्यार्थ्यांना उपकरणे आणि संच पुरविणे यासाठी 4 लाख 66 हजारांची तरतूद केली आहे. परंतु मुंबई उपनगर जिल्हयाकडे मात्र दुर्लक्ष केलेले आहे. मुंबई शहर हे राज्यामध्ये महसूल देणारे सर्वात मोठे शहर आहे. परंतु याच शहराकडे जास्तीत जास्त दुर्लक्ष होत आहे. मुंबई उपनगराकडे शासनाने लक्ष दिले तर मागासवर्गीयांच्या समस्या निश्चितच सुटतील. 1 कोटी लोकसंख्येचा मुंबई जिल्हा आहे. या जिल्हयाकडे सातत्याने शासनाने दुर्लक्ष केले तर या जिल्हयातील लोकांच्या असंतोषाचा भडका उडाल्याशिवाय राहणार नाही एवढेच मी या निमित्ताने सांगतो आणि माझे भाषण संपवितो.

....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

कर्नल श्री. सुधीर सावंत (नामनियुक्त) : सभापती महोदय, सभागृहाला सादर करण्यात आलेल्या पुरवणी मागण्यांचा मी पूर्ण अभ्यास केला आहे. आघाडी शासन कोकणाच्या पाठीमागे भक्कमपणाने उभे आहे अशा प्रकारचे वातावरण निर्माण होत असताना सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कामांकडे पाहिल्यानंतर सिंधुदूर्ग आणि रत्नागिरी जिल्हयाचे नांव त्यामध्ये अपवादानेच पहावयास मिळेल. प्रादेशिक विषमता बळावत चाललेली आहे. दर पुरवणी मागण्यांच्या वेळी आणि अर्थसंकल्पाच्या वेळी आम्ही कोकणाच्या विकासाच्या संदर्भात बोलतो परंतु एक प्रकारे कोकणाकडे लक्ष देण्याची मानसिकता आघाडी शासनाकडे दिसत नाही ही दुर्देवाची गोष्ट आहे. सभापती महोदय, पुरवणी मागण्यांवर बोलत असताना पृष्ठ क्र. 337 वरील बांधकाम विभागाच्या रस्त्यांची यादी पाहिली तर रत्नागिरी आणि सिंधुदूर्ग जिल्हयातील रस्त्यांचे नांव दिसत नाही. एकीकडे सिंधुदूर्ग जिल्हा हा पर्यटन जिल्हा म्हणून जाहीर करण्यात आला आहे. पर्यटकांच्या दृष्टीने गोवा सलग असल्यामुळे या जिल्हयाची प्रचंड प्रगती होण्याची शक्यता आहे. परंतु जोपर्यंत पायाभूत सुविधा निर्माण होत नाहीत तोपर्यंत या जिल्हयाकडे पर्यटक आकर्षित होणार नाहीत आणि पर्यायाने जिल्हयाचा विकास होणार नाही. माझी शासनाला विनंती आहे की, या जिल्हयाचा विकास करताना सागरी मार्गाने जिल्हयाचा कायापालट होऊ शकतो. यासाठी मुंबई-गोवा पर्यटन महामार्ग हा करणे अत्यंत आवश्यक आहे. सागरी महामार्गाऐवजी पर्यटन महामार्ग चौपदरी केला तर पर्यटनाच्या दृष्टीने उत्कृष्ट प्रगती होऊ शकते. या मार्गाबद्दल सरकारकडून उत्तर अपेक्षित आहे. सभापती महोदय, यानंतर मी शासनाचे लक्ष पाटबंधारे आणि जलसंपदा विभागाकडे वेधू इच्छितो. पृष्ठ क्र.130 आणि बाब क्र.116 मध्ये मध्यम आणि मोठया प्रकल्पांची कामे आहेत. गेली 5-6 वर्षे या विषयावर आम्ही सातत्याने बोलत आहोत परंतु त्याचा काहीही परिणाम शासनावर झालेला नाही.

(सभापतीस्थानी मा. सभापती)

यानंतर श्री. गायकवाड

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

कर्नल सांवत...

आमच्या भागात टाळंबा हा मेजर प्रोजेक्ट आहे. या प्रकल्पाचे भूमिपूजन झाले हे खरे आहे परंतु गेल्या सात वर्षात या प्रकल्पाचे काम सुरु झालेले नाही. या प्रकल्पासाठी आर्थिक तरतूद केली जाते परंतु त्या तरतुदीचा वापर होत नाही.फॉरेस्टच्या अडचणीमुळे जर प्रकल्पाचे काम होत नसेल तर त्या प्रकल्पाच्या बाबतीत काही तरी निर्णय घेऊन त्या ऐवजी दुसरा प्रकल्प सुरु करण्यात आला पाहिजे व तशा प्रकारची भूमिका घेणे आवश्यक आहे. नरडेवे व महंमदवाडी प्रकल्पाला जेव्हा प्रशासकीय मान्यता देण्यात आली होती. तेव्हा त्या प्रकल्पाचे डावा आणि उजवा असे दोन कालवे होते.परंतु नंतर हे दोन्ही कालवे रद्द करण्यात आले होते. परंतु कमांड एरिया मात्र तोच ठेवण्यात आला होता.कालवे मात्र रद्द करण्यात आले होते. त्या ठिकाणी के.टी.वेअर व्दारे, लिफट इरिगेशन व्दारे सिंचन वाढविण्याची योजना तयार करण्यात आली परंतु कमांड एरिया मात्र पूर्वीप्रमाणे कालव्याचाच ठेवण्यात आला होता.इतके पैसे खर्च करुनसुध्दा नरडेवे महमंदवाडी प्रकल्पाला कमांड एरिया नाही. कमांड एरियामध्ये पुनर्वसन करावयाच्या शेतक-यांना शेती देण्यात येणार आहे.तेव्हा ज्या ठिकाणी कमांड एरियाच नाही त्या ठिकाणी शेतक-यांना शेती कशी काय देता येईल ?.गेल्या पाच वर्षात कॉस्ट बेनिफिट रेषो बदलण्यासाठी आम्ही कोकण कृषि विद्यापीठाला विनंती केली होती.भात या एकाच पिकावर कॉस्ट बेनिफिट रेषो ठरविण्यात येणार असेल तर कोकणात कधीही धरणे होऊ शकणार नाहीत. कोकणामध्ये सिंचन क्षमता कधीही निर्माण होऊ शकणार नाही. तेव्हा फळबागायतीच्या आधारे कॉस्ट बेनिफिट रेषा बनविण्यात यावा अशा प्रकारची विनंती आम्ही केल्यानंतर कॉस्ट बेनिफिट रेषोचे निकष बदलण्यात आले होते.त्या निकषात बसत असतांना नरडेवे धरणाला दोन कालवे होणे आवश्यक आहे. अन्यथा या धरणाचा काहीही उपयोग होणार नाही असे मला या निमित्ताने सांगावयाचे आहे....

श्री.गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, लोकशाही आघाडी पक्षाची बैठक आता 6.00 वाजता घेण्यात येणार आहे.या बाजूचे सर्व सन्माननीय सदस्य 6.00 वाजता त्या बैठकीला जाणार आहेत. तेव्हा माझी आपल्याला अशी विनंती आहे की, उद्या सकाळी लवकर सभागृहाची बैठक घेऊन त्या बैठकीत पूरक मागण्यांवरील चर्चा घेण्यात आली तर या पूरक मागण्यांवरील चर्चा व उत्तर उद्या एकत्रित होऊ शकेल. तेव्हा मी जी सूचना केलेली आहे ती आपण मान्य करावी अशी माझी आपल्याला विनंती आहे.

श्री.मधुकर चव्हाण :सभापती महोदय, सगळेच कामकाज उद्या घेण्यात यावे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.अशोक मोडक :सभापती महोदय, अर्धा तास चर्चेचा बॅकलॉग जास्त आहे आज आपण पुन्हा ती अर्धा तास चर्चा पोस्टपोन केली तर पुन्हा त्या पेन्डीग राहतील.सन्माननीय सदस्य श्री.विनोद तावडे यांनी उपस्थित केलेली अर्धा तास चर्चा गेल्या दोन अधिवेशनापासूनची आहे. तेव्हा सन्माननीय सदस्य श्री.गुरुनाथ कुलकर्णी यांना माझी अशी विनंती आहे की,ज्या मंत्र्यांकडून अर्धा तास चर्चेच्या संदर्भात उत्तरे अपेक्षित आहेत त्यांना कृपया आपण स्पेअर करावे . संघटनात्मक बैठकीला माझे ऑब्जेक्शन नाही परंतु पार्लमेन्टरी काम सुध्दा तितकेच महत्वाचे असल्यामुळे आपण यातून कॉम्प्रमाईज फॉर्म्युला शोधावा अशी मी माननीय सभापती महोदयांना विनंती करीत आहे.

सभापती : या संदर्भात दोन्ही बाजूंच्या सन्माननीय सदस्यांनी आपआपले विचार मांडलेले आहेत. आपण उद्या सकाळी 10.30 वाजता सभागृहाची बैठक ठेवली आणि 12.45 पर्यन्त कामकाज केले तर.आजच्या कामकाजपत्रिकेवरील पूरक मागण्यासंबंधीचा जो विषय आहे तो विषय त्या वेळेत होईल . त्यानंतर दुपारी दुस-या दहा विभागाच्या मंत्र्यांच्या पूरक मागण्यासबंधी चर्चा होईल आणि उत्तरही होईल. आज सहा अर्धा तास चर्चा आहेत. तेव्हा त्या चर्चेच्या संदर्भातील मंत्री किंवा राज्यमंत्री आता उपलब्ध होऊ शकले तर या अर्धा तास चर्चा आपल्याला आता घेता येतील .कदाचित तीन अर्धा तास चर्चा आज आणि राहिलेल्या तीन अर्धा तास चर्चा नतंर घेता येतील.

एक सन्माननीय सदस्य : सर्वच अर्धा तास चर्चा नंतर घेण्यात याव्यात

नंतर श्री.सुंबरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती : आज एकूण 6 अर्धा तास चर्चा दाखविण्यात आलेल्या आहेत, त्या बाबत काय करावयाचे ? संसदीय कार्य मंत्र्यांना मी विचारू इच्छितो ...

डॉ. पतंगराव कदम :

महोदय, याबाबत आपण जो निर्णय घ्याल तो आम्हाला मान्य आहे. आजच्या अर्धा तास चर्चा घ्यावयास आमची हरकत नाही. त्यासाठी संबंधित मंत्री वा राज्यमंत्री दोघांपैकी एक जण येथे उपस्थित राहतील.

सभापती : तर मग या बाबतीतील अंतिम निर्णय मी सभागृहाला सांगतो. निर्णय असा झाला आहे की, आजच्या पुरवणी मागण्यांवरील चर्चा उद्या सकाळी 10.30 ते दुपारी 12.45 वाजेपर्यंत विशेष बैठक घेऊन चर्चा आणि मंत्र्यांची उत्तरे असे दोन्ही पूर्ण करून संपवावयाची. त्यानंतर दुपारी 1.00 वाजता सभागृहाची नियमित बैठक घ्यावयाची. आणि आता आजच्या कामकाज पत्रिकेवर दाखविण्यात आलेल्या अर्धा तास चर्चा अनुक्रमे 1 ते 6 चर्चेला घेऊन पूर्ण करावयाच्या. त्यासाठी संबंधित मंत्री वा त्यांचे राज्यमंत्री यांनी उपस्थित राहून या अर्धा तास चर्चेला उत्तर द्यावयाचे आहे.

त्याप्रमाणे मी आता अर्धा तास चर्चा पुकारतो. या ठिकाणी अनुक्रमांक 1 वर असलेली अर्धा तास चर्चा सन्माननीय सदस्यांनी विनंती केल्यानुसार नंतर पण आजच घेण्यात येईल. त्यामुळे अनुक्रमांक 2 वर असलेली अर्धा तास चर्चा आता प्रथम घेण्यात येईल.

***

...... एसएस 2 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी. : कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षकांना पूर्णकालीन मान्यता व वेतनश्रेणी देणे.

मु.शी. : कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षकांना पूर्णकालीन मान्यता व वेतनश्रेणी देणे याबाबत श्री.वसंत काळे यांनी उपस्थित केलेली अर्धा तास चर्चा.

सन्माननीय सदस्य अनुपस्थित.

****

पृ.शी. : शालेय शिष्यवृत्ती रकमेमध्ये किमान दुप्पटीने वाढ करणे.

मु.शी. : शालेय शिष्यवृत्ती रकमेमध्ये किमान दुप्पटीने वाढ करणे याबाबत प्रा.शरद पाटील यांनी उपस्थित केलेली अर्धा तास चर्चा.

सन्माननीय सदस्य अनुपस्थित.

***

..... एसएस 3 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी. : सर्व शासकीय कामकाजात मराठी भाषेचा वापर सक्तीचा होणे.

मु.शी. : सर्व शासकीय कामकाजात मराठी भाषेचा वापर सक्तीचा होणे व त्यादृष्टीने तालुका व जिल्हा न्यायालयांना अंतिम तारीख देणे याबाबत श्री.मधुकर चव्हाण यांनी उपस्थित केलेली अर्धा तास चर्चा.

श्री. मधुकर चव्हाण (मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील अर्धा तास चर्चा उपस्थित करीत आहे. इ

" महाराष्ट्र राज्याची निर्मिती दिनांक 1 मे 1960 रोजी झाल्यानंतर गेली 45 वर्षे तालुका व जिल्हा न्यायालयांची कामकाजाची भाषा म्हणून इंग्रजीचा वापर होणे. कामकाजात मराठीचा वापर व्हावा म्हणून राज्य शासनाने दिनांक 21 जुलै 1998 रोजी अधिसूचना जारी केली परंतु गेली 7 वर्षे त्या संदर्भात काहीच प्रगती न होणे, तसेच इंग्रजीचे ज्ञान नसणारे नागरिक, ग्रामस्थांची संख्या मोठ्या प्रमाणात असणे, त्या दृष्टीने न्यायालयात दावे दाखल केल्यानंतर सुनावणीच्या वेळी त्यांची इंग्रजी भाषेमुळे अडचण होणे, त्यासाठी शासनाने सर्वत्र कामकाजात मराठीचा वापर करण्यासाठी तालुका व जिल्हा न्यायालयांना अंतिम तारीख देणे गरजेचे असणे, या संदर्भात जनतेमध्ये पसरलेला तीव्र असंतोष व त्यावर शासनाने करावयाची तातडीची कार्यवाही व उपाय योजना."

सभापती महोदय, देशामध्ये भाषावार प्रांत रचना ही कल्पनाच अशी होती की, त्या त्या प्रांतामध्ये भाषिक राज्य झाल्यानंतर त्या त्या भाषेच्या माध्यमातून कारभार केला जावा. विशेषत: सरकारी कामकाजामध्ये आणि न्यायालयांमध्ये देखील मराठी भाषेचा मोठ्या प्रमाणात वापर होणे आवश्यक आहे. दुर्दैवाने आपल्याकडे असे झाले आहे की, इंग्रजी माध्यमांच्या शाळांतून आणि मराठी शाळांतून देखील इंग्रजी माध्यमातून शिक्षण देण्याची पध्दत वा प्रथा सुरू झाल्यामुळे ....

(यानंतर श्री.जागडे .... टीटी 1 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ASJ/ MAP/ KGS/ 18:05

श्री. मधुकर चव्हाण.....

मराठी भाषेबद्दल किंवा साहित्याबद्दल जे प्रेम बालपणापासून निर्माण व्हावयाला पाहिजे ते न झाल्यामुळे सरकारी आणि न्यायालयाच्या कामकाजामध्ये मराठीचा वापर होण्यामध्ये हळूहळू उदासिनता निर्माण झाली आहे. सभापती महोदय, 1 मे 2oo5 रोजी मराठी भाषिक महाराष्ट्र्र राज्याच्या निर्मितीस 45 वर्षे पूर्ण झाली आहेत. मात्र आज रोजीपर्यन्त महाराष्ट्रातील तालुका व जिल्हा न्यायालयाचे कामकाज पूर्णपणे मराठी भाषेतून होत नाही. तसेच मराठी ही मुंबई उच्च न्ययालयाची " प्राधिकृत भाषा " घोषित झालेली नाही. ही अत्यंत खेदाची व लाजीरवाणी बाब आहे. देशात भाषावार प्रांतरचना झाल्यानंतर अन्य सर्व राज्यांमध्ये त्यांच्या प्रादेशिक / राजभाषेत सदर न्यायालयाचे संपूर्ण कामकाज सुरु आहे. याला महाराष्ट्र राज्याचा अपवाद आहे.

सभापती महोदय, महाराष्ट्र शासनाने दि. 21 जुलै 1998 रोजी एक अधिसूचना काढून तालुका आणि जिल्हा न्यायालयाची कामकाजाची भाषा मराठी भाषा म्हणून घोषीत केली आहे. ही अधिसूचना हा एक कायदा आहे. या अधिसूचनेनुसार या न्यायालयांचे कामकाज फक्त मराठी भाषेतून संपूर्णपणे निकालपत्रासह होणे अनिवार्य आहे. . परंतु या अधिसूचनेची अंमलबजावणी महाराष्ट्र श्ासन व मा. मुंबई उच्च न्यायालय यांचेकडून आज रोजी पर्यन्त झालेली नाही. कार्यवाही महाराष्ट्र शासन आणि माननीय हायकोर्ट यांच्याकडून आजपर्यन्त झालेली नाही. तसेच मराठी भाषा ही महाराष्ट्राची राजभाषा असल्याने भारतीय घटनेच्या अनुच्छेद 348 (2) अन्वये ती उच्च न्यायालयाची प्राधिकृत भाषा घोषित होणे अत्यंत आवश्यक होते. परंतु आजपर्यन्त या बाबत शासनाने कोणतीही पावले उचललेली नाहीत. सर्वसामान्य मराठी जनतेचा या न्यायालयाशी संबंध येत असल्यामुळे सर्व सामान्यांची आज रोजी मोठी कुचंबणा होत आहे. ग्रामीण भागात जी छोटी-मोठी न्यायालये असतात त्या ठिकाणचे कामकाज मराठीतून झाले नाही तर पक्षकारांना, आरोपींना तसेच फिर्यादींना आपल्या केसबद्दल कोर्टामध्ये काय चालले आहे, ते समजत नाही. सभापती महोदय, महाराष्ट्र राज्याची स्थापना 1960 साली असून आज त्याला 45 वर्षे पूर्ण झाली आहेत. हळूहळू मराठी भाषेचा विकास सर्वदूर होणे आवश्यक आहे.

सभापती महोदय, महाराष्ट्र राज्याची स्थापना झाली होती, तेव्हा माननीय यशवंतराव चव्हाण यांनी अतिशय सुंदर असे भाषण केले होते. त्यावेळी त्यांनी असे म्हंटले होते, "प्रशासनाच्या क्षेत्रामध्ये तसेच न्यायालयामध्ये मराठी भाषेचा वापर होणे अत्यंत आवश्यक आहे." माननीय

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर चव्हाण.....

यशवंतराव चव्हाण या देशाचे उपपंतप्रधान असताना त्यावेळी एक परिसंवाद झाला होता. त्यावेळी या परिसंवादामध्ये भारताचे सरन्यायाधिश श्री. चंद्रचूड, मुख्यमंत्री श्री. शरद पवार, मुख्य न्यायाधिश श्री. बा. न. देशमुख, श्री. राजारामबापू पाटील, श्री. सदानंद वर्दे, श्री. भाई वैद्य यांनी भाग घेतला होता. मराठीचा वापर सर्वदूर व्हावा म्हणून तो परिसंवाद झाला होता. सभापती महोदय, त्यावेळचे महाराष्ट्राचे मुख्य न्यायाधिश श्री. बा. न. देशमुख यांनी असे म्हटले आहे की, "कोर्टामध्ये वकीलाला इंग्रजीमध्ये स्वत:चे विचार जर नीट मांडता येत नसतील आणि त्याच्या मनात काय आहे ते मला काढून घ्यायचे असले तर उच्च न्यायालयातील मुख्य न्यायमुर्तीच्या आसनावर बसून मराठीत बोलणारा पहिला न्यायाधीश म्हणून माझे नाव इतिहासात नमूद होईल. ही आत्मस्तुती नाही. मी हे स्वत:साठी करीत नाही. समजते पण सांगता येत नाही. अशा व्यक्तीशी तिच्या भाषेत जर मी बोललो तर तिच्या मनातले मला कळेल आणि मला न्याय करता येईल, या एकाच हेतून मी अधूनमधून मराठी वापरतो." सभापती महोदय, ग्रामीण भागातील दिवाणी तसेच फौजदारी न्यायालयात जे खटले चालतात, त्या ठिकाणी मराठीचा वापर होणे अत्यंत आवश्यक आहे. सभापती महोदय, दक्षिणेकडील राज्ये सोडली तर उत्तर प्रदेश, मध्य प्रदेश किंवा वरील भागातील जी राज्ये आहेत, त्या ठिकाणी त्यांच्या भाषेतून न्यायालयात कामकाज चालते. सभापती महोदय, आज शाळेत जाणारी जी मुले आहेत किंवा जी पुढील पिढी आहे, तिचा विचार आपणाला करावा लागेल. आज ही मुले आपल्या आईकडे ऊसाचा रस मागण्याऐवजी ऊसाचे पाणी मागत असतात. सभापती महोदय, आपण यापूर्वी एक जाणीवपूर्वक निर्णय घेतला आहे.

(यानंतर श्री. सरफरे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर चव्हाण....

त्याठिकाणी भारतीय राज्यघटनेच्या अनुच्छेद 348(2) अन्वये मुंबई न्यायालयाची प्राधिकृत भाषा मराठी असणे अत्यंत आवश्यक आहे. आपण त्याठिकाणी जो निर्णय घेतला आहे त्याची अंमलबजावणी प्रभावीपणे करणे अत्यंत आवश्यक आहे. आणि त्याचप्रमाणे महाराष्ट्र शासनाने स्वत:च जुलै 1998 मध्ये तालुका व जिल्हा न्यायालयाच्या कामकाजाची भाषा मराठी असणे अत्यंत आवश्यक आहे अशी अधिसूचना काढली आहे. परंतु मला असे वाटते की, त्याठिकाणी शासनाने आग्रहपूर्वक त्याची अंमलबजावणी करणे अत्यंत आवश्यक आहे. याचे कारण मराठी भाषा ही अतिशय समृध्द भाषा आहे. मराठी भाषेमध्ये साहित्य अतिशय समृध्द आहे. मराठी भाषेमध्ये अनेक कवि होऊन गेले. इंग्रजी भाषेला अनेक पर्यायी मराठी शब्द आज सुध्दा कायद्यामध्ये वापरता येतात. अनेक प्रकारच्या शब्दकोषांमध्ये सुध्दा मराठी शब्दांचे आग्रहपूर्वक संशोधन केले आहे. आज सरकारी परिपत्रके निघतात त्यामध्ये काही वेळेस क्लिष्ट शब्द असतात. म्हणून या ठिकाणी या अर्धा तास चर्चेच्या माध्यमातून शासनाला विनंती करतो की, मराठी भाषेचा वापर तालुका व जिल्हा न्यायालयाच्या कामकाजामध्ये आग्रहपूर्वक केला पाहिजे. तो केला जात नसल्यामुळे आजच्या आपल्या पिढीपासून सर्वदूर मराठीचा नाही, परंतु इंग्रजीचा वापर अत्यंत आग्रहपूर्वक आपण करीत असतो. जणू काही इंग्रजीच आपली मातृभाषा आहे. जगामध्ये इंग्रजी भाषेचा वापर केवळ युरोप खंडामधील भाषा म्हणून होत असतो. परंतु आज परदेशामध्ये सुध्दा तेथील न्यायालयांचे कामकाज हे त्यांच्या - त्यांच्या भाषेमधून चालत असते. म्हणून मला असे वाटते की, मराठी ही अतिशय समृध्द भाषा आहे. या भाषेचा आपल्याला अभिमान आहे. या मराठी भाषिक राज्यासाठी 105 हुतात्म्यांचा बळी गेला आहे. मराठी राज्याची आर्थिक प्रगती हा विषय या ठिकाणी नाही. केवळ सवंग लोकप्रियतेसाठी आपण निर्णय घेऊन त्याची अंमलबजावणी करतो. लोकाग्रहासाठी आपण काही निर्णय घेतो, लोकानुरंजनासाठी काही निर्णय घेतो. काही वेळेला लोकांमध्ये झालेल्या असंतोषातून आपण निर्णय घेतो. परंतु मराठीचा वापर विशेषत: न्यायालयामध्ये चांगल्या प्रकारे झाला पाहिजे असे मला वाटते. नाहीतर न्यायालयामध्ये आज कोणते कामकाज झाले हे मला कळलेच नाही, आजकाल दुभाषा नेमावा लागतो. म्हणून माझा आग्रह आहे की, या वर्षापासून मराठी भाषेचा वापर तालुका न्यायालयापासून उच्च न्यायालयामध्ये टप्प्या टप्प्याने कसा होईल आणि आपण घेतलेल्या निर्णयाची अंमलबजावणी कशी होईल हे पाहिले पाहिजे. नाहीतरी काही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर चव्हाण...

निर्णय आपण लोकांच्या समाधानासाठी घेतो. सभागृहामध्ये उत्तर देण्यासाठी घेतो. लोकांच्या मोर्चासमोर जातांना त्यांचे समाधान करण्यासाठी घेतो. मते मागण्यासाठी जातांना आपण वचने देतो आणि त्याप्रमाणे निर्णय घेतो. अशावेळी आपणच घेतलेल्या निर्णयाची आग्रहपूर्वक अंमलबजावणी आपण केली नाहीतर आपणच आपल्या या मराठी भाषेचा कुठेतरी अपमान करीत आहोत. ती हळू हळू मृत होत चालली तर तिला अधिक मृतावस्थेमध्ये कसे ढकलीत आहोत असा त्याचा अर्थ होईल. म्हणून मला असे वाटते की, आपण घेतलेल्या निर्णयाची अंमलबजावणी करण्यासाठी मराठी भाषेचा वापर, तालुका व जिल्हा न्यायालयाच्या स्तरावर चांगल्या प्रकारे, योजनापूर्वक व्हावा. निदानपक्षी सरकारी वकील, सरकारी अभियोक्ते आहेत त्यांना तरी आपण तुम्ही त्याठिकाणी मराठीचा वापर करणे अत्यंत आवश्यक आहे असे सांगितले पाहिजे. अशाप्रकारे मी आपल्या माध्यमातून शासनाला विनंती करतो. जीवनाच्या सर्व क्षेत्रात मराठी भाषेचा उत्कर्ष व विकास होण्यासाठी तसेच महाराष्ट्रामध्ये तालुका व जिल्हा न्यायालयाच्या कामकाजाची भाषा म्हणून मराठी भाषेचा वापर अधिक प्रभावीपणे करण्यासाठी मराठी ही न्यायालयीन कामकाजाची भाषा म्हणून घोषित करावी अशी विनंती करुन माझे भाषण संपवितो.

धन्यवाद.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हसन मुश्रीफ (शालेय शिक्षण राज्यमंत्री) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. मधुकर चव्हाण यांनी जिल्हा व तालुका न्यायालयामध्ये मराठीचा वापर करावा यासाठी अर्ध्या तासाची चर्चा उपस्थित केली आहे. 30 एप्रिल 1966 पासून 1989, 1993, 1998 आणि 2000 साली आपण विविध अधिसूचना काढल्या आहेत. व शासनाने निर्णय घेतला आहे. मुख्य न्यायाधीश यांची माननीय मुख्यमंत्र्यांसमवेत बैठक झाली. त्यामध्ये जिल्हा व तालुका न्यायालयामध्ये मराठीचा वापर करण्याच्या दृष्टीने त्यांनी प्रयत्न सुरु केले आहेत. यापूर्वी सुध्दा या सर्व न्यायालयांमध्ये मराठीतून आर्ग्युमेंट करावयास कोणतीही बंद नव्हती. तिला परवानगी आहे.

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हसन मुश्रीफ . . . .

परंतु जे न्यायमूर्ती निर्णय देतात, त्यासाठी इन्फ्रास्ट्रक्चर नाही ही त्यांची तक्रार आहे. म्हणून 30 न्यायालयात ताबडतोब मराठीत कामकाज सुरु व्हावे म्हणून आम्ही आता स्टेनोग्राफरची पदे निर्माण करीत आहोत. या 30 न्यायालयांची नावे उच्च न्यायालयाने सांगावयाची आहेत. त्यासाठी त्यांच्याकडे अनेक वेळा म्हणजे दि.7-4-2001, दि.7-3-2002, दि.7-5-2002, दि. 16-7-2003, दि.27-4-2004 आणि दि.29-6-2005 रोजी पत्रव्यवहार केलेला आहे. आता पुन्हा माननीय मुख्यमंत्र्यांनी उच्च न्यायालयाच्या न्यायमूर्तींना समक्ष भेटून विनंती केलेली आहे की, त्यांनी ताबडतोब या 30 न्यायालयांची नावे द्यावीत आणि तसे करण्यासाठी शासन कटीबध्द झालेले आहे. यामध्ये कितीही अडचणी असल्या तरी, ज्याचा सन्माननीय सदस्यांनी उल्लेख केला आहे. मराठी भाषा समृध्द आहे. मराठीचा वापर सर्वदूर झाला पाहिजे आणि मराठी ही अशी भाषा आहे की, जी प्रभावीपणे मांडता येते. म्हणून प्रायोगिक तत्ववर या 30 न्यायालयात स्टेनोग्राफर दिल्यानंतर, सध्या तेथे जे स्टेनोग्राफर आहेत, ते इंग्रजी आहेत. अशा वेळी ज्यांना मराठी स्टेनोग्राफी येते, त्यांना एक वेतनवाढ देऊन याचे काम करावयास सांगावयाचे, असे 30 न्यायालयात प्रायोगिक तत्वावर करावयाचे आहे आणि या 30 न्यायालयांची नावे उच्च न्यायालयाकडून येणे बाकी आहे. त्यानंतर लवकरात लवकर करणार आहोत. याठिकाणी मराठीच्या टायपिंग मशिनच्या बाबतीत अडचण आहे. पण आमचे प्रस्ताव अंतिम टप्प्यात आले आहेत. सन्माननीय सदस्यांनी उच्च न्यायालयाच्या संदर्भात उल्लेख केला आहे. परंतु भारताच्या संविधानाच्या 348 (2) मध्ये उच्च न्यायालयात प्रादेशिक भाषेचा वापर करावयाचा असेल तर माननीय राज्यपाल हे माननीय राष्ट्रपतींच्या संमतीने तसे करु शकतात. त्यासाठी उच्च न्यायालयाचे अभिप्राय आवश्यक आहेत. शासनाने उच्च न्यायालयात मराठीचा वापर करण्यासाठी त्यांच्याकडून अभिप्राय मागविले आहेत, परंतु ते प्रलंबित आहेत, त्यांनी अजून अभिप्राय दिलेले नाहीत.

श्री.दिवाकर रावते(खाली बसून) : अभिप्राय कधी मागविले ?

श्री.हसन मुश्रीफ : सभापती महोदय, दि.16-7-2003 रोजी अभिप्राय मागविले आहेत. पण त्यामध्येही अनेक अडचणी आहेत. उच्च न्यायालयातील अनेक न्यायाधीश अनेक राज्यांतून आलेले असतात. त्यामुळे त्यांना मराठी भाषा येणे आवश्यक आहे. विशेषत: उच्च न्यायालयाचे निकाल असतात, जे रेफर केले जातात, त्याचे सायटेशन इंग्रजीत असते.तसेच आपण

. . . .2 व्ही-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हसन मुश्रीफ . . . .

एल.एल.बी.ची डिग्री इंग्रजीतच घेतो, त्याची पुस्तकेही इंग्रजीतच असतात. त्यामुळे उच्च न्यायालयात करणे अवघड आहे. ही गोष्ट अनेक वेळा उच्च न्यायालयाच्या न्यायाधीशांनी माननीय मुख्यमंत्र्यांच्या लक्षात आणून दिली आहे. परंतु शासनाने तालुका व जिल्हा न्यायालयात मराठीचा वापर करण्याचे ठरविले आहे आणि ते तत्वत: मान्य केले आहे. त्यासंबंधात शासनाची इन्फ्रास्ट्रक्चरच्या बाबतीत आणि इतर सर्व तयारी झालेली आहे. हे मराठी भाषिकांचे राज्य आहे आणि या दोन्ही न्यायालयांमध्ये मराठीचा वापर व्हावा यासाठी शासन कटीबध्द आहे याचा मी पुनरुच्चार करतो आणि तसे लवकरात लवकर करण्यासाठी शासन निश्चितपणे पावले टाकेल असे अभिवचन देऊन मी माझे मत संपवितो.

. . . .2व्ही-3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर चव्हाण : सभापती महोदय, 2 ऑक्टोबर या विशिष्ट तारखेपर्यंत हे करणार आहात का ? तसेच मघाशी माननीय मंत्री महोदयांनी सांगितले की, दि.16-7-2003 रोजी उच्च न्यायालयाकडून अभिप्राय मागविले आहेत. तर त्यानंतर याबाबतीत त्यांना स्मरणपत्रे पाठविली आहेत का ?

श्री.हसन मुश्रीफ : सभापती महोदय, एकूण सात रिमांडरपत्रें पाठविली आहेत.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, याठिकाणी माननीय मंत्री महोदयांनी शासनाची इच्छा सांगितली की, आम्हाला तातडीने मराठी करण्याची इच्छा आहे. आपली ही इच्छा आमच्याकडे प्रदर्शित करावयाची असेल तर मुंबई हाय कोर्टाच्या बाहेर पाटीवर "बॉम्बे हाय कोर्ट" असे लिहीलेले आहे, ते तरी लवकरात लवकर "मुंबई हाय कोर्ट" असे करावे. म्हणजे याबाबतीत तसे करण्याची आपली इच्छा आहे हे आम्हाला कळेल.

श्री.हसन मुश्रीफ : सभापती महोदय, जेथे "बॉम्बे हाय कोर्ट" असे लिहीलेले असेल, तेथे हाय कोर्टाच्या बाहेर "मुंबई उच्च न्यायालय" असे केले जाईल.

डॉ.नीलम गो-हे : सभापती महोदय, कोर्टाच्या बाबतीत प्रशासकीय स्वरुपाच्या त्रुटी सांगितल्या आहेत की, सध्या तेथे इंग्रजी भाषेचे स्टेनोग्राफर आहेत. नवीन माणसे मिळत नाहीत. तसेच मराठी भाषेचे स्टेनोग्राफर मिळत नाहीत असे आपल्याला उच्च न्यायालयाने उत्तर दिलेले आहे का ?

श्री.हसन मुश्रीफ : सभापती महोदय, तसे काही सांगितलेले नाही. फक्त पदे भरा असे सांगितले आहे.

यानंतर श्री.किल्लेदार . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी : महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे सदस्य, लेखा अधिकारी, प्रशासकीय अधिकारी यांनी संगनमताने केलेला अनावश्यक खर्च .

मु.शी. : महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे सदस्य, लेखा अधिकारी, प्रशासकीय अधिकारी यांनी संगनमताने केलेला अनावश्यक खर्च याबाबत श्री.विनोद तावडे, वि.प.स. यांनी उपस्थित केलेली अर्धा-तास चर्चा.

श्री.विनोद तावडे (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 92 अन्वये पुढील विषयावर अर्धा-तास चर्चा उपस्थित करतो :-

"महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे सदस्य डॉ.बोराळकर, लेखा अधिकारी, श्री.चंद्रबळी पांडे, प्रशासकीय अधिकारी, श्री.एस.आर.बनाटे यांनी संगनमताने मंडळाच्या अनावश्यक असलेल्या प्रस्तावांना मंजुरी देऊन सन 2004-2005 या वर्षात कार्यालयाचे सुशोभिकरण, प्रयोगशाळा सामुग्री व उपकरणांची 3 कोटींची खरेदी खर्च विचारात न घेता करणे, महापे येथील मध्यवर्ती प्रयोग शाळेचे 10 वर्षापूर्वी भूमीपूजन झाले असताना पुन्हा भूमीपूजन करुन भूमीपुजनाच्या खर्चावर 25 लाख रुपयांची उधळण करणे, आवश्यक नसताना 125 कर्मचाऱ्यांची कंत्राटी पध्दतीवर नेमणूक करणे, लाखो रुपये जाहिरातीवर खर्च करणे, मोटारगाड्या खरेदीवर व विमानप्रवासावर अनावश्यक खर्च करणे अशाप्रकारे शासनाच्या 40 कोटी रुपयांच निधीचा अपव्यय करणे, या सर्व बाबींबाबत चौकशी करण्याकरिता मंडळाचे सदस्य श्री.विजयभाऊ कुडतरकर यांनी व श्री.शाम म्हात्रे, अध्यक्ष, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ कर्मचारी संघटना हे गेल्या वर्षापासून आजतागायत सातत्याने मुख्यमंत्री, पर्यावरण मंत्री यांचकडे मंडळाच्या कारभाराची त्वरेने चौकशी करुन लेखी निवेदन देऊनही अद्याप चौकशी न करणे, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही."

सभापती महोदय, सन्माननीय मंत्री गणेश नाईक साहेब आता आलेले आहेत, त्यामुळे मा.राज्यमंत्री श्री.रविशेठ पाटील यांनी सुटकेचा निश्वास सोडलेला दिसतो. कोणाच्या खांद्यावर कोणाचे ओझे असे त्यांना वाटत असावे. ब-याचवेळा ही चर्चा पुढे ढकलली गेलेली आहे. नागपूरच्या अधिवेशनापासून सातत्याने ही चर्चा पुढे गेली. खरे म्हणजे या विषयावरील चर्चा मोठयाप्रमाणावर वर्तमानपत्रातून झालेली आहे. खरे म्हणजे प्रामाणिकपणे तेथील कर्मचाऱ्यांनी आणि त्या ठिकाणी जे सदस्य म्हणून होते, ते सत्ताधारी राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे होते,माजी नगरसेवकही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ KGS/ MAP/

श्री.विनोद तावडे (पुढे सुरु.....

होते त्यांनी काही आक्षेप घेतलेले आहेत. ज्या व्यक्ती त्या ठिकाणी स्थानापन्न आहेत त्यांच्याबाबतीतील मुद्दे उपस्थित केलेले आहेत. त्या आठ मुद्यांपैकी दोन मुद्दांमध्ये काही तथ्य नाही असे समजून सोडून दिले तरी सहा मुद्यांच्याबाबतीत वारंवार माझी सदस्यांचे, कर्मचारी संघटनेचे, आमदारांचे, पत्रकारांचे काही म्हणणे असेल तर त्याबाबतची चौकशी करण्यास मंत्रीमहोदय का कचरतात हे कळत नाही. मंत्री महोदयांनी मोकळेपणाने खात्याच्या सचिवांशी, उप सचिवांशी या प्रकरणी चर्चा करुन फाईलवरील रिमार्क वाचले असतील तर त्याबाबतीतील त्यांचे मत स्पष्ट झालेले असेल. काही विशिष्ट अधिकाऱ्यांना पाठीशी घालण्याचे कारण काय आहे ? सन्माननीय मंत्री श्री.गणेश नाईक साहेब हे धडाडीचे मंत्री आहेत ते अशाप्रकारचा विषय उचलून धरतात. उपस्थित केलेल्या आठ मुद्यांपैकी दोन मुद्दे बरोबर नसतील तरी बाकीच्या सहा मुद्यांच्या संबंधात कर्मचाऱ्यांशी चर्चा करायला काय हरकत आहे ? राष्ट्रीय नेते मा.शरद पवार यांच्या एका कार्यक्रमामध्ये मा. उप मुख्यमंत्री श्री.आर.आर.पाटील यांनी प्रदूषण नियंत्रण मंडळातील प्रदूषण दूर केले पाहिजे असे सांगितले. अशाप्रकारचा प्रामाणिकपणे सातत्याने या विषयाच्या संबंधाने प्रश्न उपस्थित केला जात असेल तर त्याची दखल घेतली पाहिजे. त्या प्रकरणामध्ये गंभीर गोष्टी घडल्या नसतील असेही चौकशीमध्ये कदाचित आढळून येईल. परंतु अशाप्रकारचा सातत्याने विषय लावून धरला जातो त्यावेळेस त्यामधील तीव्रता तपासण्यासाठी अशा वरिष्ठ अधिकाऱ्यांची चौकशी करण्यास मागे का ? असा प्रश्न पडतो.

यानंतर कु.थोरात.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SMT/ MAP/ KGS/ प्रथम श्री. किल्लेदार..... 18:25

श्री. विनोद तावडे....

कारण जे प्रश्न उपस्थित केले आहेत त्याला कायद्याच्या भाषेत वेगवेगळी उत्तरे सुध्दा काय तयार झालेली आहेत, याचाही मला अंदाज आहे.यासंदर्भात मला जे महत्वाचे मुद्दे मांडावयाचे आहेत ते असे की, तीन कोटी रुपयांची प्रयोगशाळेसाठी उपकरणे खरेदी केलेली आहेत. ही खरेदी आवश्यक होती का? ती सामुग्री अजूनही खोक्यांमध्ये न उघडता तशीच पडलेली आहे.अशा ब-याच गोष्टी आहेत. त्यातील संगणक खरेदीसंबंधीचा एक आक्षेप मी माझ्या अर्धा-तास चर्चेमध्ये लेखी मांडलेला आहे.त्यासंदर्भात स्वाभाविकपणे काही तरी उत्तर येईल. पण दिनांक 15 मार्च, 2005 ला संघटनेच्या पदाधिका-यांबरोबर माननीय सदस्य सचिव यांची जी बैठक झाली, त्यामध्ये त्यांनी मान्य केलेले आहे की, "संगणकासोबत आलेल्या हार्डवेअर्स व सॉफ्टवेअर्समध्ये गैरव्यवहार होत असल्याचे स्पष्ट केले. शासनाच्या दरपत्रकानुसार घेतल्याने मंडळाला पडणारा नाहक आर्थिक भूर्दंड सोसावा लागेल असे निदर्शनास आणून दिले.तर हा झालेला घोटाळा शोधून काढण्यासाठी संगणक तज्ञांची नेमणूक करण्याचा निर्णय घेण्यात येईल, तसेच याबाबत जबाबदार असणा-यावर कठोर कारवाई करण्यात येईल" असे आश्वासन सदस्य सचिवांनी स्वत: दिलेले आहे. काही तरी होत असेल असे त्यांना वाटले असेल म्हणून त्यांनी असे आश्वासन दिलेले आहे. पण आता बहुतेक मंत्रिमहोदय, उत्तर देतील की, त्यात तसे काही नाही.

श्री. गणेश नाईक (बसून) : आता आपल्याला जे काही अरोप करावयाचे असतील ते आरोप आपण करा. माझे उत्तर झाल्यानंतर आपल्याला जे बोलायचे ते बोला.

श्री. विनोद तावडे : आपण यावर एवढे टची होऊ नका. एखाद्याने काही मदत केली असेल तर त्याला पुन्हा मदत करण्याचा श्री. गणेश नाईक साहेबांचा स्वभाव आहे. मी माझ्यासंबंधी बोलत आहे.बाकी कोणाबद्दल बोलत नाही.

सभापती : सन्माननीय सदस्यांनी विषयावर बोलावे.

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, माझ्या अर्धा-तास चर्चेच्या निमित्ताने ज्या गोष्टी उपस्थित केलेल्या आहेत, त्यामध्ये प्रयोगशाळेतील उपकरणांची खरेदी, हा जसा एक भाग महत्वाचा आहे. तसेच त्या ठिकाणच्या कार्यालयातील सुशोभीकरण आहे. सभांजीनगर, औरंगाबदच्या कार्यालयाचे 44 लाख रुपयाचे अंदाजपत्रक होते. त्या कार्यालयाचा सुशोभीकरणाचा

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SMT/ MAP/ KGS/ प्रथम श्री. किल्लेदार..... 18:25

श्री. विनोद तावडे....

खर्च 75 लाखावर गेला. तो खर्च 75 लाखावर कां गेला? याची चौकशी न होता, त्याचे पेमेंट झाले. सदस्य सचिव आणि कर्मचा-यांच्या बैठकीच्या मिनिट्समध्ये त्याचा उल्लेख अशा पध्दतीने करण्यात आलेला आहे की, "जर ती कामे कमी झाली असतील तर, संबंधित ठेकेदाराकडून पुन्हा समाधानकारक कामे करु न घेतली जातील".मग 75 लाख रुपयांचे पेमेंट कां केले ? कोणाच्या परवानगीने केले ? तो ठेकेदार कसा निवडला, याच्या खोलात मी जाणार नाही. अर्जन्सी असते, इमर्जन्सी असते, भव्य काही तरी केले पाहिजे, आता एकदम ओपन इकॉनॉमिक मनी, मल्टीनॅशनलशी डिल करावयाचे असते हे सगळी जी काही करणे असतील ती मी समजू शकतो. पण त्यामध्ये सदस्य सचिवांनी मान्य केलेले आहे की, अशा प्रकारे असमाधानकारक आहे नां? मग आम्ही ते काम पुन्हा करुन घेतो. शासनाच्या परवानगीशिवाय प्रत्येकी 35 लाखाचे घनकचरा विल्हेवाट अनुदान देण्यासाठी पाच नगरपालिका निवडल्या. कशाच्या आधारे या नगरपालिकांची निवड केली? त्यासाठी निकष काय लावले?कुणाला खुष करण्यासाठी ते निकष लावले? त्यातील ज्या गोष्टींची किमान पूर्तता करावयाची होती, ती पूर्तता त्या नगरपालिकांनी केली होती काय? ती पूर्तता केली नसेल तर त्याचे काय झाले? म्हणजे मंडळाने आर्थिकदृष्टया सक्षम नसलेल्या आणि "क" वर्गात मोडणा-या नगरपालिकांना अनुदान न देता फक्त बारामती, मुरुड-जंजिरा, अंबड, नवापूर, सोनपेठ यांनाच अनुदान कां दिले? नवापूर नगरपरिषदेला 35 लाख म्हणजे शंभर टक्के अनुदान कां दिले?

यानंतर श्री.बरवड.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे .....

असे काही प्रश्न यामध्ये आहेत की, जे स्वाभाविकपणे उपस्थित होतात. याची जी काही कारणे असतील ती पुढे आली पाहिजेत. अर्धा-तास चर्चेमध्ये सगळे पुरावे, सगळी कागदपत्रे घेऊन विषय मांडणे शक्य नसते. त्यामुळे त्याचा केवळ उल्लेख होत असतो. बाजार भावापेक्षा दुप्पट दराने नांदेड, कल्याण, सायन या ठिकाणी जागा खरेदी करणे हा एक मुद्दा यामध्ये आहे. नांदेडचे सन्माननीय सदस्य या ठिकाणी उपस्थित आहेत. तेवढयासाठीच ते पक्षाची बैठक सोडून या ठिकाणी थांबलेले आहेत. त्यांना या गोष्टीचे महत्व माहीत आहे. मी त्यांचे अभिनंदन करतो. प्रदुषण मंडळाचे प्रदुषण दूर करणे यासाठी पक्षाच्या बैठकीचा त्याग करुन या ठिकाणी बसणे किती महत्वाचे आहे हे त्यांना माहीत आहे. सभापती महोदय, सायन येथील मुख्यालयात 150 कर्मचाऱ्यांसाठी 6683 चौरस फूट जागा आहे. कल्याण येथे 35 कर्मचाऱ्यांसाठी 12,270 चौ. फूट जागा आहे आणि नांदेड येथे फक्त 5 कर्मचाऱ्यांसाठी 4150 चौ. फूट जागा आहे. पूर्वीच्या जागा मालकांने जागा सोडण्याचा तगादा लेखी स्वरुपात केला होता काय ? मग नवीन जागा का घेतली हे माहीत नाही. असे अनेक प्रश्न तेथील लोकांच्या मनात आहेत. पाच कर्मचारी आणि एवढी मोठी जागा कशासाठी ? हे केल्यामुळे कोणाला फायदा झाला ? सभापती महोदय, प्रयोगशाळेच्या बांधकामाचे भूमिपूजन दोन वेळा झाले. त्यावर 25 लाख रुपये खर्च झाला. सुरुवातीला एकदा भूमिपूजन झाले होते. श्री. शरद पवार यांना नवी मुंबईमध्ये आणावयाचे म्हणून पुन्हा एकदा भूमिपूजन झाले असेल. ते होण्यास हरकत नाही. एखाद्या पक्षाचा नेता चांगले काम करतो, त्याला आणणे हे स्वाभाविक असू शकते. त्या कार्यक्रमावर 25 लाख रुपये खर्च झाला. त्या कार्यक्रमासाठी आलेल्या लोकांना प्रदुषणाचे महत्व पटवून देण्यासाठी प्रदर्शन लावले होते. त्या कार्यक्रमावर 25 लाख रुपये खर्च झाले. हे पुन्हा कशासाठी ? त्याची काय गरज होती ? हा जो अनावश्यक खर्च होत गेला, तो खर्च करण्याची जी गरज पडली त्यासाठी जे आवश्यक अधिकारी असतील त्या अधिकाऱ्यांना बढती देणे यामध्ये आपल्या संबंधातील श्री. डोके, श्री. मोहेकर यांना त्यांच्या पुढच्या पाच जणांना डावलून प्रादेशिक अधिकारी पदावर पदोन्नती देण्यात आली. श्री. देशमाने आणि श्री. बावणे यांना उपप्रादेशिक अधिकारी पदावर नियमबाहय बढती देण्यात आली. त्याचाही मुद्दा उपस्थित केला आहे. प्रदुषण नियंत्रण मंडळाच्या महाराष्ट्रातील सर्व कार्यालयांमध्ये याची चर्चा होत

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KGS/ MAP/

श्री. विनोद तावडे .....

असते. असे नियम डावलून आपल्या मर्जीतील, आपल्याला साथ देतील, आपल्या बरोबर येतील असे अधिकारी त्या ठिकाणी नेमत जाववयाचे, ज्येष्ठताक्रम डावलून त्यांना त्या ठिकाणी आणत जावयाचे ही पध्दत चालू झाली. मग किचन कॅबिनेट, आतल्या आत दोन चार लोकांनी जमून निर्णय घेणे, त्यातून त्याची पारदर्शकता संपणे हे सर्व यातून निर्माण झाले. जाहिरातीचा खर्च वाढला. बोर्ड हे राज्य शासनाचा भाग नाही हे मला मान्य आहे. याचा अर्थ एकदम मार्केट रेटप्रमाणे आणि कोणत्या संस्थेमार्फत आणि कशा पध्दतीने याची जाहिरात द्यावयाची ? ही प्रदुषण नियंत्रण मंडळाची जाहिरात आहे की, विशिष्ट प्रकारचा जनसंपर्क वाढविण्यासाठी आणि प्रदुषण नियंत्रण मंडळातील ज्या बातम्या येतात त्या बातम्यांना कोठे तरी थोडीशी बगल देण्यासाठी असा प्रयत्न होता काय आणि त्या निष्कर्षावर या जाहिराती दिल्या गेल्या काय ? कारण तशी चर्चा आहे. याला जाहिरात दे नाही तर हा उद्या बातमी छापेल आणि मग भानगड नको. पण सगळेच पत्रकार असे नसतात. परंतु तसा प्रयत्न तेथे होताना दिसला. त्याची चर्चा त्या पध्दतीने त्या त्या वेळी केली गेली. अध्यक्ष महोदय, कोर्टाचा निर्णय नसताना मोठमोठया कंपन्यांना विशिष्ट प्रकारची सवलत देणे याबाबतचाही मुद्दा आहे. वेगवेगळी वाहने, आवश्यकतेपेक्षा अधिक वाहने खरदी करणे, विमान प्रवासाचा अधिक खर्च अशा या आर्थिक गैरव्यवहाराशी संबंधित अनेक गोष्टी या ठिकाणी चर्चेमध्ये आहेत. मग नवीमुंबई महापालिकेला कोणी मदत केली का ? अशा विषयामध्ये मी जात नाही. वरच्या सभागृहामध्ये अशा बाबीमध्ये जाणे योग्य नाही.

यानंतर श्री. खंदारे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनाद तावडे....

परंतु मी आपल्यामार्फत मंत्रिमहोदयांना विनंती करतो की, गेले वर्ष आणि या दरम्यान प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या या कामाची खूप चर्चा चालू आहे. ही चर्चा याठिकाणी झाली तरी तुम्हाला उत्तर तयार करुन देणा-या या खात्याच्या प्रशासकीय अधिका-यांबरोबर मोकळेपणाने चर्चा करावी. कारण ती चर्चा येथे उत्तर देऊनही संपणार नाही. ही चर्चा संपविण्याची मा.मंत्रिमहोदयांची प्रामाणिक इच्छा असेल तर न्यायाने जाऊ या असे माझे म्हणणे आहे. आपण एखादा चांगल्या सनदी अधिका-यांमार्फत याची चौकशी करावी. त्यामुळे वास्तव काय आहे ते समोर येईल. दूध का दूध, पानी का पानी हे बाहेर येऊ द्या. परंतु ते झाकण्याचा कशासाठी प्रयत्न करता ? मग कोणी तरी म्हणते की, अमूक एका केंद्रीय नेत्यांनी त्यांचे आहेत म्हणून त्यांना येथे आणले आहे, या मंडळाचे काम पारदर्शकपणे चालले आहे अशी त्यांची बाहेर बाजू लावून धरत आहात त्याऐवजी थर्ड पार्टी चौकशी झाल्यानंतर सगळया गोष्टी स्पष्ट होतील. त्यामध्ये अधिकारी आहेत, कर्मचारी आहेत, संबंधित कंपन्यातील लोक आपले म्हणणे तेथे मांडतील. ते कोठे तरी करावे. जर या सगळया विषयाची चौकशी मा.मंत्रिमहोदयांनी मान्य केली तर या सगळया चर्चेला पूर्णविराम मिळेल आणि कोठे तरी न्यायाने काही करण्याचा प्रयत्न करीत आहेत, ही जी प्रतिमा मा.मंत्रिमहोदयांची आहे ती प्रतिमा वाढण्यासाठी त्याचा उपयोगही होईल एवढी विनंती करतो आणि याठिकाणी थांबतो.

2...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ KGS/ MAP/

श्री.गणेश नाईक (उत्पादन शुल्क व पर्यावरण मंत्री) : सभापती महोदय, मा.सदस्य श्री.विनोदजी तावडे यांनी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या संदर्भात ही अर्धा तास चर्चा उपस्थित केलेली आहे. त्यांनी मंडळाच्या काही अधिका-यांच्या नावाचा उल्लेख करुन त्यांनी विविध बाबींवर मनमानी खर्च केल्याचे म्हटले आहे. त्याची खास माणसाची नेमणूक करुन चौकशी करण्याचा निर्णयाप्रत यावे अशी आपल्यामार्फत विनंती केलेली आहे. परंतु सर्व बाबी लक्षात घेतल्या पाहिजेत. मा.सदस्य श्री.विनोदजी तावडे यांनी कार्यालयाचे सुशोभिकरणाच्या अनुषंगाने झालेला खर्च अनाठायी आहे, अनावश्यक आहे किंवा अधिक झाला आहे असा आरोप केलेला आहे. त्यासंदर्भात माझे एवढेच सांगणे आहे की, मंडळाच्या बैठक क्र.125 नुसार दि.31.10.99 रोजी कार्यालयाचे टप्प्याटप्प्याने सुशोभिकरण करण्याचे ठरविले. त्याठिकाणी फर्निशिंग कमिटी गठित करण्यात आली. त्यानंतर दि.5.5.2001 नंतर त्या कमिटीने काम करण्यासंबंधी वास्तुविशारदचे अर्ज वृत्तपत्रात जाहिरात देवून मागविले. सदर अर्जांची छाननी मुख्य आरेखक, एमआयडीसी यांच्यामार्फत करण्यात आली आहे. म्हणजे प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या बाहेरची ॲथोरिटी त्याठिकाणी कार्यरत होती. सुशोभिकरण करण्याच्या कामासाठी दिनांक 22.1.2004 च्या मंडळाच्या 139 व्या बैठकीमध्ये निर्णय घेण्यात आला. त्यानंतर फेब्रुवारी, 2004 मध्ये ठेकेदारांकडून निविदा मागविण्यात आल्या होत्या. सर्व निविदांची छाननी करुन एप्रिल, 2004 मध्ये कामासंबंधीचे आदेश देण्यात आले व सर्व काम पूर्ण झालेले आहे. त्याचे क्षेत्रफळ 75,500 चौ.फूट इतके आहे आणि त्यावर 3 कोटी 55 लाख रुपये इतका खर्च करण्यात आलेला आहे. यासाठी शासकीय निकष आहेत. सा.बां.विभागाकडून जी माहिती प्राप्त झाली त्यानुसार त्यांचे दर 400 ते 500 प्रति चौ.फूट असून या कामासाठी मात्र 470 रुपये प्रति चौ.फूट खर्च करण्यात आला आहे म्हणजे हा खर्च अनूचित झाला आहे, अनाठायी झाला आहे असे म्हणणे अनूचित ठरणार आहे. यामध्ये रायगड भवन, नवी मुंबई येथील कार्यालय आहे. ठाणे, पुणे, नाशिक, औरंगाबाद, नागपूर व कोल्हापूर याठिकाणच्या कार्यालयांचा त्यामध्ये समावेश आहे. जगाच्या पाठीवर खुली अर्थव्यवस्थेच्या अनुषंगाने वातावरण निर्माण झालेले आहे. एकेकाळी महाराष्ट्राचे औद्योगिकरणामध्ये संपूर्ण देशामध्ये प्रगत राज्य म्हणून नाव होते. पण मध्यंतरी गुजराथ राज्याने प्रगती केली. आपल्यामध्ये असलेल्या त्रुटींचा फायदा निश्चितपणे अन्य राज्यांनी घेतला.

नंतर श्री.शिगम

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ KGS/ MAP/ पूर्वी श्री. खंदारे 18:40

(श्री. गणेश नाईक पुढे सुरु...)d

आज मल्टी नॅशनल कंपन्या आपल्या राज्यात येऊ पहात आहेत. अशा कंपन्यांचे अधिकारी ज्यावेळी आपल्याकडे येतील त्यावेळी आपल्या शासनाचा, मंडळाचा दर्जा हा आपल्या इभ्रतीला साजेसा असा असावा आणि तशा प्रकारे आपले कार्यालय असावे म्हणून हा खर्च करण्यात आलेला आहे. मा.सदस्य श्री. विनोद तावडे यांनी उपकरणांच्या खरेदीचा विषय याठिकाणी उपस्थित केला. 2 कोटी 4 लाखची प्रयोग शाळा उपकरणे आणि 1 कोटी 4 लाखाची हवा प्रदुषण तपासणी उपकरणे अशी एकूण 3 कोटी 8 लाखाची खरेदी केलेली आहे. प्रदुषण नियंत्रण मंडळाच्या प्रयोगशाळा ह्या नवी मुंबई, ठाणे, चिपळूण, पुणे, नाशिक, औरंगाबाद व नागपूर या ठिकाणी असून खरेदी केलेले साहित्य ह्या प्रयोगशाळांमधून बसविण्याचे ठरविले होते. ही खरेदी करीत असताना मंडळाने एक समिती गठित केलेली होती. त्या समितीमध्ये डॉ. ठक्कर, इंडियन इन्स्टिटट्यूट ऑफ सायन्स, मुंबई, डॉ. पांगारकर, युनिव्हर्सिटी डिपार्टमेंट ऑफ केमिकल टेक्नॉलॉजी या सारखे तज्ज्ञ प्रतिनिधी होते. या तज्ज्ञ समितीने आवश्यक असलेल्या उपकरणांच्या खरेदीचा प्रस्ताव तयार केला. या प्रस्तावास मंडळाच्या दिनांक 22.1.2004 रोजीच्या 139व्या बैठकीत मान्यता देण्यात आली. मंडळाच्या मंजुरी नंतर दैनिक "लोकसत्ता" आणि दै. "टाईम्स ऑफ इंडिया"मधून टेंडर नोटीसा प्रसिध्द करण्यात आल्या आणि त्यानंतर ही खरेदी करण्यात आली. ज्या निविदा प्राप्त झाल्या होत्या त्यांची छाननी तज्ज्ञ समितीने केली होती. त्यामध्ये डॉ. एस.के.गुप्ता, आय.आय.टी.पवई, मुंबई आणि श्री. अे.डी.सावंत, सहसंचालक, शिक्षण विभाग, सेंट्रल स्टोर पर्चेस ऑर्गनायझेशन, महाराष्ट्र राज्य, यांचा समावेश होता. या समितीमध्ये उपकरणे खरेदीचे आदेश देण्यात आले व सर्व उपकरणे मंडळास प्राप्त झाली असून मंडळाच्या विविध प्रयोगशाळांमध्ये ती वापरात आहेत. मा.सदस्यांनी, म्हापे येथील प्रयोगशाळेचे 10 वर्षापूर्वी भूमिपूजन झाले असून आता पुन्हा त्याच कामासाठी 25 लाख रु. खर्च केलेला आहे अशा प्रकरचा उल्लेख केला. सदर खर्च 25 लाख रु. नसून तो 13 लाख 50 हजार रु.इतका झालेला आहे. मी सांगू इच्छितो की, 10 वर्षापूर्वी त्याठिकाणी फक्त भूमिपूजन झाले होते. कामाचा शुभारंभ झाला नव्हता. जो 13 लाख 50 हजार रु. खर्च झाला त्यासंदर्भात मला सांगावयाचे आहे की, त्याठिकाणी विविध कंपन्यांच्या प्रतिनिधींना निंमत्रित केलेले होते. विविध कंपन्यांची एअर पोल्यूशन, वॉटर पोल्यूशन, साऊंड पोल्यूशन

..2..

MSS/ KGS/ MAP/ पूर्वी श्री. खंदारे 18:40

(श्री. गणेश नाईक पुढे सुरु...)

यासंदर्भातील विविध उपकरणांचे प्रदर्शन भरविण्यात आले होते आणि पुस्तिकाही काढलेल्या होत्या. मा.सदस्यांनी, कोणी तरी केन्द्रीय मंत्री ह्या कार्यक्रमासाठी आले होते असा उल्लेख केला. केन्द्रीय कृषी मंत्री मा.श्री.शरद पवारसाहेबांना भूमिपूजनासाठी आंमत्रित करण्यात आले होते. तसेच मा.उपमुख्यमंत्री श्री. आर.आर.पाटील आणि मा. मंत्री महोदय श्री. सुनील तटकरे हे देखील सदर कार्यक्रमास उपस्थित होते. या कार्यक्रमासाठी अधिकारी वर्ग आणि विविध कंपन्यांचे प्रतिनिधी आले होते. साधारणत: दोन-एक हजार लोकांचे गॅदरिंग निर्माण झाले होते. तेव्हा ह्या सर्व गोष्टींसाठी हा खर्च केलेला आहे हे मी कबूल करीत आहे. एकूणच प्रदुषण नियंत्रण विभागासंबंधी मी समाधानी नाही. समाधानी नाही याचा अर्थ भविष्यामध्ये यामध्ये सुधारणा करण्यासाठी आम्ही निश्चितपणे पावले टाकीत आहोत. आवश्यकता नसताना कर्मचा-यांची भरती केली असाही मा.सदस्यांनी उल्लेख केला. या प्रदूषण नियंत्रण मंडळाचा व्याप खूप मोठा आहे. 22 महानगरपालिका, 228 नगरपालिका आणि नगरपरिषदा, महाराष्ट्रातील 53070 कारखाने, इतकी मंडळाच्या कामाची व्याप्ती असून मंडळाचा एकूण कर्मचारी वर्ग 703 इतका आहे. मंडळाकडे असलेल्या वाहनांची संख्या 68 असून वाहन चालकांची संख्या 84 आहे. जलउपकर भरणारे 7020 कारखाने आहेत. वैद्यकीय घनकचरा व्यवस्थापन करणा-या 11 हजार संस्था आहेत. इतका मोठा कामाचा व्याप लक्षात घेता मंडळाकडे वाहने आणि कर्मचारी वर्ग देखील कमी आहे. आता 50 कोटी रु.च्यावर बांधकाम होणार असून ते बांधकाम देखील पर्यावरण अंतर्गत येणार असल्यामुळे कर्मचारी वर्ग अपुरा पडणार असून कर्मचा-यांची संख्या कमी करण्या ऐवजी त्यामध्ये वाढ करण्याची गरज आहे. मा.सदस्यांनी जाहिरातींचा उल्लेख केला. ह्या जाहिराती कसल्या आहेत ?

....नंतर श्री. गिते....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ABG/ MAP/ KGS/ प्रथम श्री.शिगम 18:45

श्री.गणेश नाईक...

सन्माननीय सदस्य श्री. विनोद तावडे यांनी जाहिरातीच्या खर्चासंबंधीचा उल्लेख केला. सभापती महोदय, या जाहिराती कसल्या आहेत याची मी सभागृहास माहिती देऊ इच्छितो. यात जागा खरेदीची जाहिरात, वास्तूविशारदांची नेमणूक, प्रयोगशाळा उपकरणे खरेदी,लोक सुनावणीची जाहिरात, केंद्र शासनाच्या विविध अधिनियमांची जनतेला माहिती व्हावी व न्यायालयाची आदेशाची माहिती व्हावी यादृष्टीने देण्यात आलेल्या जाहिराती, जनजागृती जाहिरात, होळी, गणेशोत्सव आणि दिवाळी या सणांच्या वेळी फटाके वा अन्य ज्वालाग्रही पदार्थ कशा प्रकारे जनतेने हाताळावीत त्यासंबंधीचे मार्गदर्शन करणा-या जाहिराती इत्यादी जाहिरातीवर खर्च करण्यात आलेला आहे. सदर जाहिराती मान्यताप्राप्त संस्थेमार्फत दिल्या आहेत. त्यामुळे दोन-तीन उद्योग समुह एकत्र करुन जाहिराती दिल्या अशातला प्रकार या ठिकाणी झालेला नाही. कोणा पत्रकाराला नजरेसमोर ठेऊन जाहिराती दिलेल्या आहेत अशा प्रकारचे म्हणणे अनुचित आहे. या जाहिरातींवर 70 लाख रुपये खर्च झालेला आहे. या ठिकाणी विमान प्रवास खर्चाचा उल्लेख करण्यात आलेला आहे. या मंडळाकडे एकूण 170 क्षेत्रिय अधिकारी आहेत. सध्या या महामंडळाकडे 60 वाहने असून त्यातील 7 वाहने फिरत्या प्रयोगशाळेसाठी वापरण्यात येत आहेत. गेल्या वर्षी 17 नवीन वाहने घेण्यात आली आहेत. ती वाहने खरेदी करण्यासाठी 70 लाख रुपये खर्च करण्यात आलेला आहे. हवेतील तसेच पाण्यातील घातक पदार्थांचे नमुने घेण्यासाठी स्वत:ची वाहने असणे आवश्यक आहेत. तसेच प्रदूषणाच्या तक्रारींची तातडीने चौकशी करण्यासाठी वाहनांची गरज आहे. या मंडळातील प्रथम वर्ग अधिका-यांना मंडळाच्या कामानिमित्त विमान प्रवास करण्याची सवलत देण्यात आलेली आहे. औरंगाबाद, नागपूर, दिल्ली येथे मंडळाच्या कामासाठी जाण्यासाठी प्रथम वर्ग अधिका-यांना सवलत दिलेली आहे. या अधिका-यांनी प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या कामासाठीच विमान प्रवास केलेला आहे असे स्पष्टीकरण संबंधित अधिका-यांनी दिलेले आहे. या ठिकाणी ज्या काही बाबी उपस्थित केल्या गेल्या आहेत त्याबाबतीत शासनाचे समाधान झालेले आहे. ज्यावेळी शासनाचे स्वत:चे समाधान होते, त्यावेळी बाहेरच्या एखाद्या व्यक्तींची नेमणूक करुन अधिका-यांची चौकशी करण्याची आवश्यकता भासत नाही. मी कोणाच्याही दबावाला बळी पडलेलो नाही आणि पडणारही नाही. सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, आपण स्पेसिफिक आरोप करा. तो आरोप आपण सिध्द करुन दाखविला तर मी त्या अधिका-यास घरी पाठवीन असे या ठिकाणी स्पष्टपणाने आश्वासन-

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.गणेश नाईक...

देऊ इच्छितो. त्यामुळे मला सदर अधिका-यांची चौकशी करण्याची गरजच वाटत नाही. सभापती महोदय, कुठल्याही घटकाने एखाद्या संस्थेविषयी संशय व्यक्त आरोप करणे योग्य नाही असे मला वाटते.या महामंडळात इंटरनल ऑडिटींग करण्यात येत असते, शासनाचे स्पेशल ऑडिटींग होत असते. त्या ऑडीटमध्ये या बाबी तर सुटू शकणार नाहीत. कोणालाही वाटते म्हणून चौकशी नेमा अशी जर मागणी होत असेल तर चौकशी नेमली जाणार नाही. ..

श्री. विनोद तावडे : या सभागृहाचा मी सदस्य म्हणून चौकशीची मागणी केलेली आहे...

सभापती : माननीय मंत्र्यांचे उत्तर पूर्ण झाल्यानंतर आपणास पुन्हा प्रश्न विचारण्याची संधी देईन.

श्री. गणेश नाईक : माननीय सभापती महोदय, बाहेरच्या लोकांनी वृत्तपत्राच्या माध्यमातून यासंबंधीची मागणी केलेली आहे. त्या अनुषंगाने मी बोलतो आहे. सन्माननीय सदस्य हे या सभागृहाचे जबाबदार सदस्य आहेत. त्यांनी अतिशय जबाबदारीने या ठिकाणी मुद्दे उपस्थित केलेले आहेत म्हणून मी त्यांच्या मुद्यांना अनुसरुन उत्तर देत आहे. कोणी ऐ-या गै-यांनी प्रश्न विचारले असते तर उत्तर देण्याची मला गरजच भासली नसती. वृत्तपत्राच्या माध्यमातून कोणी चौकशीची मागणी करीत असतील तर ती मागणी मी मान्य करणार नाही. सन्माननीय सदस्यांनी अधिका-यांच्या चौकशीच्या बाबतीत मागणी केली आहे. परंतु या महामंडळाचे ऑडीट झाले असून त्याबाबतचा अहवाल प्राप्त झालेला आहे. त्या अहवालात गैरव्यवहारासंबंधीचा कुठेही उल्लेख दिसून आलेला नाही. या मंडळातील अधिका-यांनी जर गैरव्यवहार केल्याची बाब माझ्या निदर्शनास आणून दिली तर मी त्या अधिका-याविरुध्द तात्काळ कारवाई करण्यात येईल अशा प्रकारचा शब्द मी या ठिकाणी देऊ इच्छितो. राज्यात अनेक महामंडळे अस्तित्वात आहेत. प्रत्येक महामंडळाची वेगवेगळी कार्यालये आहेत. प्रत्येक महामंडळाच्या अधिका-यांची चौकशी करण्याची मागणी केली तर ती अनुचित ठरणार आहे. अशा चौकशींमुळे शासना विषयी आणि प्रशासना विषयी संशय निर्माण होऊ शकतो. सन्माननीय सदस्यांनी या ठिकाणी सांगितले की, आमचा संशय आहे. यापुढे देखील या महामंडळाचे इंटरनल ऑडीट होईल त्या वेळी कोणा अधिका-याने गैरव्यवहार केल्याचे निदर्शनास आले तर त्या अधिका-याविरुध्द निश्चितपणे कारवाई करण्यात येईल.

3...

ABG/ MAP/ KGS/ प्रथम श्री.शिगम 18:45

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, मी या ठिकाणी प्रयोगशाळेतील उपकरणांचा उल्लेख केला. कार्यरत असलेले सदस्य सचिव येण्यापूर्वी प्रयोगशाळेसाठी आधी जी उपकरणे घेण्यात आली होती. त्या उपकरणांचे बॉक्स अजून फोडण्यात आलेले नाहीत. असे असताना नवीन उपकरणे घेतली आहेत. आधी घेण्यात आलेल्या उपकरणात आणि नव्याने घेण्यात आलेल्या उपकरणात गुणात्मक,दर्जात्मक काय फरक होता याचा माननीय मंत्री महोदयांनी खुलासा करावा. सिकींग फंड हा अतिशय इर्मजन्सीच्या काळात वापरावयाचा असतो. सुशोभिकरण, जागा घेणे यासाठी माननीय सदस्य सचिव यांनी सिकींग फंड वापरला आहे काय असा माझा दुसरा प्रश्न आहे. श्री. पांडे हे मुख्य लेखाधिकारी आहेत. विहित नमूद केलेली अर्हता नसताना तसेच मंत्रालयाची परवानगी नसताना, प्रशासकीय नियमांचा भंग करुन श्री. पांडे यांची त्या ठिकाणी नियुक्ती केली होती काय असा माझा तिसारा प्रश्न आहे. 150 कर्मचारी हे ठेकेदारीवर नेमले आहेत. एखादा कार्यक्षम अधिकारी आला तर कामे करुन घेण्यासाठी कर्मचारी नेमतो. कामे करुन घेण्यासाठी कर्मचारी नेमावेत. नेमण्यास आमची हरकत नाही. परंतु ते कर्मचारी सेवायोजन कार्यालयातून घेतले गेले पाहिजे. ठेकेदारी पध्दतीने बाहेरचे कर्मचारी नेमणे योग्य नाही असे मला नमूद करावयाचे आहेत. मला वाटते की, माननीय मंत्री महोदयांनी कोणत्याही प्रकारचा भावनीक आणि प्रेस्टीजचा प्रश्न करु नये. आपल्या सभागृहात न्याय मिळाला नाही म्हणून कोणी लोकायुक्तांकडे जाऊ शकतात. कोणी जनहित याचिका दाखल करु शकतात. या ठिकाणी त्या लोकांना न्याय मिळाला नाही तर ते लोक न्याय मिळवून घेण्यासाठी तिकडे जाऊ शकतात. सदर लोक तेथे गेल्या नंतर याबाबीची चौकशी केली नाही अशा प्रकारची लक्तरे कोर्टासमोर येऊ शकतात. म्हणून मला असे वाटते की, हा विषय प्रेस्टीजचा न करता माननीय मंत्र्यांनी निर्णय द्यावा अशी आमची अपेक्षा आहे.

यानंतर श्री. कानडे...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. गणेश नाईक : सभापती महोदय, प्रयोगशाळेसाठी जी सामुग्री खरेदी केली त्याबाबत मा. सदस्य श्री. विनोद तावडे यांनी आपली भूमिका मांडली. डॉ. एस.पी.गुप्ता,आय.आय.टी.पवई आणि डॉ.अे.डी.सावंत, सहसंचालक या लोकांची तज्ञ समिती यंत्रसामुग्रीची खरेदी करण्याची परवानगी देते त्यावेळी निश्चितच योग्य प्रकारे खरेदी केलेली आहे. प्रयोगशाळेमध्ये एखाद्या गोष्टीची कमतरता भासत असेल किंवा संशोधन करण्यास बाधा निर्माण होत असेल तेव्हाच अशी खरेदी केली असणार हे निश्चित आहे. सभापती महोदय, पूर्वी पेजर होते,नंतर मोबाईल आले अशा प्रकारे प्रगती होत आहे. काही यंत्रसामुग्री कालबाहय झाली असणार म्हणून नवीन खरेदी केलेली आहे. ज्याप्रमाणे आपण घरामध्ये काही वस्तू घेतो परंतु त्या 100 टक्के वापरल्या जातातच असे नाही. तरीसुध्दा ही बाब तपासून घेतली जाईल. परंतु जी खरेदी केलेली आहे ती तज्ञ लोकांच्या सल्ल्यानुसारच केलेली आहे. दुसरा मुद्दा श्री. चंद्रबळी पांडे आणि श्री.एस.आर.बनाटे यांच्या नियुक्तीबाबत उपस्थित केला आहे. श्री. पांडे यांच्या नियुक्तीला पर्यावरण विभागाने 16.9.2004 रोजी मान्यता दिलेली आहे. श्री. बनाटे यांची प्रशासकीय अधिकारी म्हणून पदोन्नती झालेली आहे. प्रदुषण मंडळाच्या अधिका-यांनी स्वत:हून नियुक्ती केली आहे अशा प्रकारचे आरोप करणे उचित होणार नाही. सिंकींग फंड वापरण्यात आलेला नाही. सेस फंडातून खर्च करण्यात आला आहे. सिंकींग फंड तसाच आहे. दुसरा मुद्दा नोकरभरतीसंबंधी मा.सदस्यांनी उपस्थित केला होता. जी भरती करण्यात आली होती ती तात्पुरत्या स्वरुपाची होती आणि काम संपल्यानंतर त्यांना सेवेतून काढून टाकण्यात आले आहे. मंडळाचा जो कारभार आहे तो पारदर्शक आहे आणि त्याबाबत शासन समाधानी आहे. मा.सदस्य श्री. तावडे यांनी आपल्या भाषणात उल्लेख केला की,कोणी न्यायालयात जाण्याची शक्यता आहे. न्यायालयात जाण्यासाठी कोणालाही मनाई करण्यात आलेली नाही. मा.सदस्यांनी माहिती घेऊन या खात्यातील कोणत्याही अधिका-याने भ्रष्टाचार केला आहे हे सिध्द करावे आणि सिध्द झाल्यानंतर तो अधिकारी दिल्लीहून अथवा कानपूरहून आला आहे याची पर्वा न करता त्याच्यावर शासन कारवाई करील.

श्री. अनंत तरे : सभापती महोदय, अर्धा-तास चर्चेच्या अनुषंगाने आपण मला प्रश्न विचारण्याची संधी दिली त्याबद्दल मी आपल्याला धन्यवाद देतो. सध्या प्रदुषण नियंत्रण मंडळ हे वादाच्या भोव-यात सापडले आहे. हवा,पाणी,आवाज याचे प्रदुषण झालेले आहे हे सगळयांना जाणवत आहे. प्रदुषण मंडळ आणि मंत्री यांच्यामध्ये समन्वयाचा अभाव आहे. मंत्री प्रभाव

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SSK/ KGS/ MAP/ 18:50

श्री. अनंत तरे...

टाकण्याचा प्रयत्न करीत आहेत परंतु अद्याप त्यांना यश आलेले नाही. जास्त अधिकार हे मंडळाच्या अध्यक्षांना आहेत. आवाज,हवा आणि पाणी यातून होणा-या प्रदुषणावर नियंत्रण ठेवण्यासाठी या मंडळाची पुनर्रचना करुन मंडळाचे अध्यक्ष हे या खात्याचे मंत्री असतील अशा प्रकारची तरतूद शासन करणार आहे काय ?

यानंतर श्री. गायकवाड

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

VTG/ MAP/ KGS/ MHM/ SBT/ 18=55

श्री.अनंत तरे ...

ज्याप्रमाणे एम.आय.डी.सी.चे पदसिध्द अध्यक्ष हे त्या विभागाचे मंत्री असतात तशा प्रकारे या प्रदूषण मंडळाची पुनर्रचना करण्यात येणार आहे काय ?

श्री.गणेश नाईक :सभापती महोदय, यांनी अनेक कंपन्यामुळे पाण्याचे प्रदूषण होते व त्यामुळे पाण्यातील मासे मरतात या संदर्भात सन्माननीय सदस्य श्री.अनंत तरे यांनी अनेक मच्छिमार बांधवांना व कोळी बांधवांना मदत केलेली आहे. माझी मानसिकता काय आहे हे सन्माननीय सदस्यांना माहीत आहे.त्यांनी असे सांगितले की, महाराष्ट्र प्रदूषण मंडळाचे चेअरमन हे त्या विभागाचे मंत्री असावेत ....

श्री.अनंत तरे : युतीच्या काळात प्रदूषण मंडळाचे अध्यक्ष हे पर्यावरण विभागाचे मंत्री होते. मला असे सांगावयाचे आहे की, आताच्या मंत्रिमहोदयांची काम करण्याची इच्छा आहे परंतु त्यांचा पडावा तितका प्रभाव या प्रदूषण मंडळाच्या कामकाजावर पडत नाही.

श्री.गणेश नाईक : सन्माननीय सदस्य श्री.तरे यांनी माझ्याबद्दल ज्या भावना व्यक्त केल्या आहेत त्याबद्दल मी त्यांना धन्यवाद देतो.या संबंधीचा निर्णय माननीय मुख्यमंत्री आणि मंत्रीमंडळ घेणार आहेत.सन्माननीय सदस्यांच्या मनातील भावना अशी आहे की, पाणी शुध्द राहिले पाहिजे. तसेच सन्माननीय सदस्य श्री.विनोद तावडे यांनी ज्या भावना व्यक्त केल्या आहेत त्या भावनेशी मी देखील सहमत आहे.प्रदूषण मंडळाचे जे ऑब्जेक्ट आहे त्याप्रमाणे काम व्हावयास पाहिजे परंतु दुर्देवाने प्रत्यक्षात त्याप्रमाणे काम होत नाही. कॉमन एफुलएन्टस ट्रिटमेन्ट प्लॅन्टची क्षमता कमी असते तसेच अनेक उद्योगपतींची मानसिकता इतक्या चुकीच्या पध्दतीची असते की त्याचा परिणाम पाण्याच्या , हवेच्या व ध्वनीच्या प्रदूषणावर होत असतो. त्यासंदर्भात शासनाकडून उपाययोजना राबविण्यात येत असतात. भविष्य काळात एखादी "स्पेशल परपरज व्हेईकल" सारख्या कंपनीची स्थापना करुन महाराष्ट्रातील नगरपालिका,महानगरपालिका किंवा औद्योगिक वसाहती, डिस्टलरीज इत्यादीच्या मार्फत जे काही प्रदूषण होत असते त्यावर नियंत्रण आणण्याच्या दृष्टीने शासनाची पावले पडणार आहेत.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

2..

19-07-2005 (असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही) 3D 2

पृ.शी : ठाणे येथील घोडबंदर रोड तसेच शिळफाटा-डोंबिवली-कल्याण-भिवंडी या रस्त्याच्या कामास सुरुवात करणें

मु.शी : ठाणे येथील घोडबंदर रोड तसेच शिळफाटा-डोंबिवली-कल्याण-भिवंडी या रस्त्याच्या कामास सुरुवात करणे या विषयावरील तारांकित प्रश्न क्रमांक 6422 ला दिनांक 11 जुलै 2005 रोजी शासनाने दिलेल्या उत्तराच्या संदर्भात डॉ.अशोक मोडक,वि.प.स. यांनी उपस्थित केलेली अर्धा तास चर्चा.

डॉ.अशोक मोडक (कोकण विभाग पदवीधर) : सभापती महोदय, ठाणे येथील घोडबंदर रोड तसेच शिळफाटा-डोंबिवली-कल्याण - भिवंडी या रस्त्याच्या कामास सुरुवात करणे या विषयावरील तारांकित प्रश्न क्रमांक 6422 ला दिनांक 11 जुलै 2005 रोजी शासनाने दिलेल्या उत्तराच्या संदर्भात. मी आपल्या अनुमतीने नियम 92 अन्वये अर्धा तास चर्चा उपस्थित करीत आहे.

श्री.अनिल देशमुख :सभापती महोदय, मला एक दुरुस्ती करावयाची आहे. मुद्दा नंबर 3 वरील शेवटचे वाक्य असे आहे की, "प्रकल्पाची अंदाजित प्रकल्प किंमत 115 कोटी रुपये इतकी असून त्याकरता पहिल्या टप्याकरता बी.ओ.टी.तत्वावर निविदा मागविण्यात येणार आहेत". त्या ऐवजी "सूचना प्रसिध्द झाली आहे" असे वाचण्यात यावे.

डॉ.अशोक मोडक : दिनांक 11 जुलै 2005 रोजी जे उत्तर दिलेले आहे त्यात आपण ही सुधारणा करीत आहात काय ? आपण हा विषय कृपा करुन समजावून घ्यावा. आजचा विषय हा दिनांक 11 जुलै 2005 रोजी म्हणजे या अधिवेशनाच्या पहिल्या दिवशी जो तारांकित प्रश्न 6422 विचारण्यात आला होता. त्या प्रश्नाला माननीय मंत्रिमहोदयांकडून मिळालेल्या उत्तराच्या संदर्भात मी ही अर्धा तास चर्चा उपस्थित करीत आहे. आपण जे सांगितलेले आहे तो उल्लेख त्या उत्तरात करण्यात आला नाही. सभपती महोदय,दिनांक 11 जुलै 2005 रोजी जो प्रश्न विचारण्यात आला होता त्यात 1 एप्रिल 2005 चा उल्लेख करण्यात आला आहे.तेव्हा आपण थोडा इतिहास समजावून घेतला तर आपल्या असे लक्षात येईल की, दिनांक 17 डिसेंबर 2004 रोजी श्री.छगन भुजबळ हे या विभागाचे मंत्री होते त्यावेळी या विषयाच्या संदर्भात लक्षवेधी सूचना मांडण्यात आली होती आणि त्यावर नागपूर अधिवेशनामध्ये चर्चा झाली होती .त्यानंतर 18 मार्च 2005 रोजी आपण मंत्री झाला होता व त्यावेळी आपल्या उपस्थितीत चर्चा झाली होती. या संदर्भातील ही सर्व पार्श्वभूमिका मी आपल्या माहितीकरता सांगत आहे.दिनांक 18 मार्च 2005 रोजी जी चर्चा झाली

3...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.अशोक मोडक .....

होती त्या चर्चेचे प्रोसिडिंग्ज माझ्या हातामध्ये आहे.जवळजवळ दहा पानांची ती चर्चा होती. तीन चार ठिकाणी आपण असे उत्तर दिले होते की," रस्ते विकास महामंडळाकडे या रस्त्याचे हस्तांतरण झ ााले आहे म्हणून मला काही कालावधी लागेल." त्यानंतर आज आपण जुलै महिन्यात चर्चेसाठी येथे बसलो आहोत. तेव्हा या संदर्भात किमान काही उत्तर मिळेल अशी आपल्याकडून अपेक्षा आहे.

नंतर श्री.सुंबरे .

नतर श्री.सुंबरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

KBS/KGS/MAP/MHM/SBT. श्री. गायकवाड नंतर --- 19:00

डॉ. मोडक .....

विशेषत: शीळफाटा-डोंबिवली-कल्याण-भिवंडी या रस्त्यावर मी आपले लक्ष केंद्रीत करू इच्छितो. त्यावेळेस 18 मार्च रोजीच्या चर्चेमध्ये सन्माननीय सदस्य श्री.गडकरी यांनी सांगितले की, ठेकेदाराने 18 लाखाचा क्लेम टाकलेला आहे त्यामुळे हा प्रश्न सुटेल अशी शक्यता नाही. तसेच येथे जो पूल बांधावयाचा आहे त्याबाबत पर्यावरण विभागाची परवानगी लागते आणि यासाठी जे 18 कोटी लागतात तेवढे पैसे महामंडळाकडे नाहीत. तेव्हा त्यासाठी आपल्याकडे जी बैठक झाली होती त्यामध्ये मी सुचविले होते की, 134 कोटी रुपयांचे काम टेंडरमध्ये निश्चित झाले होते तर तोच रेट निश्चित समजून डीएसआरमध्ये तो दर गृहीत धरून त्याप्रमाणे तरतूद करून आता एमएसआरडीसीने जो दुसरा कंत्राटदार या कामासाठी ठरविला असेल तो हे सारे मान्य करीत असेल आणि भूसंपादनाचे पैसेही देण्यास मान्य करीत असेल तर त्याला वि. पण आपण वरचेवर जे धृपद उच्चारित आहात तेच पुढेही चालू ठेवले आहे. आपण सारखे हेच सांगत आहात की, आमच्या खात्याकडे आताच हे हस्तांतरित झालेले आहे. सन्माननीय सदस्य श्री.गडकरी यांनी पुन्हा एक मुद्दा मांडला तेव्हाही आपले धृपद तेच राहिले. या चर्चेतील पृष्ठ 1 आणि 3 वर तेच उत्तर आहे. शेवटी त्यावेळस सन्माननीय श्री.डावखरे हे चेअरमन होते त्यांनी चर्चेचा जो समारोप केलेला आहे तो मला अत्यंत महत्त्वाचा वाटतो. तो मी आपल्याला येथे वाचून दाखवितो. त्यांनी म्हटले आहे की, या सर्व गोष्टीचे गांभीर्य शासनाने ओळखण्याची खऱ्या अर्थाने आवश्यकता आहे. मी या बाबतीत रस्त्यासाठी माननीय मंत्री महोदयांना मदत केली होती. हा प्रश्न 7-8 वर्षे, सन्माननीय श्री.गडकरी हे या खात्याचे मंत्री होते तेव्हा पासूनचा आहे. तरीही अजून पर्यंत हे काम पूर्ण होत नाही ही बाब शासनाला भूषणावह नाही. एखादे काम टेंडर निघाल्यानंतरही 7-8 वर्षे होत नसेल, टेंडर काढूनही त्याची कार्यवाही होत नसेल तर राज्य सरकारने ताबडतोब त्याबाबतीत पर्याय शोधला पाहिजे. म्हणूनच नागपूर येथेही जेव्हा हा प्रश्न उपस्थित झाला होता तेव्हा मी देखील हे काम रस्ते विकास महामंडळाकडे सोपवावे असा निदेश दिला होता. हे काम तातडीने हाती घ्यावे असे निदेश दिले होते. परंतु खेदाने म्हणावे लागेल की, शासनाकडून या बाबतीत कोणतीही कार्यवाही झालेली नाही. सभापती महोदय, मला दु:ख याचे वाटते आहे की, 11 जुलै 2005 रोजी आपण जे उत्तर या प्रश्नावर दिलेले आहे ते असे आहे की, शीळफाटा-डोंबिवली-कल्याण-भिवंडी रस्त्याचे कामामध्ये निविदेची कार्यवाही प्रगतीमध्ये आहे. मला वाटते आपणही हे मान्य कराल की, it is hold on

.... 3इ 2 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. मोडक .....

answer हे अम्ब्रेला टाईप उत्तर आहे,. म्हणजे कोणीही कसाही याचा अर्थ लावावा. तेव्हा मला आता या निमित्ताने आपल्याकडून याचे विस्तृत स्पष्टीकरण पाहिजे. दुसरा मुद्दा म्हणजे गेली 7-8 वर्षांपेक्षाही अधिक काळ हा प्रश्न रेंगाळत राहिलेला आहे पण त्यामुळे प्रत्यक्षात तेथील लोकांचे पावसाळ्यामध्ये जे हाल होतात त्यांना सीमा नसते. आज माणूस पुण्याहून दोन अडीच तासामध्ये मुंबईत येतो. येथे शीळफाट्यापर्यंत येतो. परंतु पुढे जाण्यासाठी त्याला आणखी 2 तास लागतात. तेव्हा हे लक्षात घेऊन आपण माझ्या दोन प्रश्नांची उत्तरे येथे द्यावीत. एक म्हणजे याबाबतची तपशीलवार कार्यवाही आपण कृपा करून सांगावी. तसेच नेमकी निविदा मागविली आहे त्यात रस्त्याचे मजबुतीकरण, क्राँक्रीटीकरण, डांबरीकरण वगैरेंचा सगळा उल्लेखही आहे काय आणि हा रस्ता पूर्ण होऊन आम्हा डोंबिवलीकरांचे अरिष्ट केव्हा संपेल याची अंतिम तारीख ही आपण आजच्या या अर्धा तास चर्चेच्या निमित्ताने, ही चर्चा येथे उपस्थित करण्यामागील अर्जन्सी लक्षात घेऊन आपण सांगावी अशी विनंती करतो आणि थांबतो.

****

.... 3इ 3 .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अनिल देशमुख (सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य डॉ. मोडक यांनी शीळफाटा-डोंबिवली-कल्याण-भिवंडी रस्त्याचा प्रश्न या अर्धा तास चर्चेच्या माध्यमातून येथे उपस्थित केलेला आहे. हा रस्ता अतिशय महत्त्वाचा आहे याची जाणीव शासनाला आहे. म्हणूनच सन्माननीय श्री.गडकरी हे सा.बां.विभागाचे मंत्री असताना या रस्त्याच्या बाबतीत टेंडर काढण्यात आले होते आणि त्यावेळी ते टेंडर रूबिट कंपनीला दिलेले होते. ...

(यानंतर श्री.जागडे .... 3एफ 1 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अनिल देशमुख...

टेंडर काढल्यानंतर या कंपनीने हे काम करण्यास सुरुवात केली. या कंपनीने थोडे काम करुन नंतर ते सोडून दिले. त्यानंतर हे काम बरेच काळ प्रलंबित होते. सुरुवातीला हे काम सार्वजनिक बांधकाम खात्याकडे होते. त्यानंतर ते एमएसआरडीसीकडे वर्ग करण्यात आले. नागपूरच्या अधिवेशनात हा प्रश्न उपस्थित झाल्यानंतर माननीय भुजबळसाहेबांनी हे काम आमच्याकडे वर्ग केले. सुरुवातीच्या कंत्राटदाराने हे काम केले होते. तसेच त्याचे काही क्लेम्स बाकी होते. म्हणून तो कोर्टात गेला होता. त्यामुळे त्याचे क्लेम्स सेटल करावे लागले. हा प्रश्न या सभागृहात 18 मार्च 2005 रोजी चर्चेला होता. त्यावेळी माननीय सदस्य श्री. नितीन गडकरी यांनी अशी मागणी केली होती, हे काम लवकरात लवकर सुरु करावे. माननीय सभापती महोदयांनीसुध्दा हे काम लवकरात लवकर सुरु करण्याचे निर्देश दिले होते. त्यावेळी मी माझ्या उत्तरामध्ये असे सांगितले होते की, "लवकरात लवकर टेंडर काढून या कामाला लवकरात लवकर सुरुवात करण्यात येईल." त्यावेळी माननीय सदस्य श्री. नितीन गडकरी यांनी असे सांगितले की, " टेंडर काढले तर हे काम सुरु करण्यास बराच वेळ लागेल. म्हणून टेंडर न काढता मुंबई-पुणे नॅशनल हायवे क्र. 4 या ठिकाणी शीळ फाट्याजवळ जो कंत्राटदार काम करीत आहे, त्यालाच हे काम द्यावे. तसे झाले तर हे काम लवकरात लवकर सुरु करता येईल. त्यानंतर माननीय सभापती महोदयांनीही तसेच निर्देश दिले. हे काम आठ ते नऊ वर्षापूर्वीचे होते. त्यामुळे त्या बाबतचा अभ्यास करुन आम्ही सदरहू नॅशनल हायवे क्र. 4 चे काम करीत असलेल्या कंत्राटदाराला बोलाविले. परंतु त्या कंत्राटदाराने हे काम करण्यासाठी असमर्थता दाखविली. हे काम मी करु शकणार नाही, असे त्यांने आम्हाला सांगितले. माननीय सभापतींनी दुसरा असा निर्देश दिला होता की, " टेंडर काढून हे काम सुरु करावे." त्याप्रमाणे आम्ही या कामाच्या टेंडरची प्रोसेस सुरु केली आहे. टेंडरच्या फॉर्मची विक्री 22 तारखेला करण्यात आली आहे. आता त्याप्रमाणे 3 ऑक्टोबर 2005 रोजी निविदा येतील. त्याप्रमाणे वर्क ऑर्डर ऑक्टोबर महिन्यात दिली जाईल आणि हे काम ऑक्टोबर महिन्यात सुरु करण्यात येईल. हे काम सुरु झाल्यानंतर एक ते दीड वर्षात हे काम पूर्ण होईल.

डॉ. अशोक मोडक : सभापती महोदय, या ठिकाणी एक नवीन माहिती सदनासमोर आली आहे. जुना कंत्राटदार हे काम करण्यास तयार नाही. आता नवीन कंत्राटदार आला आहे. त्या कंत्राटदाराला आता कोणते काम करण्यास सांगितले आहे. ? तसेच त्याबाबत कोणत्या अटी

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. अशोक मोडक......

टाकल्या आहेत .

श्री. अनिल देशमुख : सभापती महोदय, शिळफाटा ते डोंबिवली, डोंबिवली ते कल्याण आणि कल्याण ते भिवंडी असा हा रस्ता आहे. हा 22 कि.मी. चा रस्ता तयार करावयाचा असून त्यासाठी 115 कोटी रुपये लागणार आहेत. तसेच हे काम बीओटी तत्वावर करण्यात येणार आहे.

(यानंतर श्री. सरफरे...

अशुध्दारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री. अनिल देशमुख....

आम्ही दुसरा अभ्यास केला आहे की, कल्याण बायपास हा रस्ता कल्याण शहरामधून जातो व तो भिवंडीकडे जातो. या कामाचे टेंडर ऑक्टोंबरमध्ये काढून काम ऑक्टोंबरच्या शेवटी चालू करणार आहोत. दुसरा बाय पास आहे त्याला उल्हास क्रिक म्हणतात. या बायपासच्या कामाचा संपूर्ण अभ्यास झाल्यानंतर या कामाचे टेंडर काढण्याची प्रक्रिया सुरु करु. हे काम सेकंड स्टेजचे आहे.

(सभापतीस्थानी मा. उपसभापती)

डॉ. अशोक मोडक : सभापती महोदय, कल्याण बायपास हा पत्री पूल ओलांडल्यानंतर सुरु होतो. या ठिकाणी ज्या कॉट्रॅक्टरला आपण काम देणार आहात त्याला काम पूर्ण करण्यासाठी कालमर्यादा घालून दिली आहे काय?

श्री. अनिल देशमुख:: हे संपूर्ण काम दीड वर्षामध्ये पूर्ण करावयाचे आहे.

श्री. अनंत तरे : सभापती महोदय. माननीय सदस्य डॉ. अशोक मोडक यांनी ठाणे-घोडबंदर, शीळफाटा-डोंबिवली या रस्त्याच्या संदर्भात विचारलेल्या प्रश्नाला मंत्रिमहोदयांनी उत्तर दिले आहे. ठाणे येथील घोडबंदर रस्त्याला मंत्रिमहोदयांनी जानेवारी-फेब्रुवारी महिन्यामध्ये भेट दिली होती. मंत्रिमहोदय दिसायला सुंदर व्यक्तिमत्वाचे असल्यामुळे त्यांच्या भेटीबाबत स्थानिक चॅनेल्सवाले, फोटोग्राफर सर्व त्या ठिकाणी आले होते. त्यांनी हा रस्ता पाहिल्याचा फोटो वर्तमानपत्रामध्ये छापून आला. आणि या रस्त्याकरिता 20 कोटी रुपये खर्च करण्यात येतील असे आश्वासन दिले. त्यावेळी सर्व स्थानिक चॅनेल्सवाल्यांनी आणि लोकांनी आनंद व्यक्त केला आहे. सभापती महोदय, आपण ठाण्याचे आहात. आपल्याला माहीत आहे की, ठाणे-घोडबंदर रस्ता अतिशय खराब झाला आहे. त्या ठिकाणी रस्त्याचा टोल घेतला जातो. परंतु तो रस्ता वापरण्याच्या लायकीचा राहिलेला नाही. रस्त्यामध्ये खड्डे आहेत की, खड्ड्यामध्ये रस्ता आहे असा प्रश्न निर्माण होतो. प्रश्न असा आहे की, आपण सहा महिन्यापूर्वी आश्वासन दिले होते की, 20 कोटी रुपये खर्च करण्यात येऊन हा रस्ता चांगला करु. तेव्हा या 20 कोटीपैकी आतापर्यंत या रस्त्यावर किती खर्च झाले? आणि हा रस्ता आपण किती दिवसात सुस्थितीत आणणार आहात?

उपसभापती : माननीय सदस्य श्री. तरे साहेब जर एम.एस.आर.डी.सी. ने ठाण्याला खड्डयात घालायचे ठरविले असेलतर तुम्ही काय करणार?

श्री. अनिल देशमुख : सभापती महोदय, माननीय सदस्यांनी सांगितल्याप्रमाणे ठाणे-घोडबंदर रस्याला मी भेट दिली होती. व त्याठिकाणी लोकांच्या अडी-अडचणी समजावून घेतल्या

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अनिल देशमुख....

होत्या. माननीय सदस्यांच्या सूचनाही ऐकून घेतल्या होत्या. या कामासाठी 138 कोटी रुपयांचे टेंडर काढले असून लेटर ऑफ इंटेंड दिले आहे. व हे काम लवकरात लवकर सुरु होईल. यामध्ये एक तांत्रिक अडचण अशी आहे की, माननीय मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली एक इन्फ्रास्ट्रक्चर कमिटी असून तिची मान्यता घ्यावयाची बाकी आहे. सर्व फॉर्मालिटीज पूर्ण झाल्या आहेत. इन्फ्रास्ट्रक्चर कमिटीची मान्यता मिळाल्यानंतर रस्त्याचे काम लवकरात लवकर सुरु करु.

श्री. अनंत तरे : सभापती महोदय, हा रस्ता वापरण्याच्या लायकीचा राहिलेला नाही. आपण टेंडर काढले असले तरी तातडीने हा रस्ता सुधारण्यासाठी पैसे देणार आहात काय?

श्री. अनिल देशमुख:: आम्ही हे काम लवकरात लवकर सुरु करीत आहोत.

श्री. अनंत तरे : सभापती महोदय, त्या रस्त्यावर असंख्य खड्डे पडले आहेत. त्यामुळे आतापर्यंत झालेल्या अपघातामध्ये दोन-तीन लोक मृत्यूमुखी पडले आहेत...

उपसभापती : मंत्रिमहोदय, या रस्त्याला आपण पुन्हा एकदा भेट द्यावी. आणि हवे असल्यास सोबत संबंधित अधिकाऱ्यांना घ्यावे. या सदनामध्ये या रस्त्याच्या संदर्भात वारंवार चर्चा उपस्थित करण्यात आली आहे. या रस्त्यावर जेवढे खड्डे नसतील त्यापेक्षाही अधिक वेळा या सभागृहामध्ये चर्चा झाली आहे. तेव्हा शासनाकडून जर इतकी बेपवाई दाखविली जाणार असेलतर निश्चितपणे आपल्याला याची गंभीर नोंद घ्यावी लागेल. या रस्त्यासाठी लोकांनी धरणे, आंदोलने केली आहेत, लोकप्रतिनिधी रस्त्यावर बसले आहेत. आणि आज सुध्दा एम.एस.आर.डी.सी. हे खाते याबाबतीत उदासीन आहे. तसेच, या रस्त्यावर अजून टोल वसूल केला जात आहे ही वस्तुस्थिती आहे. म्हणून या रस्त्याच्या बाबतीत अत्यंत कळकळीने सांगतो की, कमीत कमी येत्या आठ दिवसामध्ये आपल्या खात्यामार्फत हे खड्डे बुजविण्याचे काम झाले नाहीतर मला स्वत:ला एम.एस.आर.डी.सी. च्या कार्यालयावर माझ्या नेतृत्वाखाली मोर्चा आणावा लागेल याची आपण गंभीरपणे नोंद घ्यावी.

श्री. अनिल देशमुख : सभापती महोदय, या रस्त्याची परिस्थिती गंभीर आहे म्हणून या रस्त्याच्या कामाचे टेंडर शासनाने मंजूर केले आहे. व हे 138 कोटी रुपयांचे काम एकाच टप्प्यामध्ये करावयाचे आहे. ते काम आपण लवकरात लवकर सुरु करु.

(यानंतर सौ. रणदिवे)

अमुद्रित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

उप सभापती : मंत्री महोदय, आम्ही हे सर्व मोठमोठे आकडे ऐकून कंटाळलो आहोत. या सर्व गोष्टींची पूर्वपिठीका आम्हाला माहिती आहे. आता फक्त लोकांचा अंत पाहू नका. लोकांना तेथून सुखरुपपणे जाता-येता येईल असा रस्ता ताबडतोब करावयास पाहिजे. सध्या तेथे टोल वसूल केला जात आहे. तुमच्या सगळया तांत्रिक बाबी आम्हालाही माहिती आहेत. हा रस्ता वाहतुकीसाठी योग्य आणि लोकांना जाण्या-येण्याकरता योग्य होईल अशा प्रकारे येत्या आठ दिवसाच्या आत तो ताबडतोब दुरुस्त करण्यात यावा आणि त्यासंबंधीचे आदेश आपण संबंधितांना आजच्या आज द्यावेत.

श्री.अनिल देशमुख : सभापती महोदय, या रस्त्यावर जे खड्डे असतील, ते एक महिन्याच्या आत लवकरात लवकर बुजवू. आठ दिवस फार लवकर होतात आणि या रस्त्याचे काम लवकरात लवकर सुरु करु.

श्री.अनंत तरे : सभापती महोदय, या रस्त्याच्या कामासाठी 20 कोटी रुपये खर्च होणार होता. त्याचे काय झाले ?

श्री.अनिल देशमुख : सभापती महोदय, ते 20 कोटी रुपये नाही तर ते 2 कोटीचा खर्च होता.

श्री.अनंत तरे : सभापती महोदय, तेवढा खर्च केला आहे का ?

श्री.अनिल देशमुख : सभापती महोदय, मी 20 कोटी रुपये असे सांगितले नव्हते.

श्री.अनंत तरे : सभापती महोदय, 2 कोटी रुपये नाही पण निदान 50 लाख, 10 लाख तरी खर्च करा आणि रस्त्यावरील खड्डे बुजवावेत.

श्री.अनिल देशमुख : सभापती महोदय, आता पूर्ण रस्त्याचे काम मंजूर झाले आहे. तेव्हा दुरुस्तीसाठी 2 कोटी रुपये खर्च करणार होतो. पण आता 138 कोटी रुपयांचेच काम करावयाचे आहे. तर मग 2 कोटी रुपये कशाला खर्च करावयाचे.

श्री.अनंत तरे : सभापती महोदय, तोपर्यंत टोल बंद करणार का ? त्याठिकाणी असलेला रस्ता व्यवस्थित वापरण्याच्या स्थितीत नाही. आज लोकांकडून टोल घेतला जात आहे. मग आम्ही लोकप्रतिनिधींनी तेथे जाऊन टोल बंद करावयाचा का ? आपण आठ दिवसात रस्ता दुरुस्त करण्याबाबतचे आदेश का देत नाही ?

श्री.अनिल देशमुख : सभापती महोदय, या रस्त्यावरील खड्डे आम्ही एक महिन्यात दुरुस्त करु आणि लवकरात लवकर 138 कोटी रुपयांच्या नवीन कामाला सुरुवात करु.

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, तोपर्यंत तेथे टोल घेणे बंद करावे.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, या रस्त्याच्या कामासाठी 138 कोटीचे टेंडर मान्य केले आहे. मागच्या वेळी नागपूर येथील अधिवेशनामध्ये सांगितले होते की, पर्यावरणाच्या दृष्टीने परवानगी मिळण्याच्या बाबतीत बरेच अडथळे आहेत. संबंधित विभागाने याबाबतीत ऑब्जेक्शन घेतलेले आहे, याबाबतीत तेथील काही संस्थाही पुढे आल्या आहेत. तर आता तरी त्या सर्व परवानग्या घेतल्या आहेत का ? नाहीतर मग कामाचे जे टाईम टेबल ठरविलेले असते, त्याप्रमाणे ते पूर्ण होत नाही.

श्री.अनिल देशमुख : सभापती महोदय, सर्व परवानग्या घेऊन टेंडर काढले होते. आता कोणतीही परवानगी घेण्याचे बाकी नाही. फक्त काम सुरु करावयाचे शिल्लक आहे.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, एक महिन्यापर्यंत या रस्त्याचे काम पूर्ण होत नाही, तोपर्यंत टोल घेण्याचे बंद करणार का ?

श्री.अनिल देशमुख : सभापती महोदय, टोल बंद करता येणार नाही.

श्री.अनंत तरे : सभापती महोदय, मग रस्ता तातडीने दुरुस्त करावा.

श्री.अनिल देशमुख : सभापती महोदय, एक महिन्यात रस्ता दुरुस्त करतो असे सांगितले आहे.

. . . .3 एच-3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

उप सभापती : सभागृहाची बैठक आता स्थगित होत आहे. बुधवार, दिनांक 20 जून 2005 रोजी सकाळी 10.30 वाजता सभागृहाची जादा बैठक घेण्यात येईल. त्यामध्ये आजच्या कामकाज पत्रिकेवर दर्शविण्यात आलेल्या पुरवणी मागण्यांवरील चर्चा व माननीय मंत्री महोदयांची उत्तरे . . . .

श्री.वसंत काळे : सभापती महोदय, माझ्या अर्ध्या तासाच्या चर्चेचे काय झाले ?

उप सभापती : जेव्हा याठिकाणी माननीय सभापती आसनस्थ होते, तेव्हा त्यांनी आपली चर्चा पुकारली होती. त्यावेळी आपण सभागृहात उपस्थित नव्हता. यासंबंधातील आपली विनंती मला मान्य आहे. पण आपण माननीय सभापतींना विनंती करावी. त्यांनी परवानगी दिल्यानंतर आपण ती चर्चा घेऊ.

(यावेळी कॅबिनेट मंत्री सभागृहाबाहेर जातात.)

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, कॅबिनेट मंत्री सभागृहाबाहेर गेले आहेत. हे बरोबर नाही. त्यांनी येथे थांबावयास पाहिजे.

उप सभापती : मघाशी मी सभागृहाची बैठक स्थगित होत आहे असे म्हटल्यानंतर ते बाहेर गेले आहेत.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, त्यांनी येथे थांबावे असे मी म्हणत नाही. पण हे बरोबर नाही.

डॉ.अशोक मोडक(खाली बसून) : हा आपला अपमान आहे.

उप सभापती : सभागृहाची बैठक आता स्थगित होत आहे. बुधवार, दिनांक 20 जून 2005 रोजी सकाळी 10.30 ते 12.45 वाजेपर्यंत सभागृहाची जादा बैठक घेण्यात येईल. त्यावेळी आजच्या कामकाज पत्रिकेवर दर्शविण्यात आलेल्या पुरवणी मागण्यांवरील चर्चा आणि त्या चर्चेला माननीय मंत्री महोदयांची उत्तरे हे कामकाज होईल. त्यानंतर सभागृहाची नियमित बैठक दुपारी 1.00 वाजता भरेल.

(सभागृहाची बैठक सायंकाळी 7 वाजून 18 मिनिटांनी,बुधवार,दिनांक 20 जुलै, 2005 च्या सकाळी 10.30 वाजेपर्यंत स्थगित झाली.)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही